# गुरु महिमा

दिवाळी अंक २०१८





# साई समाधी शताब्धी विशेषांक

मुल्य रु. १२५/-



# गुरु महिमा

## संपादकीय



आपल्या मराठीत एक म्हण आहे, जेथे चमत्कार तेथे नमस्कार!


ज्याच्याकडून चमत्कार घडून येतात तो देव! महाराष्ट्र हा तर नानां-चमत्कारांनी भरलेला आहे, तो म्हणजे अनेक विभूती, संत, महापुरुषांच्या अवतारांनी. या थोर मंडळींनीच अनेक चमत्कारांनी सामान्यजणांना भक्तीमार्ग दाखवून त्यांचा उध्दार केला आणि आजही त्यांची ती परंपरा त्यांनी चालूच ठेवली आहे. ही कसोटी श्रीसाईबाबांना लावली तर अधिक विचित्र अनुभव त्यांच्या चरित्रावरुन दिसून येतात आणि आजही भाविक भक्त तशाच प्रकारचे अनुभव बाबांच्या ''श्रध्दा आणि सबुरी'' या शिकवणीवरुन घेत आहेत. म्हणजे बाबांच्या समाधीनंतर शंभर वर्षांनीही!

आज आपण भाग्यवान आहोत की इतर काही संतांप्रमाणे बाबांचेही, अण्णासाहेब दाभोळकर (हेमाडपंत) यांनी (बाबांच्या आशिर्वादाने) लिहिलेले साईसच्चरित्र उपलब्ध आहे. त्यातून आपल्याला बाबांचे विक्षिप्त चमत्कार, त्यांची शिकवण याचे बरेच ज्ञान होते. परंतु त्याहीपलीकडे श्रीसाईनाथांचे अज्ञात चरित्र आहे, जे दाभोळकरांसोबत इतर भक्त बाबांच्या सेवेत होते आणि बाबांच्या देहावसानानंतर समाधीकडे आलेले साधक भक्त यांनी लिहून ठेवलेले आहे. उदा. उपासनी महाराज, मेहेरबाबा, दासगणू, नरसिंहस्वामी, शरणानंद इत्यादी भक्तांच्या लिखीत पोथ्यांतून, ग्रंथातून जे समजले गेले, ते थोडक्यात संकलीत करुन श्रीसाईनाथांच्या समाधी शताब्धी निमित्त या गुरु महिमा दिवाळी अंकात लिहिण्याचा प्रयत्न झाला आहे.

श्रीसाईबाबांचे चरित्र हे अमृताहूनी गोड आहे. ''साई'' या नावातच ते दडलेले आहे आणि त्यांच्या कृपाळू दृष्टीने या विशेषांकात प्रकट झाले आहे.

सर्व भक्तांना या साईचरित्राचा लाभ मिळून साईंची दयाळू कृपादृष्टी प्राप्त होऊन, जीवनाचा उध्दार होवो, हीच या दीपावली निमित्त सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथांच्या चरणी विनम्र प्रार्थना!

संपादक


सद्‌गुरु श्री भाऊ महाराज

# गुरु महिमा

साईबाबांचे जीवन म्हणजे वेद-उपनिषदे आणि गीता यांचे सार होय. ''साई'' हे दोन अक्षरी नाम दिसण्यास किती छोटे! परंतु फारच गोड आणि मुखाने म्हणण्यास अत्यंत सोपे व सुलभ आहे. त्यात कुठे जोडाक्षरे पहावयास मिळतात का ? मग आपल्या जिभेला त्रास तो कसला होणार ?

भगवंताचे भजन गाताना आपण कधीतरी सहजपणे बोलून जातो; अमृताहूनी गोड नाम तुझे देवा। हे नाम आहे ''साई''.

साई हे नावच भक्तांच्या सांसारिक इच्छा पूर्ण करतेच. त्याहीपलीकडे भक्ताला संसारचक्रात अडकू न देता हळूहळू परमार्थाची चव चाखून, वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करुन सदानंद तर प्राप्त करुन देतेच, शिवाय अंतिम ध्येयाकडेही घेऊन जाते. तसे बाबांनी सांगूनच ठेवले आहे,

मज होऊनी अनन्य शरण। जया माझे अखंड स्मरण ।
तयाचे मज माया ऋण। फेडीत उद्धरण करुनियां ।।

साईबाबांनी देहत्याग करुन शंभर वर्षे झालीत. परंतु आजही अनंत भक्तांना त्यांचे अस्तित्व जाणवत असते. भक्ताने कळकळीने मारलेल्या हाकेला बाबा धावून आल्याची प्रचीतीही येत असते. तसे त्यांचे भक्तांना आश्वासनच आहे आणि ते पूर्ण सत्य आहे.

झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण ।
माझी हाडे तुर्बतीमधून । देतील आश्वासन तुम्हांस ।।

असे हे खरेखुरे साईबाबा! त्यंचा प्रत्येक शब्द सत्यात उतरणार! म्हणूनच बाबा म्हणत असत;

मज न लागे गाडी घोडी । विमान अथवा आगिनगाडी ।
हाक मारी जो मज आवडी । प्रकटे मी ते घडी अवलिंबे ।।

अशा या साईंची मनःपूर्वक प्रार्थना, भक्ती केली असता त्यांनी दिलेल्या वचनाप्रमाणे, भक्ताने सातासमुद्रापलिकडूनही त्यांना हाक मारली असता क्षणात ते धावून येतात, मग जीवाचा अटापिटा करुन, पैसा-अडका खर्च करुन बाबांना साकडे घालण्यासाठी शिरडीलाच जाण्याची गरज उरत नाही.

साईबाबांच्या जीवनाचा एकेक पैलू आपल्या समोर ''साईसच्चरित्र'' या ग्रंथाद्वारे उपलब्ध आहे. सच्चरित्र अर्थात सत्यचरित्र होय. ज्यांनी ते लिहिले ते गोविंदराव रघुनाथ दाभोळकर उर्फ अण्णासाहेब उर्फ हेमाडपंत यांनी अनंत भक्तांवर जणू कृपाच केली असं म्हणावं लागेल. कारण बाबांच्या सहवासात अण्णासाहेब होते.

# गुरु महिमा

त्यांच्या इच्छेला बाबांनी आशिर्वाद दिला आणि बाबांचे हुबेहुब वर्णन असलेले ''साईसच्चरित्र'' निर्माण झाले. अर्थात सद्‌गुरु साईंच्या कृपेचा तो प्रसाद आहे.


गोविंदराव दाभोळकर (हेमाडपंत)

अण्णासाहेब म्हणजेच गोविंदराव हे मुळचे वेंगुर्ल्याजवळील दाभोली गावचे. विद्या-विनय व आचार संपन्न असे व्यक्तिमत्व. इ. स. १८५९ साली गोविंदरावांचा जन्म झाला. इंग्रजांच्या सेवेतील एक तत्पर आणि प्रामाणिक अधिकारी ! सुशील, भाविक, नम्र असे गोविंदराव होते. मोठे विद्वान आणि संत वाङ्‌मयाचे गाढे अभ्यासक. आपल्या नोकरीच्या अंतीम टप्प्यात गोविंदराव प्रथम दर्जाचे कनिष्ठ कोर्टातील न्यायाधीश (दंडाधिकारी) म्हणून काम करीत होते. बाबांच्या सहवासात येण्यापूर्वी त्यांनी कधीही एकही ओवी अथवा कविता वा लेखन केले नव्हते.

बाबांचा स्नेह जडला, सहवास लाभला आणि सद्‌गुरु म्हणून गोविंदरावांवर कृपा झाली आणि भक्तांसाठी, भक्तांवर कृपा होण्यासाठी, त्यांच्या अडी-अडचणी, संकटे, व्याधी दूर होण्यासाठी गोविंदरावांच्या हस्ते अमृतमयी साईसच्चरित्राची निर्मिती झाली.

गोविंदराव हे काकासाहेब दिक्षित व नानासाहेब चांदोरकर यांचे परम स्नेही ! तिघांची घट्ट मैत्री. काकासाहेब व नानासाहेब यांच्यामुळेच गोविंदरावांना शिरडीस जाण्याचा योग आला. एकदा काकासाहेबांनी गोविंदरावांना आग्रह केला व शिरडीस जाण्याचे पक्के झाले. परंतु गोविंदरावांचे मन अचानक बदलले आणि शिरडीस जाण्याचे रद्द झाले. त्याचे कारण म्हणजे गोविंदरावांचा एक खास मित्र होता. त्याने गुरुंचा अनुग्रह प्राप्त करुन उपदेश ग्रहण केला होता. तो आपल्या बायको-मुलांसह लोणावळयास होता आणि त्याच्या धष्टपुष्ट मुलास अचानक ताप भरला. औषधोपचार झाले. दैविक उपाय झाले तरी गुण येईना. अखेरीस त्या मित्राने आपल्या गुरुंना आणून मुलाकडे बसविले. तोही उपाय निष्फळ झाला आणि मुलगा मृत्यू पावला. ही गोष्ट शिरडीला जाण्याच्या दरम्यान गोविंदरावांच्या कानी पडली. त्याने ते अतिशय खिन्न झाले. त्यांनी विचार केला, जर गुरुच अशा बिकट प्रसंगी कामी नाही आले तर त्यांचा काय उपयोग ?

गोविंदरावांच्या मनातील बाबांच्या दर्शनाचा उत्साह लोप पावला, आणि त्यांनी शिरडीला जाण्याचा बेत रद्द केला. त्यांच्या मनी विचारांचे काहूर माजले. शिरडीला कशाला जायला हवे. माझ्या मित्राचे गुरु त्याच्या एकुलत्या एक मुलाचे प्राण वाचवू शकले नाहीत. मग गुरुंच्या संगतीचा लाभ तो कसला ? जे काही भाळी लिहिले असेल व तेच निश्चित होणार असेल तर गुरुंची आवश्यकता का ? गुरु कर्मफळ चुकवू शकेल का ? कशाला गुरुंच्या मागे पडा आणि सुखी असताना दुःखात पडा ? होणारे जर गुरु टाळू शकत नाहीत, त्यांच्याकडे जावून

# गुरु महिमा

काय उपयोग ? अशा नाना विचारांनी गोविंदरावांचे शिरडीस जाण्याचे राहिले. परंतु दैवयोगाने त्यांना शिरडीस ओढून नेलेच. नानासाहेबांनी त्यांना आग्रहच केला असता गोविंदरावांनी आपल्या मनाची चलबिचलता बोलून दाखविली. परंतु नानासाहेबांच्या प्रेमळ, पवित्र उपदेशाने गोविंदराव अखेर शिरडीस येण्यास तयार झाले आणि नानासाहेबांसोबत शिरडीस येऊन पोहोचले.

हा काळ आहे इ.स. १९१० सालचा! त्यावेळी शिरडीत उतारुंना रहाण्यासाठी फक्त साठ्यांचा वाडा होता. शिरडीत पाय ठेवताच काय झाले कुणास ठाऊक. गोविंदरावांच्या मनात बाबांच्या दर्शनाची अपार उत्कंठा दाटून आली. कधी बाबांच्या चरणांवर मस्तक ठेवून दंडवत घालतो असे झाले होते. तोच मशिदीतून बाबांचे परमभक्त तात्यासाहेब नूलकर बाहेर आले आणि नानासाहेबांना म्हणाले, लागलीच दर्शन घ्या. बाबा भक्तमंडळीसोबत वाड्याच्या कोपऱ्यापाशी आले आहेत. ते ऐकून बाबा जेथे येऊन पोहोचले होते तेथे गोविंदराव धावतच निघाले आणि धुळीतच बाबांच्या चरणांवर लोटांगण घातले. मनी अत्यंत आनंद दाटला होता. नानासाहेबांनी बाबांविषयी जे काही सांगितले होते त्याहून अधिक गोविंदरावांनी प्रत्यक्ष अनुभवले.

बाबांना पाहताच गोविंदरावांची दृष्टी निवळून गेली. त्याचवेळी बाबांनी त्यांची जी विचारपूस केली त्याने गोविंदरावांची तहान-भूक हरपून सारी गात्रे तटस्थ झाली. बाबांच्या चरणांचा स्पर्श होताच त्यांच्या आयुष्याला नविन वळण लागले. साईंच्या दर्शनाचा लाभ घडताच त्यांच्या मनीचे सारे संशय फिटून गेले.

साईबाबांच्या दर्शनाचे हेच तर रहस्य आहे, की केवळ दर्शनाने वृत्तीत बदल होऊन त्या स्थिर होतात. गोविंदराव बाबांच्या दर्शनाने पावन झाले. त्यांना बाबांच्या रुपाने सद्‌गुरुंची भेट झाली.

बाबांचे दर्शन घेऊन गोविंदराव नानासाहेबांसोबत साठ्यांच्या वाड्यात आले तेथे बाळासाहेब भट्यांशी ओळख व भेट झाली आणि वाद-विवाद घडला.

गोविंदरावांचे मत होते, आपली स्वतंत्रता नष्ट करुन परतंत्रात कशाला रहावे. म्हणजे गुरु कशाला करावा ? जेथे आपल्या अक्कल हुशारीने कर्तव्य पार पाडता येते तेथे गुरुंची गरज काय ? ज्याचे कर्म त्यानेच करावयास हवे आणि जो ते करत नाही, त्याला गुरुंनी काय करावे ! भाट्यांचे मत याच्या विरुद्ध होते. म्हणून वाद चिघळत गेला.

भाट्यांचे मत होते, पंडित कितीही वेद पारंगत असो, त्याच्यावर गुरुंची कृपा नसेल तर त्याचे ज्ञान हे केवळ पुस्तकी ठरते. दोघेही एकमेकांचे ऐकत नव्हते. वाद काही संपत नव्हता आणि फलितही होत नव्हते. अखेर कसाबसा त्याला पूर्णविराम मिळाला.

काही वेळाने सकाळी गोविंदराव नानासाहेब, काकासाहेब यांच्याबरोबर दाभोळकर बाबांच्या दर्शनास आले.

# गुरु महिमा



तोच बाबांनी काकासाहेबांना विचारले, वाड्यात कशाचा वाद चालला होता व भांडत का होता ? इतके बोलून बाबा गोविंदरावांकडे पाहून म्हणाले, हे हेमाडपंत काय वाद घालत होते ? बाबांच्या बोलण्याने गोविंदराव आश्चर्यचकित झाले. वाड्यापासून मशिद बऱ्याच अंतराव असताना बाबांना हे कसे कळले आणि त्यांनी शरमेने मान खाली घातली. परंतु एक गोष्ट घडली ती अशी, बाबांनी गोविंदरावांना 'हेमाडपंत' हे नाव दिले. तेव्हा तर ते आणखी विचारात पडले.

तेराव्या शतकात ज्यांनी महाराष्ट्राची शान वाढवली असे देवगिरीचे राजे यादव (हेच दौलताबादचे जाधव होत.) यांच्या घराण्यात प्रौढप्रतापी चक्रवर्ती नावाचा राजा होऊन गेला. त्याचा पुतण्याही तितकाच महाप्रतापी व यदुवंशाचा मुकुटमणी होता. या दोघांचाही एक सर्वलक्षणी, धूर्त राजकारण पटू म्हणून ख्याती असलेला 'हेमाद्री' नावाचा मंत्री होता त्याने श्रुति-स्मृतींना अनुसरुन आचारव्यवस्था मांडली होती. व्रत, दान, तीर्थ आणि मोक्ष या चार प्रकाराचे सविस्तर विवेचन करुन 'चतुर्वर्गचिंतामणी' ग्रंथ लिहिला होता. हेमाद्री हे संस्कृत भाषेत उच्चारले जाते तर हेमाड हे मराठीत. हेमाद्री हा धर्मशास्त्र किंवा विधिनियम यांचे सुक्ष्म ज्ञान असलेला! त्याने 'राजकारणप्रशस्ती' मान संस्कृत काव्यही लिहिले होते. असा हा हेमाद्री, त्याच्या नावाने बाबांनी गोविंदरावांना का संबोधले ?

गोविंदराव तर हेमाद्रीच्या जवळपासही नव्हते. ते निव्वळ बडबडे. आयुष्यात कधी साधी ओवी केली नव्हती. अल्पबुद्धीचे अज्ञानी. मग बाबांनी हेमाडपंत हे नाव गोविंदरावांना का दिले ?

त्याचे स्पष्टीकरण देताना गोविंदराव म्हणतात, बाबांनी मला माझ्या चतुराईचा सन्मान करण्यासाठी ती पदवी दिली नाही, तर माझ्या वादाचा, हुशारीचा अभिमान नष्ट करण्यासाठी बाबांनी तो शब्दरुपी बाण मारला होता. योग्यतेशिवाय वायफळ वाद घालून हुशारी दाखविणाऱ्या माझ्या डोळ्यात वेळेवर अंजन घालून मला नवीन दृष्टी दिली. गुरुंशिवाय ज्ञान अथवा परमार्थ लाभत नाही. वाद-विवाद कशाला हवे. कोणाची बरोबरी करण्यास कशास जावे. त्यासाठी श्रद्धा व सबुरी ठेवावी. अशातऱ्हेचा अनमोल उपदेश बाबांनी 'हेमाडपंत' ह्या एका शब्दाने गोविंदरावांना करुन त्यांचा अभिमान छाटून टाकला.

गोविंदरावांनी बाबांनी केलेल्या नामगौरवाचा, नामकरणाचा अत्यंत प्रेमाने, निष्पाप वृत्तीने स्वीकार केला आणि साईचरणी लीन झाले. पुढे अनंत काळ ते बाबांच्या सहवासात होते. त्यांचे नाना अनुभव गोविंदरावांनी घेतले होते. एकदा त्यांच्या मनी आले, बाबांच्या अनुभवांचा, त्यांनी केलेल्या विविध उपदेशांचा वृत्तांत लिहून काढावा; म्हणजे त्याचे सतत मनन केल्यास मन शांत होईल. बाबांनी ज्या अनेक ज्ञानाच्या गोष्टी कथन केल्या, अनेकांना भजनाचा मार्ग दाखविला, त्या साऱ्या गोष्टींचा संग्रह करुन बाबांची एक गाथा तयार करावी. त्यातील चार अक्षरे जरी कानी पडली तरी जीवला शांती मिळेल. अशी उर्मी गोविंदरावांच्या मनी उठली आणि ती त्यांनी

माधराव देशपांड्यांच्या कानी घातली. तरीही एक शंका त्यांच्या मनी स्पर्श करुन गेली ती म्हणजे मला हे कसे शक्य होईल? कारण माझी आता साठी उलटलेली आहे. द्वाडबुद्धीही अडथळे निर्माण करु शकते शिवाय शरीराचा अशक्तपणा आहेच. तरीही हे सर्व बाबांवरच सोपवले तर कार्य सहजपणे साध्य होईल. बाबाच माझी लेखणी करुन माझा हात गिरवतील! केवढा हा गोविंदरावांचा विश्वास! ज्यांनी साईंवरच सर्व सोपवले तेथे काय उणे राहणार!

**सर्व सोपवा त्याला । निरोप द्या दुःखाला ।।**

असे मनी निश्चित करुन बाबांच्या कानावर ही गोष्ट घालायची. असे गोविंदरावांनी ठरविले. तशी संधीही बाबांनी उपलब्ध करुन दिली. त्याचवेळी माधवराव मशिदीत बाबांजवळ आले आणि गोविंदरावांनी मनात चळत असलेली इच्छा माधवराव देशपांड्यांना सांगितली. त्यावेळी बाबांच्या आजूबाजूस कोणीही नव्हते. होते ते फक्त स्वतः माधवराव व गोविंदराव. माधवरावांनी लगेच बाबांना हळूच म्हटले, अण्णासाहेबांची त्यांच्या बुद्धीनुसार आपले चरित्र लिहिण्याची इच्छा आहे. आपली परवानगी असावी. बाबा म्हणाले, माधवा, अरे मी एक भिकारी आहे. भिक्षेसाठी दारोदारी भटकतो. जे हाती पडेल ते खातो. मग माझे चरित्र कशाला! उगाच लोकांच्या थट्टेचा विषय होईल. तोच गोविंदराव नम्रपणे म्हणाले, बाबा आपणच माझे हातून लिहून घेणार आहात. आपल्या कृपेनेच माझ्या हातून सुरळीतपणे लेखन होईल.

क्षणात बाबांची कृपा झाली आणि ते म्हणाले, हेमाडपंत, तुमचे मनोरथ पूर्ण होईल आणि बाबांनी उदीचा प्रसाद दिला. गोविंदरावांच्या मस्तकावर प्रेमाने हात ठेवला व त्यांना म्हणाले, माझ्या वार्ता (उपदेश), कथा व अनुभवांचा संग्रह करा. त्यांची नोंद दप्तरी करुन ठेवा. तुम्हाला माझे पूर्ण सहाय्य आहे. हेमाडपंत तुम्ही फक्त निमित्त होणार आहात. मीच सर्व गोष्टी करवून घेतो, मीच सर्व घडवून आणतो. अहंकार जेव्हा नष्ट होतो तेव्हा मीच त्या भक्ताच्या मीपणात संचार करतो. माझी सतत आठवण ठेवा, तुम्हाला शांती मिळेल. भगवंताच्या भक्तीचा उगम होऊन अज्ञानाचा क्षणात नाश होईल. ज्याची श्रद्धायुक्त भक्ती असते त्याचा मी सदैव गुलाम राहतो. माझ्या कथा ऐकल्या, दुसऱ्याला सांगितल्या व त्याचे मनःपूर्वक चिंतन केले तर जीव आणि शिव दोघांनाही समाधान वाटेल व भक्त भक्तीने संपन्न होईल.

अशा तऱ्हेने बाबांचा पूर्ण आशिर्वाद गोविंदरावांना मिळाला आणि गोविंदरावांच्या निमित्ताने साईबाबांचे सत्यचरित्र भक्तांच्या कल्याणासाठी तयार झाले. आज अनंत भक्त आवडीने, भक्तीभावाने साईसच्चरित्र ग्रंथाचे पारायण करतात. बाबांच्या कथा आवडीने वाचतात. संतुष्ट होतात. साईभक्तीत रममाण होतात.

हेमाडपंत हे तसे भाग्यवानच म्हणावयास हवे. कारण अनंतकाळ त्यांना बाबांचा सहजासहजी सत्संग लाभला. त्यांच्याकडून अमृतमयी उपदेश श्रवण करण्यास मिळाले. अनेक घटनांचे साक्षीदार होता आले.

बाबांच्या अनंत लीला अनुभवण्यास मिळाल्या. विशेष म्हणजे बाबांनी हेमाडपंतांना अनुग्रहीत केल्यावर एक शिष्य म्हणून त्यांनी गुरुंची (बाबांची) आज्ञा प्रमाण मानली. त्यांच्यावर एकनिष्ठ प्रेम केले. बाबांचे उत्तम प्रेम त्यांनी ह्रदयात साठवून ठेवले अर्थात बाबांनाच स्वतःच्या ह्रदयात स्थानापन्न केले. गुरु हेच खरे ब्रह्म आहे असा ठाम विश्वास ठेवून इतर गोष्टींचा त्याग केला आणि गुरुंचे नित्य ध्यान करुन परमार्थ साध्य केला.

हेमाडपंताचे बरेच काही पुण्य गाठीशी होते म्हणून बाबांच्या रुपाने त्यांना साक्षात परमेश्वराची भेट झाली. म्हणूनच त्यांनी बाबांना आपल्या ह्रदयात साठवून ठेवले होते. त्यामुळेच हेमाडपंताच्या मनाला अपूर्व शांतता आणि संसारात सर्व पीडांपासून मुक्तता लाभली. बाबांच्या सहवासातून त्यांनी सर्व प्रकारचे सुख भोगले. कारण एकाग्रता व परमानंद यांनी परिपूर्ण असे एकमेव बाबाच होते. म्हणूनच हेमाडपंत म्हणतात, मानवाला सद्‌गती फक्त सद्‌गुरुंपासूनच मिळते. सद्‌गुरु जेव्हा एखाद्याचा हात आपल्या हाती घेतात तेव्हा त्याचा उद्धार झालाच पाहिजे.

मानवाच्या आयुष्यात सात गोष्टी महत्वाच्या मानल्या जातात. मंत्र, तीर्थस्थान, देव, ब्राह्मण, ज्योतिषी आणि वैद्य ह्या सहा गोष्टी. जीवनात ह्या सर्व सहा गोष्टींचा अंगिकार करतो. सातवी गोष्ट म्हणजे सद्‌गुरु! ते एकदा प्राप्त झाले की वरील सहा गोष्टींचे रुपांतर सद्‌गुरुंमध्ये होते. कारण या सर्वांचे माहेरघर म्हणजेच सद्‌गुरु! साईबाबा हे असेच होते, श्रेष्ठ संत!

## परब्रह्म सद्‌गुरु श्रीसाईबाबा.

आपल्या मराठीत एक म्हण आहे, जेथे चमत्कार तेथे नमस्कार! जो कोणी चमत्कार करुन दाखवितो त्याला देव मानले जाते.

आपल्या महाराष्ट्रात अनेक विभूती, संत-महात्म्ये होऊन गेले. त्यांचे जीवन पहाता आपल्याला त्यांचे अनेक चमत्कार दिसून येतील. श्रीसाईबाबांचेच घ्या! त्यांचे चरित्र नजरेसमोरुन घालता, चमत्कारांनीच पूर्ण भरलेले कळून येते. पण केवळ चमत्कार केला म्हणून ती व्यक्ती देव ठरते का ? सामान्य सिद्धिद्वारे सुद्धा चमत्कार घडू शकतो! ही कसोटीं जर श्रीसाईबाबांना लावली तर विचित्र अनुभव आपल्याला दिसून तेतात. कारण बाबांनी जे काही (चमत्कार) केले ते इतके विचित्र होते की आपली मती खुंटल्या शिवाय राहात नाही. मुद्दा असा, केवळ चमत्कार करुन माणसांना आपल्या नादी लावण्याचा उद्योग बाबांनी केला नाही. त्यांनी चमत्काराकरिता चमत्कार केले नाहीत तर त्यांच्या संतत्वाच्या कार्याचा भाग म्हणून ज्या सहजप्रवृत्ती होत्या त्यातून चमत्कार पाहायला मिळत होते व चमत्कारांचे दर्शन घडत होते.

आज भारताच्या कानाकोपऱ्यातून लोक बाबांच्या दर्शनासाठी शिरडीत येतात. सणवार, प्रत्येक गुरुवार

शिरडी भक्तांनी गजबजलेली असते. ज्यांना गुरुवारी जाता येत नाही ते सुट्टीच्या दिवशी वा रविवारी आनंदाने शिरडी गाठतात. ही सर्व माणसे वा भक्त एकाच जातीचे, पंथांचे नसतात तर सर्वधर्मीय, सर्व प्रांतीय, सर्व जातीचे आहेत. एकत्र दर्शन घेतात, एकत्र पूजा-अर्चा करीत असतात. एकत्र आरती करतात आणि एकत्र भोजन (भोजनालयात मांडीला मांडी लावून) करतात. मात्र आरतीच्या वेळी प्रचंड गर्दी पाहिली की ही सर्वधर्मपरिषद आहे की काय असेच वाटते.

थोडक्यात काय! शिर्डी अर्थात श्रीसाईबाबा हे अनंत अनंत लोकांचे श्रद्धास्थान बनले आहे. सर्व लोकांना (जाती-पंथ-धर्म) एकत्र आणण्याचे कार्य साईबाबांनी त्या काळात सुरु केले त्याचा पसारा वाढत गेला. सर्वांमध्ये समताभाव निर्माण करण्याचे कार्य बाबांनी केले, जे त्यांच्यापूर्वी श्रीमाणिकप्रभूंनी केले त्यावर बाबांनी कळस चढविला.

तसे पाहता, प्रत्येकाचे श्रद्धास्थान वेगळ असते. त्याच्या त्याच्या स्वधर्मानुसार त्या माणसाला देव, संत, विभूती आवडू लागतात. त्यानुसार त्याची श्रद्धा जडते.

## श्रीसाईंचा जन्म अर्थात अवतरणं

संतांचा या पृथ्वीतलावर जन्म कशासाठी होतो ? असे काय कारण अथवा कठीण कार्य असते त्यासाठी त्यांना भू-लोकी यावे लागते ? या प्रश्नाचे उत्तर साईबाबाच देतात, माणसे जेव्हा मानपान, स्त्री-पुत्र, धन यांनाच सर्वच मानून पारमार्थिक विचारांकडे पाठ फिरवतात, जाती-धर्म-पंथ यांमध्ये द्वेष माजतात तेव्हा धर्मजागृती करण्याकरीता संत देह धारण करतात. दीनांचा उद्धार करण्यासाठीच केवळ त्यांचा अवतार असतो. बाबांचा जन्म (अवतरण) अशाच प्रकारे झाला आहे. शिरडी ही केवळ मध्यबिंदू आहे आणि बाबांची समाधी म्हणजे भक्तांची मांदियाळी आहे. संतांचा मेळावा आहे. जो आपण नित्य पाहत असतो, अनुभवत असतो.

असे आहे, लोक आपली पापे (भयंकर असोत वा महाभयंकर) धुवून टाकण्यासाठी पवित्र नदी गंगेच्या ठिकाणी जातात. ती तिचे कार्य करे. परंतु स्वतःकडे घेतलेल्या पापांचे क्षालन करण्यासाठी तिला संतचरणांचा आश्रय घ्यावा लागतो. मग गंगा-यमुना-गोदावरी यांची यात्रा करण्यापेक्षा संतांचे चरण का धरु नये? श्रीसाईनाथांनीच ते प्रत्यक्षरित्या दासगणूंना दाखवून दिले.

एकदा पर्वविशेषाच्या निमित्ताने दासगणूंना प्रयाग तीर्थात स्नानाला जावे असे वाटू लागले. म्हणून ते बाबांची आज्ञा घेण्यास आले, बाबांनी त्यांना उत्तर दिले, इतक्या दूर वर जाण्याची गरज काय ? हेच प्रयागतीर्थ आहे. पक्का विश्वास बाळग! दासगणू हे बाबांचे परमभक्त. त्यांच्यावर दृढ विश्वास, अनन्य श्रद्धा असलेले व्यक्तिमत्व. बाबांनी हेच प्रयागतीर्थ असे म्हणताच दासगणूंनी बाबांच्या चरणी मस्तक ठेवताच बाबांच्या दोन्ही अंगठ्यांतून

जलधारा निघाल्या. जणू गंगा-यमुनाच पाझरल्या! हा चमत्कार पाहून दासगणू गहिवरल्याशिवाय कसे राहतील! त्यांच्या तोंडून निघाले, बाबा आपण महाविष्णू होऊन आपल्या पदकमलांना प्रयाग बनविले आणि दोन्ही अंगठ्यातून गंगा-यमुनेला येथे आणविले. असे असूनही माझे मन उगी भटकत राहते, त्याला तुम्ही स्थिर करा.

असे होते साईबाबा आणि आजही तसेच आहेत, जे आपल्या भक्तांसाठी नाना लीला करतात.

श्रीबाबांचे माता-पिता कोण? त्यांचा जन्म कोठे झाला? ते कोठून शिर्डीला आले? ते देहाने शिर्डीत वावरत असता अनेकांनी त्यांच्याबद्दल जाणून घेण्याची शिकस्त केली, परंतु 'मी परमेश्वराचा गुलाम आहे' या पलीकडे बाबांनी कोणासही काही सांगितले नाही.

श्रीसाईंचे जीवनचरित्रच अगाध आहे, तसा त्यांचा जन्म अतर्क्य (गूढ) होय असे म्हणता येईल. याचे कारण काहींचे म्हणणे असे, बाबांचा अयोनिजन्म आहे. ते खरे वाटते. कारण अयोनिजन्म संभावनीय असतो. मात्र तो अवतारांचाच होतो. तसे दाखलेही सापडतात. नवनाथांचे उदाहरण आहेच. त्यातहि परमेश्वरावर प्रखर निष्ठा असल्यावर, त्याच्या अगाध लिला मान्य केल्यावर अयोनिजन्म मान्य करावा लागतो. मग साईबाबांचा जन्म जर अयोनिजन्म मानला तर ते अवतार हो हे क्रमप्राप्त होते. परमेश्वर अवतार घेतच राहतो. म्हणूनच महर्षि व्यास म्हणतात, भगवंत तिनयुगात (सत्ययुग, त्रेतायुग व द्वापारयुग) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अवतार घेतो आणि कलियुगात विभूतीरुपाने, संतांच्या वा आचार्यांच्या रुपाने प्रगट होतो. फक्त नावे वेगळी हाच फरक! मग कोण होते श्रीसाई?

## साईनाथांचा अज्ञात पूर्वकाल.

श्रीसाईनाथांचे बरेचसे जीवन अर्थात पूर्वकाल हा अज्ञातच राहिला. तो मेहेरबाबांच्या वाङ्मयात साईशरणानंदाच्या कथेत आढळून येतो. तो येथे थोडक्यात वर्णन करण्याचा प्रयत्न झाला आहे, अशाप्रकारे;

औरंगाबाद येथील पाथरी (आताची परभणी) येथून येणाऱ्या भक्तांकडे बाबा तेथील काही व्यक्तींची चौकशी करीत असत. आपले गुरु आणि वडिलांसारखे पूज्य असे फकीर रोशन शहा, सद्‌गुरु व्यंकुशा यांचा उल्लेख करीत. निंबाखालची तूर्बत ही आपल्या गुरुंचे स्थान आहे असे म्हणत. म्हणून बारा वर्षे त्यांच्या स्थानी अविरत सेवा केली. ''मशिदीतील माझा फकीर मला जे सांगतो त्याप्रमाणेच मी करतो, सर्वांशी बोलतो, दक्षिणाही मागतो,'' हे विधान सत्य-सत्यता पटवून देते. दुसरे सत्य असे की, बाबांचा जन्म पाथरी येथेच झाला होता याची नोंद दासगणू, सत्यसाईबाबा, मेहेरबाबा आणि दिगंबर स्वामी (हे वज्रेश्वरीचे) यांच्या साहित्यात आढळून येते.

बाबांच्या वडिलांचे नाव हरिहरपंत आणि आईचे नाव गिरिजाबाई होते असे म्हटले जाते. काही जणांचे म्हणणे

# गुरु महिमा

होते, अवंतिका व गंगाधर अशी आई-वडिलांची नावे होती. असो; परंतु बाबांनी कधीही आपल्या माता-पित्याचे, गणगोताचे नाव कोणालाही सांगितले नाही वा प्रगटही केले नाही. चौकशी करणाऱ्यांना शनिवार पारावरील दोन हनुमान मूर्तींकडे बोट दाखवून, ते माझे माय-बाप असे सांगून गप्प बसवित, हे सर्वश्रूत आहेच.

गिरीजाबाई व हरिहरपंत हे पाथरी येथील राहणारे. अनेक वर्षे अपत्य नसल्याने त्यांनी खुलदाबाद येथील जालंदर नाथांच्या स्थानाकडे पुत्रप्राप्तीसाठी नवस केला. जालंदरनाथांची ही साक्षात्कारी समाधी होती. त्याचे फळ म्हणून 'आत्माराम' (साईबाबा) जन्मास आले. वर म्हटल्याप्रमाणे उपासनी महाराज व मेहेरबाबा यांच्या परंपरेतील साधू दिगंबरस्वामी यांनी स्वतः लिहिलेल्या 'साईचरित्र' या पुस्तकात बाबांची जन्म कहाणी नमूद करुन ठेवली आहे.

त्या कालखंडाप्रमाणे संतान प्राप्तीसाठी साधू, संत, पीर, अवलीया, मलंग इत्यादींना नवस करायचा आणि तो पूर्ण झाला की सचोटीने, प्रामाणिकपणे ते बालक संतसेवेसाठी अर्पण करायचे. यासाठी केवढा निग्रह आवश्यक असेल याचा आपण विचारच करु शकत नाही. गिरीजाबाई आणि हरिहरपंत यांनी 'आत्मारामाला' जालंदरनाथांच्या स्थानानिकट असलेल्या झरझरीझरबक्ष या सुफी संताच्या समाधीचे मुजावर मौलवीबक्ष (यांनाच रोशन शहा म्हणतात) यांच्या हाती सूर्पद केले. त्यांनीही या दैदिप्यमान बालकास नवसाच्या अटीप्रमाणे आपल्याकडे घेतले आणि घरी सांभाळ केला. सन १८३६ ते १८४८ या बारा वर्षांचा काळात रोशन शहा फकीर व त्यांची पत्नी या दोघांनीही आपल्या प्रेमळ दृष्टीखाली या सुकुमार आणि तेजस्वी बालकावर इस्लामचे, कुराणाचे आणि सुफी साधनेचे दृढ संस्कार केले. मुस्लीम ग्रंथाचेही शिक्षण दिले. या संस्कारामुळेच बाबा फकीर वाटत. आपल्या या फकीर माता-पित्यांची प्रेमकृपा बाबा कधीच विसरले नाहीत.

पुढे रोशन शहा या सिध्द फकीराने अल्लाच्या आज्ञेप्रमाणे गोदावरीत स्नान करुन शिरडीग्रामी निंबाखाली तप करुन तेथेच आपले देह विसर्जन केले. आपल्या या गुरुंना अभिवादन करण्यासाठीच बाबा सर्वप्रथम १८५४ मध्ये या स्थळी येऊन दोन महिने गुरु स्मरणात रमले होते. म्हणून बाबांनी या स्थानाला ''माझ्या वडिलांचे स्थान'' असे संबोधिले. याच जागी बाबानी पुढे झेंडू-गुलाबाची बाग फुलविली. ज्या रोशन शहांनी बाबांना घडविले होते त्यांनीच या बालस्वरुप साईस मलंग गडावर नेऊन पीरान्-पीर-दस्तगीर (सुफी पंथांत दत्तप्रभूंना या नावाने हाक मारली जाते वा त्यांना वरीलप्रमाणे म्हटले जाते) अशा मलंगरुपी प्रभू दत्तात्रेयांचे सगुणरुपी दर्शन घडविले.

आपल्या पालक व गुरु रोशन शहांच्या देह विसर्जनानंतर बाबा सहा वर्षे (१८४९ ते १८५४) व्यंकुशांच्या आश्रमात राहिले. व्यंकुशा यांचे मूळ नाव गोपाळस्वामी. बाबा व्यंकुशांच्या आश्रमात आले म्हणजे बाबांची फकीर माता त्यांना तेथे घेऊन आली.

# गुरु महिमा

व्यंकुशा म्हणजेच गोपाळस्वामी हे मराठवाड्यातील शेलू (जिंतूर विभाग) ग्रामीचे एक महान संत होते. त्यांची भक्ती, त्यांचे वैराग्य अलौकिक होते. असे स्पष्टपणे सांगितले जाते, गोपाळस्वामी हे पूर्वजन्मीचे कबिरांचे गुरु रामानंद होते. तिर्थयात्रेच्या निमित्ताने ते अहमदाबाद येथे पीर सुबाग शहा यांच्या दर्ग्यात असताना विलक्षण दृष्टान्त झाला होता. आणि तशी आकाशवाणीही झाली होती, पूर्वजन्मी तू कबीरांचा गुरु रामानंदस्वामी असून कबीर पुन्हा ‘साई’ नाम धारण करुन तुझ्या घरी ज्ञानप्राप्तीसाठी येणार आहेत. अल्ला मियानेच तुमच्या स्कंधावर कबीरांना त्यांच्या नव्या अवतारात भागवद् भक्तीचे मार्गदर्शन करण्याचे कार्य सोपविले आहे.

ईश्वराची ती आकाशवाणी (आज्ञा) शिरसावंद्य मानून व्यंकूशा आपली तीर्थयात्रा आटोपून लागलीच आपल्या आश्रमात परतले आणि दुसरेच दिवशी आपल्या फकीर मातेसह बाल साई त्यांच्या समोर हजर झाले. व्यंकुशा अत्यानंदाने त्या दोघांना सामोरे जाऊन त्यांनी त्या बालकास ‘‘या शिव’’ असे म्हणून स्वागत करुन आपल्या ह्रदयाशी कवटाळले. त्याच्या फकीर मातेलाही आपल्या आश्रमात मोठ्या प्रेमाने ठेवून घेतले. काही काळातच बाल साई व्यंकुशांना प्रिय झाले.

तो काळ आहे १८४९ ते १८५४ चा! आपल्या गुरुंच्या शिवपूजेची सारी तयारी बाल साई करुन ठेवित असे. त्यामुळे व्यंकुशा अत्यंत आनंदी व प्रसन्न असत. या यवनासारख्या दिसणाऱ्या बालकाची साहजिकच इतर हिंदू शिष्य असूया करीत. त्याचा बाल साईंना खूप त्रास होत असे. पण ते आपल्या गुरुंच्या सेवेत आनंदाने मग्न असत. या नविन गुरुंनी बाल साईंना गीता आणि भागवत भक्तीचा, ज्ञानाच्या उपासना शिकविल्या. बालसाई सुफी साधनेप्रमाणे हिंदूच्या गीता-भागवत साधनेतही परिपूर्ण होऊन राहिले. साक्षात शिव वैष्णव संतांच्या घरी राहून शिक्षण घेत होता. हरि-हर हे दोघेही एकच! शिव हा हरिची उपासना करतो आणि हरि शिवाची! मग तेथे द्वैतभाव उरेलच कसा?

व्यंकुशा आपले गुरु आहेत याचे स्पष्टीकरण खुद्द साईनाथांनीच धुळे कोर्टाच्या कमिशनपुढे साक्षी देताना सांगितले ते अशा तऱ्हेने;


आपण कबीरपंथी असून व्यंकुशा हे आपले गुरु आहेत. त्याही पुढे बाबा म्हणाले, माझे गुरु व्यंकुशा हे आज हयात असते तर त्यांची सेवा करण्याची व त्यांच्याकडे प्रेमाने ह्रदय मोकळे करण्याची संधी आम्हांला आज लाभली असती. अशी सह्रदय भक्ती साईंनी व्यंकुशांच्या चरण कमली वाहिली होती.

मध्ये एके ठिकाणी उल्लेख आला आहे की बाल साईंना यवन समजून हिंदू शिष्य असूये पोटी त्यांना त्रास देत होते. एकदा एक घटना घडली, एका अतिरेकी शिष्याने यवन सदृश्य साईंवर वीट फेकून मारली ती डोक्यावर बसून जखम झाली. तेव्हा व्युंकुशांनी बाबांना डोक्यावर झालेली जखम स्वतःच्या वस्त्राने बांधली. तेव्हापासून बाबांच्या डोक्यावर फडका कायमचा झाला. कारण तो आपल्या गुरुंचा कृपाप्रसाद आहे हे बाल साईंनी जाणले

होते.

जी वीट त्या अतिरेकी शिष्याने फेकून मारली होती तीच वीट व्यंकुशांनी बाबांचे पुढील अद्वितीय कार्य त्यात बंदिस्त करुन साईंची कायमची सोबतीन म्हणून बाबांना भेट दिली. आणि सदैव जवळ बाळगण्याची आज्ञा केली. हा ही प्रसाद साईंनी अत्यानंदाने स्वीकारला. व्यंकुशांचा तो फडका आणि ती वीट या दोन्ही गोष्टी बाबांच्या तहह्यात जीवनाच्या सांगातीण ठरल्या.

समाधी घेण्यापूर्वी व्यंकुशांनी आपल्या या शिष्याला तेजस्वी व अलौकिक बनविण्यासाठी एक चमत्कार केला, एका भटक्या लमाणातील एक वांझ गाईस बोलावून घेतले आणि तिला कामधेनू म्हणून प्रतिकरुपाने दोहून तिचे तीन शेर दूध काढून ते साईंना भक्ती-योग-ज्ञान म्हणून पाजले, आणि साईंना शिरडीच्या दिशेने रवाना केले. कारण तेथे साईंचे प्रथम गुरु रोशन शहा आपल्या लाडक्या मुलाची, शिष्याची आतुरतेने वाट पहात होते.



खंडेरायाच्या मंदिरात म्हाळसापती आणि साईंची प्रथम भेट

## खंडेरायाचे पुजारी म्हाळसापती.

श्रीसाईनाथांची शिरडीत प्रथम पदस्पर्श झाला तो सन १८५४ च्या दरम्यान. त्यावेळी बाबांचे वय होते अवघे एकोणीस वर्षांचे. निंबाच्या छायेखाली (आपल्या गुरुंच्या समाधी स्थानी) दोन महिने वास्तव्य करुन तो बालफकिर चार वर्षांच्या परिक्रमेसाठी अज्ञातवासात निघुन गेला. पुढे १८५८ साली औरंगाबाद मार्गे येत असता घोडी हरवलेल्या चांदभाईंची भेट झाली आणि बाबांचा अद्‌भूत चमत्कार पाहून चांदभाई भक्त बनला. त्याच्या गावी येण्याच्या निमित्तमात्रे एका लग्नाच्या वऱ्हाडासोबत बाबा पुन्हा शिरडीत अवतरले. खंडोबाच्या मंदिरात बाबांशी प्रथम भेट झाली ती म्हाळसापतींशी. त्यांनी ''आओ साईं'' अशा शब्दाने बाबांचे स्वागत केले. परंतु साईंनी मंदिराच्या पायऱ्या चढून आत येऊ नये असे म्हाळसापतींना वाटत होते. कारण हा फकिरी वेष असलेला एक मूर्तिभंजक यवन वाटल्याने त्याच्या स्पर्शाने खंडोबा विटाळेल अशी भीती म्हाळसापतींना वाटली. त्यांच्या मनातली शंका जाणून बाबा म्हणाले, हे अज्ञानी भगता, मी यवनही नाही आणि मूर्तिभंजकही नाही. माझ्या स्पर्शाने तुझ्या खंडोबाला विटाळ लागणार नाही. तो स्वतः पतीत पावन असा शिव

आहे. त्याच्या स्पर्शानेच सर्व जग मंगल, शुद्ध व पावन होते. मग त्याला विटाळ कसला? देव मंदिर वा मशिदीत राहतो का? सारे विश्व त्याचे मंदिर आहे मग त्याला दगडांच्या चार भिंतीत कोंडता येईल का? त्याला ना नाव, ना रुप. तो निराकार असून त्याची जागा भक्ताचे हृदय आहे. त्याला फुले-फळे, अंगाऱ्याची जरुरी नाही. त्याला कोणता धर्म-पंथ-जात नाही. भक्तांच्या श्रद्धेत, त्याच्या निष्काम कर्मात आणि योग्याच्या स्वानंदात तो राहतो. त्याच्या प्राप्तीसाठी अखंड समर्पण आणि शरणागती महत्वाची आहे. असा दिव्य उपदेश म्हाळसापतींना करुन बाबा खंडेरायाच्या पायरीवर बसलेल्या बाळा शिंपी व महादू फासले यांच्याबरोबर निंबाखाली गुरुसमाधीकडे निघून गेले.

श्रीसाईनाथांची ही पहिली व दिव्य ओळख म्हाळसापतींच्या द्वारे शिरडीला झाली होती. परमेश्वराच्या चरणी अखंड समर्पण व शरणागती हा दिव्य संदेश देण्यासाठीच बाबांचे अवतरण झाले होते. त्याची नांदी खंडोबाच्या पायरीवर झाली. मानवता, प्रेम, करुणा, सर्वधर्म समभाव, परमेश्वराची एकता, समरसता इत्यादींची नवी दिशा, नवा मार्ग देण्यासाठीच भगवंत साईरुपात शिरडीत दाखल झाला होता.

म्हाळसापती हे एक अल्पशिक्षित, सनातनी वृत्तीचे, जुन्या जमान्यातील पुजारी. त्यांचे पुजारीपण त्यांना वंशपरंपरेतून प्राप्त झाले होते. परंतु बाबांच्या जीवनात त्यांना अगदी प्रथम भेटलेले आणि शेवटपर्यंत बाबांशी एकनिष्ठा ठेवून राहिलेले! हा एक विलक्षण योगायोगच असावा. एक फकीर आणि उन्मुक्त साधुला एक सात्विक व खंडोबाचा हिंदु पुजारी म्हणून पहिला भक्त भेटला होता.

म्हाळसापती हे तसे भाविकच! त्यांना संतमंडळींबद्दल प्रेमभावना होती. परंतु त्यांना पारखण्याची त्यांची सवय होती. येथे एक मुस्लीम फकीर त्यांच्यासमोर उभा होता आणि हे हिंदु! त्यामुळे साई त्यांना मूर्तिभंजक वाटले. म्हणून म्हाळसापतींच्या मनाईमुळे बाबा मंदिरात वा मंदिराजवळ स्थिरावले नाहीत. त्यांचे म्हणणे वा त्यांनी केलेली मनाई बाबांनी आनंदाने मान्य केली. पुढील काळात हेच म्हाळसापती बाबांचे तेज आणि कर्तुत्वाने भारावून त्यांचे निस्सीम भक्त झाले. बाबांना गंध लावणे, त्यांच्या चरणांची पुजा करणे, हा मान सर्वप्रथम म्हाळसापतींनाच मिळाला.

शिरडी हे लहानसे खेडेगांव. अशा या गावात जी काही थोडी जमीन होती ती ही नापीक असल्याने शेतकी उत्पन्नाची आशा नव्हती. तरीही म्हाळसापती संयमी व सात्विक जीवन कंठत होते. सोनारकीचा व्यवसाय होता परंतु या लहानशा खेडेगावात त्याप्रमाणे दागिन्यांचे काम मिळत नसे. मंदिरात ठेवल्या जाणाऱ्या तुटपुंज्या द्रव्याचे काही उत्पन्न मिळे. ते सुद्धा फुले, हार, अगरबत्ती इत्यादींसाठी खर्च होत, इतके अल्प असे. परंतु म्हाळसापती हे संयमी, व्रतस्थ आणि सात्विक व्यक्तिमत्व! आपले नित्य जीवन आनंदाने व निर्धाराने जगत. व्रतस्थ राहून पुजापाठ करणे, खंडेरायाचे माहात्म्य पठण करणे, साधू-संत-फकीर यांचा आदर करणे, हे त्यांचे जीवन ध्येय

असल्याने दारिद्र्याची तमा न बाळगता या जीवनात मोक्षाची प्राप्ती व्हावी हिच त्यांची प्रबळ इच्छा होती. त्यासाठीच व्रत-वैकल्ये, सत्संग, साधूसेवा तन-मनाने करीत.

शिरडीत बाबांचे आगमन झाल्यानंतर त्या सुरुवातीच्या काळात त्यांचे बरेचसे वर्तन एखाद्या वेड्यासारखे होते. स्वत:शीच बडबडणे, रागीष्ट होणे, मारावयास धावणे, कधी पायात चाळ बांधून नाचणे, दूर कोठे रानात गडप होणे, रात्रीच्या समयी वेगवेगळ्या भाषेत काहीतरी बडबड करणे, मोठमोठ्याने कुराणातील कलमे म्हणणे, इत्यादी इत्यादी! साहजिकच लोकांना ते वेड्यागतच वाटणार! त्यामुळे लोकांना बाबांविषयी श्रद्धा वाटत नव्हती. परंतु म्हाळसापती हे संतसंगतीत राहिलेले, कित्येक पोथ्यातून उन्मत्त साधू-पुरुष कसे वर्तन करतात त्याची कल्पना असल्याने त्यांची बाबांवरील श्रध्दा अजिबात ढळली नाही. उलट ती उत्तरोत्तर वाढून बाबांविषयी भक्तिभाव, बाबांचे जीवन, वर्तन, बोलणे-चालणे याबद्दलचा आदर अधिक दृढ झाला आणि म्हाळसापती श्रीसाई चरणी लीन झाले.

म्हाळसापती म्हणजे वैराग्य आणि संयम याचा जणू मिलाफ! गरीबी असूनही स्त्री व धन यांची मुळीच लालसा नव्हती. दुसरीकडे बाबा, तेही पूर्ण वैराग्यशाली असल्याने त्यांना तरी कुठे ही स्त्री-धनाची कामना! ह्या दोघांतील साम्यानेच बाबा आणि म्हाळसापती, या दोघांत एक अतुट प्रेमाचे बीज निर्माण झाले. बाबांचे थोरपण, साधुत्व आणि सिध्दत्व त्यांच्या हृदयात दृढ होऊन त्याचा अविष्कार म्हाळसापतींच्या आचरणातून प्रकट होऊ लागला. गंध-फुलांनी बाबांची नित्य पूजा करण्याचा प्रघात प्रथम त्यांनीच पाडला. श्रीसाईंच्या गुरुतुल्याची ती पहिली निशाणी होती. एका उन्मत्त आणि वेडेपणा असलेल्या फकिराच्या दैवी शक्तीची गुणसंपदा समजण्याची क्षमता, दृष्टी म्हाळसापतींना मिळाली होती. याचे कारण त्यांची खंडोबावर असलेली श्रद्धा व त्याची उपासना, वंशपरंपरेने आलेली पुरोहित वृत्ती आणि सत्संग होय.

श्रीसाईनाथांना अंतर्ज्ञानाने म्हाळसापतींचे मागील अनेक जन्म-कर्म माहित होते. या ऋणानुबंधामुळेच त्यांना बाबांचा सहवासाचा सर्वाधिक लाभ प्राप्त झाला. किंबहूना बाबांनीच आपला सहवास चावडी व मशीद या दोन्ही स्थानांतून त्यांना लाभू दिला. बाबा रोज शेकडो रुपये वाटीत. पण त्यातील एक कवडीही कधी म्हाळसापतींना दिली नाही. त्यांचे निर्लेप दारिद्र्य त्यांना भोगू दिले.

म्हाळसापती हे एका ग्रामीण दैवताचे पुजारी! खंडोबाची महती गाणारे, कर्मठ पण सात्विक असे भगत. केवळ उपासना, तप आणि सत्संग करण्याकडेच त्यांचा कल होता. त्यामुळे साधु-संत, फकीर, संन्याशी आणि अवलीया यांचा ते अपार आदर करीत. बाळाराम, देवीदास, काशीराम, जानकीदास इत्यादींच्या संगतीने संत-सज्जनांची सदा सेवा करीत असत. हाच तो ऋणानुबंध ज्याने साईबाबा खंडोबाच्या दाराशी आले. म्हाळसापतींच्या सनातन व कर्मठ वृत्तीने बाबांना मुसलमान व मूर्तिभंजक मानून त्यांना खंडोबापाशी थारा दिला

नाही. परंतु या दोघांच्याही सत्ववृत्तीने, तपाने, चारित्र्यशीलीने भक्तनिष्ठा बळकट झाली आणि स्वत: म्हाळसापती बाबांचे एकनिष्ठ पुजक व सेवक बनले. इतके की जवळजवळ ६० वर्षे त्यांना बाबांचा सहवास लाभला.

बाबा एक दिवस मशिदीत तर एक दिवस चावडीत झोपत असत. त्यांच्या समवेत म्हाळसापती आपला संसार सोडून सोबत करीत. बाबा त्यांना आपल्या ह्रदयावर हात ठेवून जागे राहण्यास सांगत. बाबांच्या ह्रदयातील अखंड रामनाम म्हाळसापतीच्या ह्रदयातही होऊ लागू दे असा त्याचा अर्थ होता. प्रभूनामाचे दिव्य प्रात्याक्षिकच बाबा जणू त्यांना दाखवू पहात असावेत.



बायजाबाई

## वात्सल्याची मूर्ती बायजाबाई.

शिरडीचे गणपत तात्या कोते पाटलांची बायजाबाई ही पुण्यचरित पत्नी ! तिचे बाबांबद्दल वाटणारे मातृवात्सल्य व अपार प्रेम हे एका महान अवतारी आणि विरक्त महापुरुषाच्या जीवनातील एक भावरम्य अध्यायच आहे. एका कडकडीत वैराग्यशाली नवयुवकावर बायजाबाईंनी मातृप्रेमाचा अखंड वर्षाव केला.

त्याकाळी बाबा एकाच ठिकाणी स्थिर नसत. कधी रानावनांत एकाग्रतेत चूर असत, तर कधी पानसाबरींच्या जंगलात अनवाणी उन्हातान्हात भटकत. ते पाहून बायजाबाईंचे मातृवात्सल्य उफाळून येऊन कळवळून येई. एका टोपलीत भाजी-भाकर घेऊन ती माता वणवण भटकून या बाल फकीराला शोधून काढी आणि प्रेमाश्रुंबरोबर भाकर-तुकडा भरवी. या महान संत विभूतीलाही बायजाबाईंच्या मातृऋणाखाली नमावे लागे. हा बाल फकीर बायजाबाईला मामी, माझ्या कोत्याची माय म्हणे. जणू खरोखरीच ती कोणा एका जन्मात त्यांची आई होती, मामी होती. भगवंत शेवटी भाव-भक्तीचा भुकेला असतो. हे सत्यच आहे !

बायजाबाई बाबांना भाकर भरवतांना ते म्हणत, मामी तू माझ्यासाठी इतके कष्ट का घेतसे ? मी एक वेडा, भणंग फकीर ! तुझ्या सारख्या लक्ष्मीने इतकें श्रम घेण्याची माझी योग्याता नाही. मी सर्व घरदार सोडून असा भटकत असतो. माझ्यावर एवढे प्रेम कशाला करतेस ? खरंच तू माझी जन्मोजन्मीची माय आहेस म्हणूनच तुझ्यांकडून हे मातृप्रेम प्रकट होत आहे. इतर बालकांप्रमाणे मी सुध्दा तुझा बालक आहे. तुझा मुलगा तात्या आणि मी यात काहीही फरक नाही.

तेव्हा बायजाबाई म्हणे, तुझ्या दर्शनासाठी हा जीव कासावीस होतो. तुला भुकी-तहानलेला पाहून ह्रदय

कळवळून येते. म्हणून रानोरानी भटकून तुला शोधून एक घास भरविला की भाग्य उजळल्याचे अपार समाधान मिळते. तुझी लहान, तेजोमय मूर्ती पाहून जीव शांत होतो. तुझ्या बालरुपात मला ब्रह्म दिसते. कृष्णाचे शामल सगुण रुप दिसते. म्हणूनच या काट्याकुट्यातून, धुळीत माझे वात्सल्य प्रेम उफाळून येते. तन-मन डोलू लागते.

तेव्हा बाबा म्हणत, माते, भगवंतच मातेचे रुप घेऊन स्वतःच मातृप्रेमाची, मातृवात्सल्याची चव घेत असतो. आई तू फार धन्य आहेस.



साईबाबा आपल्या भक्तांसोबत

केवढे हे माय लेकरांचे विलक्षण आणि दिव्य प्रेम! ह्याला बरे कशाची उपमा लागेल!

बाबा बायजाबाईच्या मातृवात्सल्याचे व सेवेचे ऋण कधीच विसरले नाहीत. तिच्या मुलाला त्यांनी आपले सख्यत्व दिले, लहान बंधूप्रमाणे वाढविले, सांभाळ केला. अंती बायजाबाईला (आपल्या मामीला) बाबांनी दिव्य दर्शन देऊन मुक्त केले. तिच्या अंत्ययात्रेवेळी बाबा धायमोकलून रडले. टाहो फोडून म्हणाले, माझ्या कोत्याची माय गेली! माझी मामी मला सोडून गेली.

एका ईश्वरी अवताराने बालकासारखे अश्रू ढाळून टाहो फोडावा आणि आपल्या मानलेल्या सामान्य संसारी मातेला भाषांजली वाहावी, सर्व काही अलौकिकच!

धन्य ती बायजाबाई आणि धन्य धन्य साईबाबा! धन्य ती माता आणि धन्य तिचा मानसपुत्र!

## शाम्याची सख्य भक्ती.

म्हाळसापतीनंतर बरोबर एका तपाने शाम्याची बाबांजवळ येण्याची वेळ साधली. एक साधा शाळा मास्तर! प्राथमिक शिक्षक! पूर्ण साक्षर नाही वा तसा श्रध्दावानही नव्हता. पूर्वपुण्याईमुळे मशिदीजवळच्या शाळेत कार्यरत झाला होता. रोज शाळेच्या खिडकीतून बाबांचे चिलीम ओढणे, त्यांच्या विचित्र करणी न्याहाळत असे. बाबा प्रथम त्याला भगंण, वेडे वाटायचे. बाबांची चिलीम पिण्याची सवय पाहून त्यालाही एके दिवशी तंबाखूचा झुरका घेण्याची इच्छा झाली आणि मुलांना वर्गात बसवून शाम्या मशिदीची पायरी ओलांडून बाबांकडे आला. मग ते नित्याचे होऊन बसले. बाबांनीही त्याला जवळ केले. हळूहळू शाम्याला वेड्या फकीराच्या जागी एक उन्मत्त साधू असल्याची जाणीव झाली आणि तो बाबांचा भक्त झाला. बाबानीही हळूहळू त्याच्याकडे आपला ७२

पिढ्यांचा ऋणानुबंध असल्याचे उघड केले. पदोपदी त्याची काळजी वाहिली. काही काळातच शाम्या, बाबा आणि भक्त यातील मध्यस्थ बनला. बाबाही त्याचे ऐकू लागले. त्याच्या मनासारखे करु लागले, आणि दोघांच्या संबंधातील व सत्संगाची घडण बनली.

शाम्याला नित्य विष्णूसहस्त्रनामाचे पठण करण्यास सांगून बाबांनी त्याला आपल्या विष्णूतत्वाशी जोडून घेतले. अल्पशिक्षित, अल्पबुध्दी आणि विवेकाचा शाम्या बाबांच्या अंतरंगात सामावून गेला. अत्यंत प्रेमभावाने बाबांनी त्याला सांभाळले, संगोपन केले, जवळ बाळगले. ऋणानुबंधाप्रमाणे बाबांनी शाम्यावर अपार प्रेम होते. म्हणून शाम्यासाठी बाबांनी काहीवेळा मर्यादा मोडून नियतीचा रेघा उल्लंघली होती. त्याची सख्य भक्ती स्वीकारली होती. परंतु प्रापंचिक व व्यावहारिक लौकिक भूमिका असलेल्या शाम्याला बाबांची थोरवी त्यांच्या हयातीत समजली नाही. बाबांच्या देहवासानंतर मात्र बाबांचे दिव्यत्व, प्रेम, कनवाळूपणा आठवून धाय मोकळून रडला. परंतु बाबांनी मात्र शाम्याचा उध्दार केला.

ज्या भक्ताला सद्‌गुरुंचा सहवास व प्रेम लाभले, त्याचा सर्व भार सद्‌गुरु आपल्या शिरी धारण करतात, त्याचे प्रतिक म्हणजे शाम्या होय.

आनंदनाथ महाराजांची साईनाथांशी भेट.

आनंदनाथ महाराज हे स्वामी समर्थांचे अनुयायी संत! उत्तम कवी आणि द्रष्टे महापुरुष! बाबांची प्रथम पारख केली ती आनंदनाथ महाराजांनी. एकदा ते सावरगावी आले होते. त्याचा बोलबाला होऊन ही वार्ता शिरडीत पोहचली. या संत पुरुषाला शिरडीत नेण्यासाठी दगडू गायके, नंदराम मारवाडी इत्यादी मंडळी बैलगाडी घेऊन सावरगावी आले. आनंदनाथही आनंदाने बैलगाडीत बसून शिरडीत येते झाले. तेथे येताच बाबा एका कच्या मडक्यातून गुरुस्थानी लावलेल्या झेंडू-गुलाब रोपट्यांना पाणी घालीत असलेले दिसले. दोघांची नजरानजर झाली. आनंदनाथांना धन्य धन्य वाटले. त्यांनी गायके आणि मारवाडी यांचे मन:पूर्वक आभार मानले आणि आदराने म्हटले, हा हिरा शिरडीला गवसला, त्यांच्या पदकमलाने ही भूमी पवित्र-पावन झाली. हे तरुण फकीर स्वामी समर्थांचीच छबी आहेत. सर्व सिध्दांचा मुकुट मणी आहेत. साक्षात परमेश्वर या फकीराच्या रुपात तुमच्यात वावरतो आहे. हा अनमोल हीराच देशाचेच नव्हे तर विश्वाचे कल्याण करील. या महासिध्दाच्या केवळ दर्शनानेच माझे मन शुध्द आणि पवित्र झाले आहे. स्वामींनीच मला, ते शिरडीत येऊन वास्तव्य करणार आहेत, हे गुपित कथन केले होते. ते आज प्रत्यक्ष अनुभवत आहे. स्वामींची पवित्र शक्तीच या सिध्द फकीरातून कार्यरत होईल. आता या शिरडी गावाला माझ्या आशिवार्दाची गरज नाही.

## समर्पण भक्ती केलेले काशीराम शिंपी


सन १८५८ मध्ये सर्वप्रथम भेटलेले भक्त म्हणजे काशीराम शिंपी. खंडोबा मंदिराच्या पायरीवर म्हाळसापतींच्या साक्षीने ही भेट घडली होती. त्या भेटीतच त्यांची बाबांवर भक्ती जडली. म्हाळसापती, अप्पा, देविदास हे अत्यंत गरीबीत दिवस काढणारे ! काशीरामकडे मात्र चांगले ऐश्वर्य होते. वरील मंडळी त्याचबरोबर बायजाबाई हे सारे बाबांची सेवा करायचे. तर काशीराम बाबांना लागणारे साहित्य अर्थात बाबांची हिरवी कफनी, टोपी त्याशिवाय धुनीसाठी लाकडे इत्यादी गोष्टी पुरवत असत. प्रथम प्रथम ते मिळालेला पैसा बाबांच्या पायाशी ठेवून त्यांना ते घेण्याचा आग्रह करीत. पण बाबा ते नाकारीत ! पुढे त्याचा अहंकार छाटण्यासाठी बाबा स्वतःहून त्याच्याकडे पैशाची मागणी करायला लागले. त्यामुळे त्याच्या उत्पन्नात घट होऊ लागली. परंतु काशीराम हे सच्चे भक्त असल्यामुळे त्यांना कळून चुकले, बाबा हे अद्‌भूत करणी करणारे फकीर आहेत, त्यांना कोणीही काहीही देऊ शकत नाही. त्यांचा अहंकार गळून पडला आणि चमत्कार घडला. काशीरामांची बिघडलेली परिस्थिती सुधारत गेली.

देवीदास साधूंनी त्यांना रोज मुंग्यास साखर घालण्यास सांगितले होते. त्यावेळेपासून काशीराम नेहमी साखरेची पुडी खिशात ठेवून मुंग्यास साखर घालीत. एके दिवशी एक जीवावर बेतण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. बाजारातून कापड विक्री करुन पैशासह घरी परतताना वाटेत रात्र झाली आणि काही दरोडेखोरांनी त्यांना पकडून त्याच्याकडून पैसा काढून घेतला. खिशात असलेली साखरेची पुडी तो देईना. त्यात पैसे असावेत अशी शंका येऊन दरोडेखोरांनी त्याला मारण्यास सुरुवात केली. त्याचवेळी इकडे मशिदीत बाबांनी मोठ्याने आरडा ओरड केली. बाबांची अद्‌भूत लीला पहा, काशीरामांमध्ये एक दिव्य शक्ती आली आणि त्याने एका रामोशाची तलवार काढून घेऊन दोघांना यमसदनी धाडले. परंतु एकाने काशीरामावर कुऱ्हाडीचा वार केला आणि काशीराम रक्तबंबाळ अवस्थेत तेथेच बेशुध्द पडले. बाकी रामोशी, तो मेला असे समजून पळून गेले.

दुसरे दिवशी सकाळी काही लोकांनी काशीरामला बेशुद्धावस्थेत पाहिले आणि खेचरावरुन बाबांपाशी आणले. बाबांनी कृपा नजरेने त्यांना बरे केले. पुढे सरकारने काशीरामला शौर्याबद्दल इनामही दिले.

घटना पहा किती विचित्र वाटते. खरे शौर्य बाबांचे होते. मशिदीत बसून बाबांनी आपली शक्ती काशीरामांकडे कार्यरत केली. धीर व साहस दिले. आता काशीरामवर एका रामोशाने जो कुऱ्हाडीचा घाव घातला ते कदाचित काशीरामांचे पूर्वसंचित असू शकेल. ते त्याला भोगायचेच होते. पण बाबांनी काशीरामांचा आडमृत्यू टाळला. त्यांना त्यांच्या समर्पण भक्तीचे फळ दिले.

याच काशीरामांना जवळ जवळ चार तपांचा बाबांचा सहवास लाभला आणि एका पवित्र एकादशीस काशीरामांनी आपली प्राणज्योत बाबांच्या चरणी समर्पित केली. काशीराम जसे आपले जीवन जगले त्याचप्रमाणे आप्पा जागलेही बाबांशी एकनिष्ठ राहून बाबांची सेवा करीत राहिले. हे काशीराम यांचे उत्तम सहकारी होते. त्यांनाही बाबांच्या कृपेने देहशांती लाभली.



विश्वाचा स्वामी भिक्षा मागी दारोदारी

## विश्वाचा स्वामी भिक्षा मागी दारोदारी.

शिरडी ग्रामीचा हा फकीर चिंध्याची कफनी घालून मशिदी बाहेर पडून पाच घरी भिक्षा मागी. हे माय कोरभर भाकर वाढ! अशी हाक देत बाबा अनवाणी फिरत. साक्षात लक्ष्मी त्यांच्या सोबत असता, त्यांचे भिक्षा मागण्याचे प्रयोजन काय होते? नेमके ते कशाची भिक्षा मागत? कोरड्या भाकरीची?

नाही. त्यांची भिक्षा होती शिरडी ग्रामस्थांच्या ह्यदयातील भक्तीभाव व सत्प्रवृत्ती! तिचा बाबा शोध घेत फिरत. कोण्या मायने भाकर घातली की म्हणत, आई तू फार दयाळू आहेस. ईश्वर तुझे कल्याण करील. कोणी खेडूत म्हणे, शास्त्राच्या आधारेच साधू-संन्याशी आजवर भिक्षेवरच गुजराण करीत आले आहेत. तर कोणी एक स्त्री म्हणे, बाबा ही भिक्षा स्वतःसाठी मागत नाहीत. ती ते मशिदीत एका खापरात ठेवतात. त्यावर चिमण्या कावळे, कुत्रे प्रथम आपले पोट भरतात. त्यातून काही राहिले तर बाबा आपल्या मुखी घालतात.

दुसरी स्त्री म्हणे, बाबा सर्वांच्या मुखाने अन्न घेतात. इतरांचे पोट भरले की आपला हा देव तृप्त होऊन ढेकर देतो.

श्यामाला मात्र बाबांनी भिक्षा मागण्याचे वाईट वाटत असे. तो म्हणे स्वतःकडे सर्व सिध्दी असून भाकरीसाठी बाबा दारोदारी फिरतात, हे मनाला कसे पटेल?

नाना ढेंगळे म्हणायचे, साईंना स्वतःला काहीही नको असते. ते स्वतः निरासक्त आहेत. दुसऱ्यांचे क्षणात मनोरथ पूर्ण करतात. शिरडीकरांचे हे अहोभाग्य आहे की साक्षात परमात्मा त्यांच्या दारी उभा राहून भिक्षा मागतो.

त्यावर श्यामाचे उत्तर असे, साई सर्वांच्या मनाचा अंत शोधत असतात. हा तर विश्वाचा स्वामी! त्याला आम्ही

पामर काय देणार ? ही तर आमची कठोर सत्वपरिक्षाच आहे.

बाबांची ही माध्यान्हीची भिक्षा फेरी म्हणजे माणसाच्या हृदयातील, भक्तीभाव, प्रेम, सत्वगुण शोधण्याची परिक्रमा असे. त्यातून ते ''भुकेल्याला अन्नाचा घास द्या'' ही शिकवण देत होते. दारी आलेला हा अतिथी भगवंत स्वरुप असतो, त्याला रित्या हाताने परत पाठवू नका. हा वस्तूपाठ बाबा देत होते.

खरंच साईरुपी दत्त माध्यान्ही दारोदारी भिक्षा मागत फिरत हे शिरडीकरांचे अहो भाग्य होते.

**साईंचे सरकार -दत्त दिगंबर.**

बाबा आपल्या भक्तांच्या भक्तीरुपाप्रमाने अनेक दैवतांच्या रुपात दर्शन देत असत. कारण ज्याची ज्या दैवतावर श्रद्धा असे त्याप्रमाणे ते रुप दाखवून त्या त्या भक्ताची श्रध्दा दृढ करीत असत. त्यांची खरी भूमिका होती, मी अल्लाचा! फकीर गुरुंचा बंदा! स्वतःला ते श्रीगुरुंचे एक विनम्र पाईक मानत. ते सरकार वा फकीर म्हणजे दत्त दिगंबर होत. त्याचे उदाहरण द्यायचे झाले तर नानासाहेब चांदोरकर होत.

एकदा नानासाहेब बाबांच्या दर्शनास येत होते. वाटेत त्यांना दत्त मंदिर लागले. पण त्यांनी दत्तप्रभूंचे दर्शन टाळून थेट बाबांकडे आले तोच बाबांनी नानांना प्रश्न केला, तू माझ्या सरकारचे दर्शन का टाळलेस ? आज गुरुवार, तो त्यांचाच वार आहे आणि त्यांच्या मंदिराकडून तू आलास ना!

तेव्हा नाना म्हणाले, तेथील पुजारी मंदिराच्या व घाटाच्या जीर्णोध्दारासाठी सदा देणगी मागत असतात. त्यांना चुकविण्यासाठी आज दत्त दर्शन केले नाही.

बाबा म्हणाले, अरे दत्तासारखे दुसरे दैवत नाही. तेच माझे सरकार आहेत; आणि त्यांचे दर्शन चुकविण्याची दुर्बुध्दी तुझ्या सारख्याला कशी झाली ? साक्षात प्रभूंचे दर्शन न घेणाऱ्यास मी कधी पावेन काय ? मूर्खा, देणगी द्यायची नसेल, तर नको देऊस ? पण त्यांचे दर्शन कधी टाळू नकोस.

नाना माझ्या सारखे अल्लाचे बंदे त्या महाप्रभूंचीच शक्ती घेऊन कार्य करीत असतात. त्या सच्चिदानंद सद्‌गुरुंच्या शक्तीचे प्रतिनिधी म्हणून मानवाच्या कल्याणासाठी आणि उध्दारासाठी वावरत असतात. तू जसा तुझ्या साहेबाचा एक अधिकारी म्हणून काम करतोस, त्याचप्रमाणे आम्हीही त्या प्रभूसत्तेचे दूत आहोत.

त्यावेळी श्यामाने बाबांना प्रश्न केला, बाबा तुम्हीच आमचे देवाधिदेव! मग दत्तगुरुंना एवढे मोठे स्थान का देता ?

त्यावर बाबा म्हणाले, श्यामा, श्रीगुरुच माझे फकीर सरकार आहेत. तेच एक अद्‌भूत सामर्थ्य आहेत. माझे स्वामी आहेत. त्यांचे चराचरावर साम्राज्य आहे. त्यांच्या लीलामय अवधूत शक्तीचा आजवर कुणालाही शोध

लागला नाही. तेव्हा नानांनी, बाबांना श्रीगुरुतत्व रहस्य सांगण्याची विनंती केली असता बाबा सांगू लागले, माझ्या सरकारची काळावर व नियतीवरही सत्ता चालते. त्यांना उत्कट प्रेम, शरणागतीने प्रसन्न करुन घेता येते. ते वेदांच्याही पलीकडे गहन गूढ असले तरी दयेचे अथांग सागर आहेत. ज्ञात व दृश्य जगाचे तेच एक कारण आहेत. त्यांच्या दिव्यत्वाचा अंतच नाही. त्यांना मोजताही येत नाही, की मापताही येत नाही. त्यांचे चरण पकडा आणि अवधूताचे धन मागा. माझ्या सरकारचे धन अखंड भरुन पडले आहे. ते कुणी मागत नाही. त्यांच्याकडील आनंद मागा! मुक्ती मागा! म्हणजेच जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटण्यासाठी मोक्षधन मागा!

## गीरसंप्रदायाचे गंगागीर महाराज.

गंगागीर महाराजांची बाबाशी भेट झाली ती सन १८८० मध्ये. हे पूर्वकाळात बलदंड व मल्ल होते. पुढे धर्मशास्त्राचा अभ्यास करुन थोर कीर्तनकार आणि नाम प्रसारक बनले. भक्तीचा व नामस्करणाचा प्रसार त्यांनी पूर्ण नगर जिल्हा आणि मराठवाड्यात केला.

एकदा ते सहज शिरडीला आले होते. गावातील कोणी प्रतिष्ठीत मंडळी भेटली नाही. परंतु एक संतरत्न त्यांच्या दृष्टीस पडले (बाबांचीच ती अद्‌भूत करणी असावी). आपल्या गुरुस्थानावर फुलझाडांबा बाबा पाणी घालत होते. बाबांचे आपल्या गुरुंवर असलेले प्रेम पाहून गंगागीर महाराजांनी अलौकिक गुरुपरंपरा जाणली आणि हा एक अवतारी महात्मा आहे याचा त्यांना बोध झाला. बाबा हे सुफी, नाथ व दत्त यांचा संगम आहेत याचा साक्षात्कार झाला.

गंगागीर महाराजांना पाहताच बाबा आनंदाने म्हणाले, ''या चांगदेवा, या वटगावच्या वटेश्वरी.'' त्यावेळी बाबांसोबत तेथे म्हाळसापती होते. या तिघांनी एकत्र चिलीमपणान केले. गंगागीर महाराज अत्यंत तृप्त मनाने रुईगावास परतले. पुढे गणपतराव कोते, दाजी पाटील यांच्या मनी शिरडीत नामसप्ताह आयोजित करण्याची इच्छा झाली त्याप्रमाणे ते रुईगावी येऊन त्यांनी गंगागीर महाराजांना तशी विनंती केली. तेव्हा त्यांना समजावून सांगताना गंगागीर म्हणाले, बाबांनो, तुमचे सर्वांचे भाग्य थोर आहे म्हणून साईनाथ तुम्या शिरडीत प्रत्यक्ष वावरत आहेत. त्यांची पायधूळ मी मस्तकी धारण करतो. तुम्ही त्यांनाच शरण जा, त्यांच्या आज्ञेत वागा. नामसप्ताहाची गरजच नाही. साईनाथ तुमच्या सर्वांचा, देशाचा आणि जगाचा उध्दार करण्यासाठी प्रगटले आहेत. शिरडीच्या भिंती आकाशाला भिडून, वारा बाबांच्या लीलांचा, शिकवणीचा, मार्गदर्शनाचा सुगंध जगभर पसरवेल.

## साईदत्तभक्त कुशाभाऊ.

कुशाभाऊ हे राहणारे नगरचे! ब्रह्मचारी होते. काकासाहेब व भीष्म यांच्या बरोबरीने त्यांनी शिरडीत पाऊल टाकले होते. फार मोठे दत्तभक्त. महाराजांच्या आशिर्वादाने त्यांना काही सिध्दी प्राप्त होत्या. अभिचाराचेही

ज्ञान होते. बाबांनी त्यांना सिध्दी वापरण्यास मनाई केली होती.

हे कुशाभाऊ बाबांना दत्त मानीत. त्यांच्या प्रखर निष्ठेने प्रसन्न होऊन साईंनी त्यांना हातातून सुगंधी विभूती निर्माण करण्याचा वर दिला बाबांच्या आज्ञेने त्यांनी ब्रह्मचर्य सोडून गृहस्थाश्रम स्वीकारला आणि आपले सर्वस्व बाबांच्या चरणी वाहिले.

**<u>राधाकृष्णा आई - प्रेमभक्ती व सेवा भाव.</u>**

सुंदराबाई क्षीरसागर असे तिचे नाव. ती कृष्णाची परम भक्त असल्याने सारे तिला राधाकृष्ण आई म्हणत. पंढरपुरात राहणारी. या सुंदर कुमारीकेवर तारुण्याच्या उंबरट्यावरच तिच्या वाट्याला वैधव्य आले. त्याही परिस्थितीत तिने आपली धार्मिकता व भक्तिभाव सोडला नाही. श्रीकृष्णाच्या भक्तीत सदैव दंग असायची. त्याचवेळी नानासाहेब पंढरपूरला तहसीलदार म्हणून कार्यरत होते. त्यांची नजर या भावभक्तीने रंगून गेलेल्या स्त्रीवर पडली आणि त्यांनी तिचे जीवन सुवर्णमय होईल या शुभेच्छेने त्यांनी द्वारकामाईत वावरणाऱ्या साईकृष्णावर अखंड मधुराभक्तिची प्रेमधार वाहण्यासाठी सन १९०५ च्या दरम्यान राधाकृष्ण आईला शिरडीस आणले व शिरडीत स्थिर केले. बाबांनी तिला मशिदीची पायरीही चढू दिली नाही. तरीही सुंदराबाईंनी आपले तन-मन-धन साईंच्या मूक उपासनेत आणि प्रखर सेवेत वाहिले. दूर राहूनच तिने साईकृष्णावर मूक प्रेम केले. बाबांची उठबस पाहिली. द्वारकामाईची देखभाल केली. शिरडीचे रस्ते झाडले. शिरडीला वैभवशाली भक्तीतीर्थाचे व संस्थेचे स्वरुप आपल्या स्वार्थ त्यागातून साकार करुन दिले. साईपांडुरंगाच्या चरणांशी सुंदराबाईंना आत्मसिध्दी प्राप्त झाल्या. ती एक योगींनी बनली होती. तिनेच शिरडीचा संसार सांभाळला होता. पालखी, रथ, अब्दागिरी, छत्रचामरे, भालदार-चोपदार, ललकाऱ्या, वाद्ये, रोषणाई, गजर, उत्सव आणि जल्लोष इत्यादींचे संस्थानी वातावरण निर्माण झाले ते राधाकृष्ण आईंच्या प्रयत्नांनीच!

बाबा जो भाकर तुकडा व प्रसाद पाठवित त्यावरच ही योगीनी गुजराण करीत असे. तिच्या सेवा व दास्य भक्ती याशिवाय तिला भक्ती, ज्ञान आणि योग-तपस्या यांची सुवर्णकडाही लाभली होती. तिचा सेवाकाळ हा जवळ जवळ बारा वर्षांचा म्हणजे १९०६ ते १९१७ असा! या एका तपात शिरडी सारख्या तीर्थक्षेत्रात वैभवशाली फरक पडला. याचे कारण अधिकारी भक्त, ज्ञानी, तपस्वी या काळात शिरडीत येऊन साईंच्या भक्तीत रममाण झाले, स्थिरावले. शिरडीच्या या सुवर्णमय काळाची ही भक्तीधारा साक्षी होती.

राधाकृष्णा आईने भावभक्तीने व तीव्र उपासनेने बाबांशी आंतरिक जवळीक साधली. त्याने त्यांना काही आत्मसिध्दी प्राप्त होऊन उच्च साधकावस्थेला पोहोचल्या. जणू जन्मोन्‌जन्मीच्या पायऱ्या चढत ही प्रेमधारा पांडुरंगाची सेवा करुन शिरडीत कृष्णाच्या चरणांपाशी आली आणि त्याचीच पायधूळ होऊन बसली.

# गुरु महिमा

बाबांच्या निर्वाणापूर्वी दोन एक वर्षे आधी या प्रेमधारा चंद्रभागेचा जीवनप्रवास गूढपणे समाप्त झाला. साईनाथांनी तिचे गुणदोष, भावभक्ती, अखंड प्रेम स्वीकारुन तिला भवसागराच्या पैलतटावर पोहोचविले.

न्या. रेगे आणि स्वामी शरणानंद या दोघांनी लिहिलेल्या लिखाणातून राधाकृष्ण आईच्या संपन्न अशा अंतरंग वैभवाची पुसटती ओळख होते.

## साई आरतीकार श्री माधव अडकर.

श्रीसाईनाथांच्या प्रत्यक्ष सहवासात जे भाग्यवान भक्त राहिले त्यांना बाबांनी नाना अनुभव देऊन भक्तिमार्गाची, लिहिण्याची प्रेरणा दिली. बाबांची आरती लिहिणारे माधव अडकर, दासगणू, उपासनी महाराज, भीष्म हे बाबांशी समरस झालेले भक्त. माधव अडकरांना बाबा तर दत्तस्वरुपातच दिसत, त्याच उत्कंट भक्तिरसात त्यांनी उल्लेख केलेला आहे;

कलियुगी अवतार । सगुण ब्रह्म साकार । अवतीर्ण झालासे । स्वामी दत्त दिगंबर ।।

बाबांचे हे दत्तरुप अडकरांनी ओळखले होते. म्हणूनच बाबांना त्यांनी सच्चिदानंद सद्‌गुरु ही पदवी दिली. त्या पदवीने हाक मारण्यास श्रीसाईंची तारक अशी दिव्य शक्ती प्रगट होऊन संकटसमयी भक्तांना तारते, असा प्रत्यक्ष अनुभव आजवर अडकरांच्या आरतीतून अनंत भक्तांना येऊ लागला आणि आजही तो येत आहे. कारण अडकरांनी रचलेल्या आरत्या ह्या मन इतके सुखाहून टाकतात की भक्त बाबांच्या स्वरुपात समरस होऊन जातो.

श्रीसाईनाथ म्हणजेच प्रभू दत्तात्रेयांची कृपाशक्ती आहे हे अडकरांनी जाणले होते. पुढे दिक्षित, साठे, उपासनी ह्या ज्ञानी पुरुषांनाही दत्तशक्तीचा अनुभव आला.

## सगुणोपासनाचे जनक - भीष्म.

भीष्म अर्थात कृष्णशास्त्री जोगेश्वर भीष्म! हे तर वेदशास्त्र संपन्न व्यक्तिमत्व! नागपूर जिल्ह्यातील बोरी या गावी त्यांचे वास्तव्य! शेतीवाडी करुन उदर निर्वाह चालवित असत. पत्नीला देवाज्ञा झाल्यानंतर ते काहीसे अस्थिर झाले. नातलगांनी, इष्टमित्रांनी दुसरा विवाह करण्याचा सल्ला दिला पण त्यांनी तो मानला नाही. एका श्रावण पौर्णिमेच्या रात्री त्यांना एक स्वप्न पडले. अंगास केसरी उटी लावलेला, कपाळास त्रिपुंड आणि गंधपुष्पाने पाद्यपूजा झालेला काळ्या वर्णाचा पुरुष दिसला. त्याने भीष्मांच्या हाती एक वर्तमान पत्र दिले. भीष्मांनी त्यांचे नाव विचारताच त्या पुरुषाने काही न बोलता वर्तमानपत्राकडे बोट दाखविले. त्यावर नजर टाकताच भीष्मांना ''सच्चिदानंद'' हा शब्द दिसला. तोच त्या पुरुषाने आज्ञा केली ''वाचा''. भीष्मांनी पुन्हा त्या

वर्तमानपत्रावर नजर टाकली तेव्हा ''मंत्र व शिकवा'' असे एके जागी लिहिलेले दिसले. भीष्मांनी मान वर करुन त्याचा अर्थ विचारणार तोच तो पुरुष व वर्तमानपत्र अदृश्य झालेले.

इतक्यात कोणीतरी दार ठोठावले व भीष्मांना जाग आली. उठल्या उठल्या त्यांनी ते स्वप्न आपल्या रोजनीशीत लिहून ठेवले. त्या स्वप्नाचा बराच विचार केला पण कोडे काही उलगडले नाही. काही दिवसांनी त्यांची एका गाणपत्य साधूशी भेट झाली. त्यांना हे स्वप्न सांगितल्यावर 'सच्चिदानंद स्वामी' तुमचे गुरु आहेत असे म्हणून त्या साधूनी भीष्मांना 'वशिकवा' हा मंत्र दिला.

पुढे थोड्याच दिवसांनी भीष्म अमरावतीला खापर्डेकरांकडे गेले असता त्यांनी शिरडीला येण्याबद्दल विचारले असता भीष्म लागलीच तयार झाले आणि खापर्डेसोबत शिरडीस आले बाबांचे दर्शन घेऊन नमस्कार करताच बाबांनी हात जोडून 'जय सच्चिदानंद' म्हणाले. हे दृश्य पाहून भीष्म चक्रावले. स्वप्नात पाहिलेले साधू व हे एक की दोन! दोघेही एकच असतील तर स्वप्नात दिसलेले साधू वैष्णव होते आणि माझ्या समोर आहेत ते यवन दिसतात. दोघेही वेगळे असतील तर मला पाहिल्या बरोबर बाबा 'सच्चिदानंद' का म्हणाले ?

भीष्मांनी तेथे काही दिवस मुक्काम केला. सर्व हिंदू, ब्राह्मण बाबांचे चरणोदक घेत असत पण भीष्मांनी घेतले नाही. तेथे ते सर्वांना बरोबर येऊन बसत. बाबा तंबाखूची चिलिम पीत! भीष्म जवळ बसले असले तरी त्यांना देत नसत. पण एके दिवशी एका सेवकाने चिलिम भरुन बाबांच्या हाती दिली. बाबांनी ती नुसती तोंडाला लावून भीष्मांच्या हाती देऊन पी म्हणाले, भीष्मांनी ती प्याले व पुन्हा बाबांच्या हाती दिली बाबानी ती घेतली व म्हटले, गड्या, आपण सर्वत्र फिरत असतो. मुंबई, पुणे, सातारा, नागपूर ही सारी शहरे राममय आहेत, असे बोलून ते भीष्मांना एकदम म्हणाले, अरे एकटा एकटाच लाडू खातोस,आम्हाला एकही देत नाहीस. आता मला पाच लाडू हवे आहेत. बाबांच्या या वाक्याने भीष्मांची मनस्थिती बदलून गेली. स्वप्नात दिसलेले साधू आणि बाबा दोन्ही एकच आहेत ही खात्री पटली. त्यांनी लागलीच तीर्थ वाटणाऱ्याकडून पाद तीर्थ मागून घेऊन प्राशन केले आणि साईनाथांच्या चरणांवर माथा ठेवला. बाबांनी दोन मिनिटे आपला वरदहस्त त्यांच्या डोक्यावर ठेवला.

भीष्म आपल्या बिऱ्हाडी परतले. परंतु हे परस्थळ! येथे लाडू कसे करणार ? बाबांना तर लाडू हवे आहेत. शिवात पाचच का ? हा विचार करीतच त्यांनी दिवस घालविला. त्याच चिंतनात त्यांना रात्री झोप लागली पण ती लागलीच उडाली आणि एक श्लोक करण्याची स्फूर्ती झाली. श्लोक तयारही झाला. दुसरे दिवशी स्नान करुन काकासाहेबांना सोबत बाबांकडे जाताना त्यांनी तो काकांना दाखविला. बाबांकडे पोहोचताच बाबांनी भीष्मांना लाडवांची आठवण करुन दिली. भीष्म काय बोलणार ? परंतु काकासाहेब म्हणाले, लाडू तयार होऊन राहिले आहेत.

दुसरे दिवशी भीष्मांनी आणखी चार श्लोक रचले. असे एकूण पाच श्लोक तयार झाले. त्यापुढे श्लोक

रचण्याचा बराच प्रयत्न केला, पण पुढे एकही श्लोक स्फुरला नाही. या पाच श्लोकांचा कागद भीष्मांनी बाबांच्या हाती दिला असता त्यांनी तो भीष्मांना वाचण्यास सांगितला. ते श्लोक वाचीत असता बाबांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवला.

भीष्म सच्चिदानंद स्वरुपात दंग झाले. हे पाच श्लोक म्हणजे बाबांनी भीष्मांकडे मागितलेले पाच लाडू होते.

पुढे भीष्मही अडकरांप्रमाणे साईनाथांचा दत्तरुपात समरस झाले. आणि पांडुरंगाच्या आरत्यांच्या आधारावर, अडकर, दासगणू यांच्या व स्वतःच्या रचलेल्या पदांचा अंतर्भाव करुन भीष्मांनी बाबांच्या त्रिकाळ उपासनेसाठी सगुणोपासना लिहिली. त्यानुसार शिरडीत त्रिकाल सगुणोपासना सुरु झाली. काकासाहेब दिक्षितांनी सगुणोपासनेचे पुस्तक छापले बापूसाहेब जोगांनीही यासाठी भरीव मदत केली. आपल्या सगुणोपासनेत त्यांनी ते रुप प्रगट करुन प्रचलित केले. भीष्मांचे हे दत्तरुप त्यांच्या आरतीत दिसून येते;

**ऐसा येई बा साई दिगंबरा । अक्षय रुप अवतारा ।**
**सर्वही व्यापक तू । श्रुतिसारा । अनसुया त्रिकुमारा । ऐसा येई बा ।।**

पुढील पदे सर्वांना परिचित आहेत. त्यांच्या सगुणोपासनेत आणखी एक पद दत्तरुपाची ओळख पटविते;

न दत्तगुरु साई मा, मजवरी कधीही रुसो ।

या वर्णनांतूनच, भीष्मांचा साईनाथांवर असलेला प्रभू दत्तात्रेय हा भाव किती दृढ आणि स्थिर होता हे पटून येते.

## रावबहाद्दूर साठे आणि कर्मठ शिवभक्त मेघश्याम उर्फ मेघा.

मेघश्याम हा गुजरातमध्ये राहणारा. कर्मठ सनातनी, उपासक. पण निर्धन, अशिक्षित आणि एकनिष्ठ शिवभक्त. हा मेघा जो बाबांच्या सेवेत आला तोच मुळी रावबहादूर साठे यांच्यामुळे. श्रीदासगणू आणि चांदोरकरांनंतर स्थिरस्थावर झालेले व्यक्तिमत्व म्हणजे साठे होत. चांदोरकरांपेक्षा उच्च अधिकार पदावर म्हणजे जिल्हाधिकारी होते. सन १९०४ समयी ते नगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जमावबंदी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांचे समाजात आणि सरकारी दरबारी जे उच्च स्थान होते त्याहीपेक्षा श्रेष्ठ गुरुभक्त ठरले होते. एखाद्या अग्रदूताप्रमाणे ते साईनाथांच्या परिवारात सामील झाले. अकस्मात त्यांच्या पत्नीचे देहावसान झाले आणि दुःखानेच ते बाबांच्या अधिक जवळ आले. त्यांची गुरुनिष्ठा पाहूनच की काय बाबांनी त्यांचा तात्या केळकरांच्या (तात्या हे साठेंच्या पूर्वीचे बाबांच्या सहवासात होते) कन्येशी विवाह जमविला. केळकऱ्यांची कन्या ही आपलीच कन्या आहे असे बाबा मानीत असत. त्यामुळे साठे हे शिरडीचे मानलेले जावई झाले होते. साठेंचा विवाह (द्वितीय विवाह) झाला सन १९०६ मध्ये. पुढे सहा वर्षांनी बाबांच्या कृपेने त्यांना पुत्र रत्नाचा लाभ झाला.

यांनाच बाबांनी शिरडीचा गावतट पाहून वाडा बांधण्याची आज्ञा केली. साठ्यांनीही बाबांच्या मर्जीप्रमाणे वाडा बांधून घेतला. पुढे साठ्यांची गुजरातमध्ये बदली झाली आणि बाबांना एक सच्चा सेवक मिळाला मेघश्याम!

गुजरातमध्ये कार्यरत असताना त्यांना मेघश्याम भेटला. कडवा शिवभक्त! सतत शिव पंचाक्षरी मंत्राचा जप करणारा! त्याने साठे मोहित झाले. साठेंनीच त्याला संध्या व गायत्री मंत्र शिकवून तयार केले. आणि भडोच येथे शिवाच्या पूजा-अर्चनेस लावले. अशा या सनातनी ब्राह्मणाच्या हातून शिरडीत नांदत असलेल्या शिवस्वरुप साईंची पूजा व सेवा घडून त्याचे कल्याण व्हावे, अशी साठेंची मनोमन इच्छा झाली. त्यांनी मेघश्यामच्या प्रवासाची आणि पैशांची सोय करुन त्याला शिरडीस पाठविले. मेघा साईंच्या दर्शनास आला. पण बाबांचे फकीरपण, राहणी, करणी आणि बोलणे पाहून त्याचा पूर्ण भ्रमनिरास झाला. त्याने आपली असमर्थता साठेंना कळविली. साठेंनी आपले सासरे केळकर यांना पत्र लिहून मेघाची समजूत काढण्याची विनंती केली व मेघाची चांगली व्यवस्था करण्यास सांगितले. केळकरांनी मेघाची समजूत काढल्यावर मेघा अनिच्छेनेच बाबांकडे गेला. अंतर्यामीच बाबा ते! मेघा येताच त्याला पाहून बाबा भयंकर चिडले आणि म्हणाले, मी एक मुसलमान, हा उच्च कुलिन ब्राह्मण! माझ्याकडे येण्याचे याचे कुळ भ्रष्ट होईल. हा मजकडे नको. त्याला ''लाथ मारुन बाहेर काढा.''

बाबांची सर्वज्ञता पाहून मेघाच्या डोळ्यांत अंजन पडले. तरीही त्याला बाबांकडे राहावेसे वाटेना आणि तो त्र्यंबकेश्वरला निघून गेला. तेथे शिवशंकराची जवळपास दीडवर्षे उपासना केली. त्याचवेळी मेघाला पोटशुलाची व्याधी जडली आणि एके दिवशी न राहवून शिरडीस परतला. साठेंचे सासरे केळकरांनी त्याची बाबांकडे मध्यस्थी केली. बाबांनी मेघाला शिरडीस राहून आपली पूजा-अर्चा करण्याची परवानगी दिली.

वरवर पाहता ही एक मेघाची कहाणी वाटते. पण बाबांच्या अद्भूत करणीने मेघाला आकर्षून घेतले होते. मेघाची सनातनी दृष्टी त्यांना बदलायची होती म्हणूनच प्रथम दर्शनीच त्यांनी मेघाला 'लाथ मारुन बाहेर काढा' या वाक्याने फटकारले होते. त्यांनीच मेघाला बुध्दी देऊन त्र्यंबकला पाठविले, तेथे शिवतत्वाची उपासना करुन घेतली आणि पोटशूलाची बाह्य व्यथा दाखवून पुन्हा आपल्या पाशी आणले होते. या अनुभवातून बाबांनी मेघाची अंतर्शुध्दी घडवून आणली.

मेघा हा मूलतः श्रध्दावान असल्याने त्याला देवतांची पूजा करणे आवडत असे. ते जाणूनच बाबांनी त्याला गावातील गणेश, देवी, हनुमान, खंडोबा, शिव आदी देवतांची प्रथम पूजा करुन नंतरच माझ्या पूजा-अर्चनेस येण्याची आज्ञा केली होती. या सर्व देव-देवतांची मनोभावे पूजा करता करता मेघाला बाबाच सर्व देवतांचे अंतर्यामी आणि देवतास्वरुप आहेत याचा रोकडा प्रत्यय आला आणि बाबा हेच शिव आहेत याची ठाम खात्री झाली. त्यामुळेच की काय हा निष्ठावंत भक्त आपल्या शिवसाईंच्या पूजा-अभिषेकासाठी रोज कोपरगावापासून

पाच मैल चालत जाऊन गोदावरीचे पवित्र जल घेऊन येत असे. अशा या कर्मठ उपासकाचे अभिषेक जल बाबा आपल्या मस्तकी घेत. तेवढे ते भिजे. बाकी देह व कपडे कोरडे राहत. दयेचे महासागर बाबा, मेघाच्या या भोळ्या-भाबड्या भक्तीचा व रांगड्या अभिषेकाचा अत्यानंदाने स्वीकार करीत. त्याच्या या शिवभक्तीवर बेहद प्रसन्न होऊन बाबांनी त्याला एक शिवलिंग नित्यपूजेसाठी प्रेमाची भेट म्हणून दिले होते. तत्पूर्वी बाबा त्याला म्हणाले होते, मेघा, तू भिंतीवर एक त्रिशूल काढ! शिवच तुझ्याकडे येणार आहे.

याच शिवलिंगाची मेघा पूजा-उपासना करी. अशा तऱ्हेने मेघा बाबांचा नित्याचा पुजारी व श्रेष्ठ भक्त बनला. बाबा नेहमी मेघाकडे पाहून इतरांना म्हणत, हा माझा श्रेष्ठ भक्त आहे. मेघा बाबांच्या या अमृतवाणीने तृप्त होई.

सन १९१२ साली मेघाने बाबांच्या चरणी देह ठेवला. बाबांनी त्याच्या अविचल भक्तीचा मान राखला आणि उर्ध्वदैहिकाचा सारा खर्च स्वत: केला. त्याची अंतयात्रा निघाली तेव्हा त्याच्या अंतिप्रवासात बाबा त्याच्या समवेत चार पावले चालत गेले. मेघासाठी बाबांसारख्या संयमी आणि सिध्द योग्याच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहत होत्या. संसारी माणसासारखे बाबा रडत होते. यावरुन मेघाची योग्यता काय होती, हे भगवद्‌भक्ताला उमजल्याशिवाय राहणार नाही. मेघाच्या शिवप्रेमाचे बाबांनी अनन्य निष्ठेत रुपांतर करुन त्याला एकनिष्ठ उपासक बनवून त्याच्या भक्तीचा स्वीकार केला आणि त्याचे कर्म-भक्ती-ज्ञानात रुपांतर केले. शिव हा मस्तकात वास्तव्य करुन असतो हे मेघाला चमत्कारान पटवून दिले.

रावबहादूर साठेंनी गुरुभक्ती केली होती. बाबांच्या आज्ञेने त्यांनी गुरुस्थानाची व वाड्याची बांधणी करुन भक्तांची सोय केली. आणि मेघा सारखा शिव उपासक, पुजारी बाबांच्या चरणांशी सर्मपण केला.

## श्रीसाईनाथ जव्हार अली फकीराचे शिष्य बनले.

जव्हार अली हा एक फकीर. बाबांच्या सहवासात आलेला! त्याने बाबांवर प्रभाव (कदाचित बाबांचीच करणी असावी) टाकून त्यांना आपले शिष्यत्व घेण्यास भाग पाडले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्याच्याकडे साक्षात शिवत्व नांदत आहे अशा परम दयाळू साईंनी त्याचे शिष्यत्व स्वीकारुन त्याच्या राहात्या गावी जाऊन त्याची सेवा चाकरी करु लागले. इकडे बाबांविना शिरडी ओस पडली. भक्तांना प्राण कंठाशी येतो आहे, असे वाटू लागले. बाबांना त्या कपटी जव्हार अलीच्या तावडीतून सोडविण्यासाठी शिरडीकरांनी अनंत प्रयत्न केले. अखेर देवीदासांनी राहात्यास जाऊन जव्हार अलीचा धर्मवाद-विवादात पराभव करुन बाबांना त्याच्या दास्यातून मुक्त केले आणि जव्हार अलीला शिरडीतून पळवून लावले.

काय होती ही बाबांची करणी! ज्यांच्या चरण कमलांचे दर्शन घेण्यासाठी भक्त तळमळत असत, ज्याच्या ठायी सर्वदेव देवता एकरुपाने नांदत होत्या, त्या साईशिवाने एका फकिराचे दास्यत्व पत्कारुन त्याची मनोभावे

सेवा केली. त्यातून त्यांनी जव्हार अली आणि सर्वांनाच गुरुसेवेचा, लीनतेचा आदर्श घालून दिला. स्वतःचा निरहंकारी दास्यत्व व सेवाभाव प्रगट केला.



दासगणू महाराज

## किर्तनभक्तीकार दासगणू महाराज.

रामरुपाने रामभक्तांना आणि कृष्णरुपाने कृष्ण भक्तांना दिव्य दर्शन देऊन धन्य केले होते. दासगणुंचे शिव-विष्णू याबद्दलचे द्वैत घालविण्यासाठी बाबांनी एका शिवरात्री त्यांना आपल्या पवित्र-पावन चरणांतून गंगा-यमुनांचे प्रवाह उत्पन्न करुन आपणच शिव-विष्णू असल्याचे दाखवून दिले. कारण शिवरात्रीच्या निमित्ताने शिवपूजन करण्यासाठी दासगणू, बाबांना व द्वारकामाईला बाजूला सारुन गोदावरी काठी स्नान करण्यास निघाले होते. दासगणूंनी हा चमत्कार पाहताच त्यांच्या सर्व वृत्ती बाबांच्या चरणांपाशी स्थिर झाल्या. पुढे अगाध लीला व अघटीत शक्ती या आपल्या अनुभवाने ओथंबलेल्या काव्यात ते बाबांचे ब्रह्मा-विष्णू-महेशांचे रुप पाहिले असे दासगणूंनी गायन केले आहे.

पुढे लावणी-तमाशात रमणारी दासगणूंची लेखणी अनेक अनुभवांनी संस्कारीत करुन बाबांनी तिला संतचरित्रात रमवून दासगणूंना एक संतकवी व संतचरित्रकार बनविले. कारण तमाशा आणि लावण्यांसाठी संवाद-गाणी लिहिण्याचा त्यांचा छंद होता आणि नोकरी करीत होते पोलिस खात्यात. अर्थात नोकरीत बढती त्याचबरोबर उत्कर्ष व्हावा ही दासगणूंची मनिषा असणे स्वाभाविकच! मग नोकरीला रामराम ठोकून लेखन व किर्तन करण्याचे त्यांच्या मनी कशी बरे असेल? परंतु श्रीसाईंना गणूंचे पुढील जीवन ज्ञात होते. वरिष्ठांची मर्जी सांभाळण्यापेक्षा प्रत्यक्ष भगवंताची मर्जी, कृपा दासगणूने का प्राप्त करुन घेऊ नये? म्हणूनच बाबांनी गणूंना ठामपणे सांगितले, गणू तू नोकरी सोड आणि संतांना भोजन घाल. याचा अर्थच असा होता, संतचरित्रावर लेखन कर, संकिर्तन कर, संतांच्या जीवनातूनच आत्मशुध्दिचा लाभ घेऊन साधकावस्था प्राप्त करुन घे. अंती लोकांना प्रेम, भक्ति आणि श्रध्देची शिकवण देऊन, संतमहिमा गात मोक्षाला जा.

दासगणूंना केवळ उपदेऊ देऊन बाबा थांबले नाहीत. तर त्यांनी एका करड्या पोलिसातून गणूंना एक महान संतकवी, संतचरित्रकार व एक संकीर्तनकार घडविला.

दासगणूंनी जेव्हा बाबांच्या पदांगुष्ठांतून गंगा-यमुना अवतरलेल्या पाहिल्या, अनुभवल्या त्यावेळी त्यांच्या मुखांतून एक सुंदर काव्य बाहेर पडले, ''अगाध शक्ति अघटित लिला''. याचे कारणच असे दासगणूंच्या

मूर्तीला बाबांनी देवत्वाचा आकार दिला. अनेक चमत्कारिक गोष्टी, नानाविध योगायोग, अद्‌भूत अनुभव दाखवून बाबांनी त्यांच्या जीवात्म्याला सुसंस्कारित केले.

दुसरी महत्वाची गोष्ट, 'ईशावस्य' उपनिषदाचा गर्भितार्थ काकासाहेब दिक्षितांच्या मोलकरणीद्वारे बाबांनी गणूंना अनुभवातून संस्कारित केला.

संस्कृत भाषा ज्यांना समजत नाही अशांकरिता दासगणूंनी ''ईशावास्य-भावार्थप्रबोधिनी'' हा समजण्यास सोपा असा प्राकृत (मराठी) ग्रंथ लिहिण्यास घेतला. त्याच्या प्रत्येक शब्दाचे रसाळ आणि अलंकारीक शब्दात भाषांतर ही तयार झाले. पण एक अडचण त्यांना सतत भासू लागली. मूळ शब्दांचा गर्भितार्थ वा त्याचे रहस्य त्यांना कळत नसल्याने, त्यांना खंत वाटू लागली होती. शेवटी त्यांनी शिरडीस येऊन साईनाथांचे चरण धरले. अंतर्ज्ञानी बाबांच ते! त्यांनी गणूंची अवस्था पाहून म्हटले, कसली चिंता बाळगतोस, काकाच्या घरची मोलकरीण तूझी शंका निवारण करील!

गणूंना आणि तेथे उपस्थित असलेल्या सर्वांनाच आश्चर्य वाटले. मोलकरीण! तिचे शिक्षण तरी कितीसे! ती या उपनिषदाच्या प्रश्नाचा उलगडा कशी करेल? बाबांचे सारे काही विलक्षण! लोकांना तो थट्टेचा विषय वाटला. परंतु गणूंना मात्र ते मनोमनी पटले. कारण त्यांना साईमाऊलीवर ठाम विश्वास होता. श्रध्दा तसे फळ! आणि ते गणूंना मिळालेही.

दासगणू मुंबईस आपल्या पारले गावी परतले. साईंच्या वाक्याची उत्सुकता होती. दुसरे दिवशी गणू बिछान्यात पहाटेच्या साखर झोपेत असताना त्यांच्या कानी मंजूळ स्वर पडले आणि ते ताडकन उठून लांब ताना घेऊन मधूर पदरचनेत असलेले गीत लक्ष देऊन ऐकू लागले. त्यांचे मन इतके तल्लीन झाले की त्या गीताचा भावार्थ समजला आणि एवढा आनंद झाला की त्यांचे ईशावास्याचे कोडे पार उकलून गेले. त्यांच्या मनी पटकन आले, बाबांनी म्हटल्याप्रमाणे ही काकांची तर मोलकरीण नसावी! म्हणून बाहेर जाऊन पाहिले तर खरोखरच एक कुणब्याची पोर काकासाहेबांच्या मोरीवर भांडी घासत सुरेल आवाजात अजूनही गात होती. दासगणूंनी अधिक चौकशी करताच कळले, ती खरोखरच काकांच्या घरची मोलकरणी आहे. त्या आठ वर्षांच्या पोरीने कमरेला एक फाटक्या परकराचा कासोटा मारला होता आणि गाताना एका भरजरी नारींगी साडीचा डौल गात होती. त्यातच ती पोर दंग होती. खायला पोटभर व अंगाला साधी चिंधीही गुंडाळायला मिळत नव्हती पण कुठल्या तरी नारींगी साडीवर ती खूप खूष दिसत होती. अशा परिस्थितीतही तिचा आनंद ओसंडून वहात आहे हे पाहून दासगणूंचे हृदय द्रवले आणि त्यांनी मोरेश्वर प्रधानांना तिला एखादे लुगडे देण्याची विनंती केली. मोरेश्वर आधीच दयाळू त्यात दागणूंची विनंती, त्यांनी लगेच एक सुंदर लुगडे विकत घेतले आणि त्या पोरीला अत्यानंदाने दिले. सुंदर लुगडे पाहताच तिचा आनंद काय सांगावा?

दुसऱ्या दिवशीच तिने ते लुगडे नसले आणि इतर मुलींसोबत फुगडी खेळली. त्या दिवशी तिचा तो थाट काय वर्णावा ? पुढे दुसऱ्याच दिवशी पूर्वीचाच फाटका परकर नेसून आली, तरी ती त्याच आनंदात! दासगणू मात्र अचंबित झाले! तिच्या चेहऱ्यावर ना सुखाचा लवलेश ना दु:खाचा! ते प्रत्येकाच्या भावनेवर असते. हेच दागणूंचे कोडे होते. ते त्या मोलकरणी पोरीद्वारे बाबांनी उलगडून दिले आणि दासगणूंना ईशावास्ताचा गुढार्थ सापडला.

वेदांची त्यागपूर्ण भोग घेऊन तृप्त मनाने त्याग करणे, ही शिकवण बाबांनी दासगणूंना दिव्य अनुभव देऊन संतुष्ट केले.


उपासनी महाराज

## उपासनी महाराज.

उपासनी महाराज हे साईंच्या जीवनातील तेजस्वी तारा! त्यांचे व्यक्तिमत्व अनेक पैलूंनी भरलेले होते. एक पंडित, कवी, ज्ञानी, योगी होते. योगसाधना चुकीची केल्याने त्यांना दम्याची व्याधी झाली होती. सुरुवातीस त्यांचा वैद्यकिचा व्यवसाय होता. परंतु काही रोगग्रस्त चुकीच्या औषधाने मृत्यू पावले. त्यामुळे ते विक्षिप्त आणि तऱ्हेवाईक वागत. नियतीच्या या लीलेतून त्यांनी संन्यासाची व साधनेची कास धरली. एके दिवशी साधना करताना श्रीसाईंनी एका वृध्द साधूच्या वेषात त्यांना गरम पाणी पीत जात असे सांगितले. त्यांनी तो मानला त्यामुळे त्यांच्या दम्यात काही अंशी दिलासा मिळाला.

पुढे बाबांनीच त्यांना शिरडीत आकर्षून घेतले आणि खंडोबाच्या मंदिरात साधनेकरीता स्थिर केले. बाबा पदोपदी त्यांना सांभाळीत होते. मार्गदर्शन करीत होते. उपासनींना वैदिक परंपरेची आवड होती. तोच त्यांचा यज्ञ होता. हे जाणून बाबांनी आपल्या कृपाशिर्वादाने त्यांचा विकास केला. त्यांच्यातील दुर्गुण जाळून सगुणत्व जागृत केले. आणि आपणच तुझे गुरु आहोत हे दाखवून दिले. बाबा म्हणत असत काशिनाथला मी संपूर्ण कनकाचे ताट दिले आहे. तो परिपूर्ण झाला आहे.


उपासनी महाराज थोर योगी बनले. त्यांच्या साईभक्तिला सुवर्ण कडा प्राप्त झाली. बाबा हेच परब्रह्म आहेत याची मूर्तीमंत साक्ष त्यांनी रचलेल्या संस्कृत महिम्नस्तोत्रात अर्थात ''सदासत्स्वरुपं चिदानंदकंद'' यात अनुभवण्यास मिळते. पुढे काही कारणास्तव उपासनींनी साईभक्तीची गुढी दूर साकोरीस उभारुन साई महिमा गायिला. त्यांच्याच द्वारे संत मेहेरबाबा, सती गोदावरी माता, वज्रेश्वरीचे दिगंबर स्वामी असा आगळा वेगळा परंतु साईप्रेमी ज्ञानी, योग्यांचा प्रवाह महाराष्ट्र भर सुरु झाला.

# गुरु महिमा


सुफी संत हजरतबाबा जान

**मेहेरबाबा.**

मेहेरबाबा हे एका पारशी ईश्वरभक्त शेरियारजी यांच्या पोटचे संतान. त्यांचे मूळ नाव मेरवान. सन १८९४ साली पुण्यात त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्याला काव्य, साहित्य, क्रिडा यांची आवड होती. त्याचबरोबर तो संभाषण चतुरही होता. एकांतात बसून चिंतन करण्याची सवय होती. वयाच्या १९व्या वर्षी पुण्यातच एक सुफी संत महिला हजरतबाबा जान हिच्याशी भेट घडून आली. सिध्दशैलीच्या अध्यात्मवादी त्या सुफी संतीनीने मेरवानला पाहिल्या बरोबर जवळ घेऊन त्याच्या भ्रूमध्यावर आपले ओठ ठेवून चुंबन घेतले.


मेहेरबाबा

खरे तर ही सुफी संतीन बलुचिस्तान मधली. तेथे तिच्यावर गुरुकृपा झाल्याने ती बालोन्मत पिशाच्च वृत्तीने वागत असे. बलुची सैनिकांनी तिला वेडी समजून जमिनीत पुरले. पण ती पुण्यात जीवंत अवतरली आणि मेरवान तिला भेटला. कदाचित त्याच्या साठीच तिने तो चमत्कार केला असावा. पुण्यातच तिची संत म्हणून ख्याती झाली. मेरवान नित्य तिला भेटण्यास जात असे. एके दिवशी अनेक भक्त जमलेले असता, तिने मेरवानकडे निर्देश करुन सर्वांना सांगितले, माझा हा पुत्र जगात क्रांती घडवून सकल मानव जातीचे कल्याण करणार आहे. त्यानंतर मेरवानला झटके येऊ लागले. तीन दिवस तो बेशुध्दावस्थेत होता. डॉक्टरी इलाज काही केल्या होईना. पुढे वर्षभर तो भ्रमिष्ट अवस्थेत राहिला. त्यातच तो गुरुंच्या शोधात निघाला आणि केडगावला नारायण महाराजांच्या आश्रमात पोहोचला. तेथून नागपुरास येऊन हजरत ताजुद्दीनबाबांच्या छायेत आला. तेथेच मेरवानला योग्य मार्ग सापडला तो शिरडीचा. बाबांजवळ येताच त्यांनी मेरवानची अवस्था जाणून त्याला खंडोबाच्या मंदिरात सिध्दावस्थेत पोहोचलेल्या उपासनींकडे पाठविले. मेरवान समोर येताच उपासनींनी एक दगड त्याच्यावर भिरकावला तो बरोबर मेरवानच्या कपाळाच्या भ्रूमध्यावर (जेथे हजरतबाबा जान ने चुंबन घेतले होते) बसला. बस! तात्काळ परिवर्तन घडले. मेरवानचे रुपांतर मेहेरबाबा सत्पुरुषात झाले.

मेहेरबाबा सहा महिने आपल्या गुरुंसोबत राहिले. त्यांची कृपा प्राप्त केली आणि गुरुकार्य करण्यास बाहेर पडले. गरीब व कुष्ठ रोग्यांची सेवा संस्था निर्माण करुन विश्वकल्याण्याचा मार्ग अंगिकारला. पुढे नगर जिल्ह्यात आश्रम काढून आपले सेवा कार्य जोमाने सुरु ठेवले.

# गुरु महिमा

उपासनी महाराजांनी समाधीस्त होण्यापूर्वी मेहेरला मी सर्वस्व दिले आहे, असे जाहिरपणे म्हणून त्यांनी मेहेरबाबांना नमस्कार केला. एका गुरुने आपल्या शिष्याला केलेला तो पूर्णतेचा नमस्कार होता.

पुढे मेहेरबाबांनी अनेक वर्षे मौन बाळगले. आपल्या गुरुंनी उपासनींनी बाबांची निधर्मी पताका सांभाळली नाही. परंतु मेहेरबाबांनी ती परंपरा पुढे नेली; आणि सन १९६८ मध्ये समाधी घेतली.

## गुरुभक्तीचे प्रतीक काकासाहेब दिक्षित.

काकासाहेब हे त्याकाळचे प्रसिध्द व सर्वांत यशस्वी ठरलेले कायदेतज्ञ! जस्टीस ऑफ पीस होते. म्युनिसिपल कौऊन्सीलर होते. त्यानंतर युनिव्हर्सिटीचे फेलो, काऊन्सीलचे सभासद व नामदारही होते. सन १९०७ साली ते कुशाभाऊ आणि भीष्म शिरडीत आले. हे तिघेही गुरुभक्त. या तिघांच्या व्यक्तिमत्वांमुळे बाबांचा गुरुस्वरुप उपासनेला शक्ती व आकार प्राप्त होऊन बाबांचे तेजोवलय सर्वत्र पसरले.

एकदा काकासाहेबांच्या पायाला दुखापत होऊन ते थोडे अधू बनले. येथेच त्यांना गुरुशरणेची उपरती झाली आणि मित्र नानासाहेबांकडून बाबांची माहिती मिळवून ते शिरडीत आले. गुरुभक्ती गाठीस असल्याने साईंना पाहताच त्यांचे तन-मन बाबांठायी समरस झाले. गुरुप्रेमात लीन झाले. बाबांनीही त्यांची अनेक प्रकारे पारख करुन त्यांच्यावर प्रसन्न झाले. साईसच्चरित्रकार अण्णासाहेब दाभोळकर (हेमाडपंत) हे काकासाहेबांमुळेच शिरडीकडे आकृष्ट झाले आणि तेही बाबांच्या प्रसादास पात्र ठरले.

काकासाहेबांनी आपली गुरुभक्ती, सर्वस्व साईचरणी समर्पित केली. त्यांचे जेव्हा देहावसान झाले त्यावेळी निंबाची एक फांदी व द्वारकामाईचा एक कळस मोडून खाली पडला होता. बाबांनी काकासाहेबांना त्यांच्या भक्तीभावाला योग्य असेच सहज मरण दिले. काकासाहेबांना मुक्त केले.

## सेवा-भक्तीचे प्रतिक अब्दुल्ला.

अब्दुल्लाचा जन्म १८७१ चा! बाबांपेक्षा ३६ वर्षांनी लहान होता. तो जेव्हा शिरडीस आला तेव्हा बाबांचे वय होते ५५! आणि अब्दुल्ला १९ वर्षांचा तरुण! हा खरे तर नांदेडचा! अमरुद्दीन फकीराचा चेला! बाबानीच अमरुद्दीनच्या स्वप्नात जाऊन अब्दुल्लाला शिरडीत पाठविण्याची आज्ञा केली होती. त्याप्रमाणे अब्दुल्ला शिरडीत येऊन दाखल झाला होता. म्हाळसापती, मेघा हे जसे बाबांच्या सेवेत तत्पर होते, त्यांच्याप्रमाणेच तो ही बाबांचा सेवेकरी झाला.

शिरडीतील रस्त्यांची साफ-सफाई करणे, मशीद स्वच्छ ठेवणे, साईंच्या दैनंदिन गरजांकडे लक्ष पुरविणे हे त्याचे नित्याचे काम अत्यंत आनंदाने तो करीत होता. बाबांच्या समीप तो नमाज पढे, कुराणाचे पठण करे. आपल्या कडकडीत वैराग्याने आणि मुस्लीम परंपरेने बाबांची सेवा करी. बाबा भक्त मंडळींना गप्पांच्या ओघात

जो उपदेश करीत त्या मधुर आणि पवित्र शब्दांची अब्दुल्ला आपल्या वहीत नोंद करुन घेत असे. बाबांना तो श्रेष्ठ अवलिया माने. पीरान-पीर दस्तगीर समजे. बाबांची सेवा म्हणजेच अल्लाची सेवा असे त्याच्या हृदयी घट्ट बांधले गेले होते.

एकदा शाम्याने अब्दुल्लाच्या उपस्थितीत बाबांना त्याच्या विषयी विचारले बाबा हा मुलगा किती दिवस आपल्या सेवेत राहणार आहे ? तेव्हा बाबा म्हणाले, हा त्याच्या अंतापर्यंत माझ्याच जवळ राहून माझ्या मागून माझ्या तुर्बतीची साफ सफाई करुन तिच्यावर फुले, गलेफा पसरवून ती सजवील. तो माझ्या श्रध्दा-सबुरीचा भक्त आहे. माझ्या नंतर त्याला भेटण्यासाठी व त्याच्या सल्ल्यासाठी भक्त रांगा लावतील. त्यावेळी अब्दुल्लाने म्हटले, बाबा हे मोठेपण मला नको. फक्त आपल्या वचनांची व उपदेशांची दप्तरी नोंद ठेवण्याची परवानगी द्या. एवढीच बिदागी असू द्या.

बाबांनी आनंदाने त्याला आशिर्वाद देताना म्हटले, अब्दुल्ला तू जे पठण करशील त्याचे मनन-चिंतन कर, कुराणांच्या वचनांकडे ध्यान दे ! तू कोण आहेस त्याचे चिंतन करीत रहा, तू देहातच चांद-सूरज पाहशील !

बाबांच्या सहवासातूनच त्याने व्यावहारिक, आध्यात्मिक व इस्लामी साधनेचे शिक्षण घेतले.

खरेच, अब्दुल्लाने मन:पूर्वक बाबांची रात्रंदिवस सेवा केली. त्यांना काय हवे-नको त्याकडे लक्ष पुरविले. पुढे त्याने बाबांच्या वचनांची नोंदवही लिहिली. बाबांच्या देहावसानंतर अब्दुल्लाने बुटीवाड्यात राहून समाधीची सेवा केली आणि भक्तांना योग्य मार्गदर्शन केले.

सन १९५४ साली अब्दुल्लाने देहविसर्जन केले. साईचरणी विलीन झाला.

## ज्ञानीभक्त - दादासाहेब खापर्डे.

दिवाण बहादूर गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे हे अमरावतीचे कायदेतज्ञ. भारताच्या त्याकालीन जीवनातील ते एक नामवंत नेते. लोकमान्य टिळकांचे एक हातच होते. त्यांच्या ब्रिटीशांना आपल्या देशातून हाकलून लावण्याच्या चळवळीतील खापर्डे एक जहाल वक्ते व नेते ! त्यांना समांतर असे काकासाहेब दिक्षित, तेही नेते होते पण मवाळ पक्षाचे ! दोघेही कायदे पंडित. काकासाहेब एका दुर्दैवी अपघातातून साईचरणी आले तर खापर्डे आपल्या जहाल भाषणाने व विचारसरणीने ब्रिटीशांचा रोष ओढवल्याने बाबांच्या चरणी आश्रयास आले. त्यावेळी बाबा खापर्डेंना म्हणाले, मी तुझ्याजवळ असताना तुला भिती कशाची ? कारण, आधीचं लोकमान्यांना ब्रह्मदेशात मंडालेल्या तुरुंगात डांबण्यात आले होते. त्या संकटाची छाया खापर्ड्यांकडे वळत होती.

श्रीसाईंना कोठेही होणाऱ्या व घडणाऱ्या संकटांची पुरती जाणीव असे वा त्या त्या गोष्टी सहज कळत

असायच्या. परंतु त्या त्या परिस्थितीत बदल करुन, कठीण काळ प्रसंगी बाबा आपल्या भक्तांची सुटका करीत.

खापर्डेंची पत्नी ही एक पुण्यात्माच होती. तिचे पूर्वजन्म बाबांनी शामाला सांगितले होते. राधाबाई वा इतर तयारी नसलेल्यांना बाबांनी मंत्रदीक्षा दिली नाही. परंतु खापर्डेंच्या अर्धांगिनीला ''राजाराम'' म्हण अशा शब्दांत मंत्रदिक्षा दिली. कारण तेवढी तिची योग्यताही होती. म्हणूनच या भक्तावर बाबा तेवढेच प्रेम करीत. तिला बाबा म्हणाले, गव्हर्नर शस्त्र घेऊन आला होता. त्याच्याशी मी झगडा करुन माझ्या म्हणण्यास होकार करण्यास अनुकूल करुन घेतले. तो चुपचाप निघून गेला.


खापर्डे ब्रिटिशांचा रोष पत्कारुन बाबांपाशी आले तेव्हा बाबा म्हणाले, शिरडी हे ही तुझे घरच आहे. तुला भीती बाळगण्याचे कारण नाही. जे माझ्यावर प्रेम करतात त्यांच्यावर माझी बारीक नजर असते. तू केव्हाही येथे वा तुझ्या लौकिक घरी येऊ जावू शकतोस. हे बाबांचे आश्वासन होते.

खापर्डे हे मराठी वाङ्मयाचे, संस्कृत भाषेचे फार मोठे अभ्यासक, ज्ञाते व पंडित होते. योगवशिष्ठ, पंचशील, परमामृत या आणि अशा अनेक ग्रंथावर त्यांची भाषणे, प्रवचने ऐकण्यास तोबा गर्दी लोटत असे. उपासनी महाराजांनी त्यांचे पांडित्य पाहून त्यांना नमस्कार केला होता. बाबांचे कथाकथन यावरही ते चिंतन व भाष्य करायचे. म्हणूनच पूर्वसुकृताने बाबांचा त्यांच्यावर अतिशय लोभ होता. त्यांच्या प्रापंचिक व आत्मिक कल्याणाची काळजी होती.

परंतु खापर्डेंचे मन बाबांच्या सत्संगात गुंतले वा रमले नाही. त्यांना होती ती फक्त व्यवसायाची व व्यवहाराची ओढ. पांडित्य, ज्ञान असूनही भक्तिमार्गात, बाबांच्या सहवासात शोकून देणे खापर्डेंना जमले नाही. ते आपल्या मूळ गावी निघून गेले. पण बाबांची कृपा तशीच राहिली. त्यांना व्यवसायात नावलौकिक मिळाला. ऐश्वर्य मिळाले. त्यांचा मुलगा मंत्री झाला. पुढे ते स्वतः कौन्सिल ऑफ स्टेटसचे सदस्य बनले. बाबांनी त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबावर अपार प्रेम केले. पण खापर्डेंनी आत्मसाधन स्वीकारले नाही. त्यांचे निवर्तन वैभव व शांती झाले. परंतु आत्मबोध मात्र झाला नाही.

श्रीसाईनाथांची 'श्रध्दा व सबुरी' हे केवळ शब्द नाहीत किंवबा संकल्पनाही नाही. बाबांचे सुशिक्षित भक्तही बाबांची ही तत्वे नीट जाणू शकले नाही. परंतु पुढे बाबांच्या छत्रछायेत आलेल्या गणूसारखा साधक, भीष्मांसारखे तपस्वी, साठेंसारखे गुरुनिष्ठ, कुशाभाऊंसारखे दत्तनिष्ठेतून साकारलेले गुरुभक्त आणि उपासनी महाराजांसारखा भक्तांनी ते जाणले. तेव्हाच 'सबुरी' प्रगट झाली.

# गुरु महिमा



नरसिंहमहाराज

## मद्रासचे संत श्री नरसिंहस्वामी.

श्रीसाईनाथांचे चरित्र रेखाटण्याचा प्रथम नाम हेमाडपंत अर्थात दाभोळकरांना मिळाला. त्यांचे साईसच्चरित्र आज भक्तगण पोथी म्हणून पारायण करतात. बाबा असतानाच ते शिरडीत आले. त्यांच्या वाक्चातुर्यावर खूष होऊन बाबांनी त्यांना हेमाडपंत पदवी देऊन त्यांच्या चिकित्सक बुद्धीलाही लगाम घातला. पुढे बाबांनीच त्यांना कथांची व अनुभवाची नोंद करण्यास परवानगी दिली. त्यामुळेच साईसच्चरित्र हे अधिकृत चरित्र टिप्पण ठरले गेले. कारण दाभोळकरांचे लेखन भावनिकतेचे बनले आहे.

हेमाडपंत नंतर दुसरे चरित्रकार आहेत, नरसिंहस्वामी. हे आपल्या पूर्वायुष्यातील एक उत्तम वकिल, तर्कपंडित आणि थोर दत्तभक्त असा नावलौकिक कमावलेले व्यक्तिमत्व! डॉ. ॲनी बेझंट यांच्या सोबत होमरुल चळवळीत सहभाग घेतलेले, लोकमान्य टिळकांच्या मोहिमेतही होते. रमण महर्षी, मेहेरबाबा, उपासनी महाराज यांच्या सान्निध्यात राहून आत्मानुभवी व तर्कनिष्ठ झालेले होते. त्यांनी साईचरित्राचा सखोल अभ्यास करुन त्याचा अविश्रांत वेध घेऊन भक्तांचे अनुभव गोळा करुन चार खंडात श्रीसाईनाथांचे चरित्र लिहिले.

नरसिंहस्वामींचा जन्म मद्रास प्रांतात (दक्षिणेत) सालेम येथे सन १८८४ साली झाला. बाबांना ते समकालिन होते. बाबांच्या निर्वाणानंतर तीन वर्षांनी म्हणजे सन १९२१ मध्ये प्रपंचातील दुःखातून (पुत्र वियोगाने विध्द होऊन) गुरुच्या शोधाची त्यांची यात्रा सुरु झाली. शृंगेरीच्या शंकराचार्यांकडून त्यांना दिक्षा मिळाली होती. रमण महर्षींच्या कृपेचाही त्यांना लाभ झाला. त्यांच्या आश्रमात ३ वर्षे राहून त्यांनी रमण महर्षींचे आत्मासाक्षात्कार (Self Realisation) चरित्र लिहिले. तेथेच त्यांना उत्तरेकडे गुरुंचा लाभ होईल हे कळल्यावर नरसिंहस्वामीं मजल दर मजल करीत पंढरपूरास आले. केडगाव येथे येऊन नारायण महाराजांची भेट घेतली. पुढे मेहेरबाबा, उपासनी महाराज ह्या साई परंपरेतील संतांच्या आशिवार्दाने आणि प्रेरणेने ते सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथांच्या समाधीकडे आकृष्ट झाले. साल उजाडले होते १९३६! म्हणजे वयाच्या ५२ व्या वर्षी अनेक संतांच्या, महापुरुषांच्या लाभलेल्या सहवासाने, आशिर्वादाने, कृपेने ते एक उच्च साधक झाले होते. पुढे इंदूर येथे न्या. रेगे यांच्या प्रेरणेने त्यांचा साई परिवारात प्रवेश होऊन त्यांचा आत्मविकास झाला.


साईबाबांच्या कृपाक्षेत्रात आल्यानंतर, अखंड कृपा प्राप्त झाल्यानंतर नरसिंहस्वामींनी मद्रास प्रांतात साई उपासनेची पताका उभारली. सन १९४१ मध्ये मद्रास येथेच 'ऑल इंडिया साई समाज' निर्माण केला. आपल्या अचाट लेखनीतून, वाणीतून आणि अखंड परिश्रमातून त्यांनी साई उपासनेची, प्रभेची ज्योत तेवत ठेवली.

म्हणजे सन १९५६ पर्यंत (२०वर्षे) श्रीसाई महात्म्याचा प्रसार दक्षिणेत करण्याचे कार्य पूर्ण केले.

श्रीनरसिंहस्वामींनी साई महात्म्याची मुहूर्तमेढ रोवली ती ''साईसहस्त्रनामावली'' हे दिव्य पुस्तक लिहून! त्यांच्या साई कार्यांची सुरुवात झाली. भक्तांना आलेले खरेखुरे आणि प्रबोधक अनुभव गोळा करुन चार खंडात साईनाथांचे चरित्र लिहिले. या कार्यात त्यांना पुण्याचे न्यायाधीश अवस्थी यांच्या मदतीचे फार मोठे योगदान मिळाले. पुढे नरसिंहस्ामींनी मद्रास च्या संडे टाईम्स मध्ये आणि इतर इंग्रजी वृत्तपत्रात साईनाथांच्या महतीचे गोडवे गाईले. अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. छोट्या-छोट्या पुस्तिकेद्वारेही साईनाथांचा परिचय दक्षिणेतील जनमाणसांना करुन दिला. ''साईसुधा'' नावाचे मासिकही तेथे सुरु केले. हेच पुढे 'ऑल इंडिया साई समाज' संघटनेचे मुखपत्र बनले. या त्यांच्या महत कार्यामुळेच दक्षिणेत अनेक साई समाज व उपसमाज उदयास येऊन दक्षिण दिशा साईनामाने आणि आणि महिम्याने सुगंधित झाली.

श्रीनरसिंहस्वामी हे केवळ राजकीय चळवळीतील वा सामाजिक आंदोलनातील नेते नव्हते तर एक उच्च शासकिय अधिकारी होते. त्यांनी साईनाथांचा जीवन संदेश बसविला तो भागवत भक्तीच्या चौकटीत! त्यांचा आवाकाही फार मोठा होता. कारण ते स्वतः कायदेपंडित, उत्तम वक्ते, प्रवचनकार होते. सामाजिक व राजकिय चळवळीच्या प्रवाहातून त्यांचा प्रवास झाला होता. त्यामुळेच त्यांचा भक्तिभाव, चिकित्सा आणि विवेक या वर आधारलेला अतिशय व्यापक व विशाल दृष्टीचा होता. म्हणूनच त्यांनी लेखन, भाषणे, प्रवचने एवढ्यावरच न थांबता साई समाजाची स्थापना, उत्कृष्ट प्रचार इत्यादी गोष्टींनी साई महिमा सर्वत्र पसरविला. आणि सन १९५६ मध्ये नरसिंहस्वामी साई चरणी विलिन झाले.

श्रीनरसिंहस्वामींनी साईंचे नाव व महात्म्य महाराष्ट्राच्या पलिकडे उत्तर व दक्षिण भारतात पसरविले, स्थापित केले. आपल्या वकिलीचा, राजकिय आणि सामाजिक जीवनाचा त्याग करुन नरसिंहस्वामींनी काया, वाचा, मने साई जीवनाचे तत्वज्ञान आणि ज्ञानभक्तिचे दर्शन भक्तांना घडविले. त्यांचा हा मार्ग पुढे त्यांचे भक्त आणि अनुयायी राधाकृष्ण स्वामी, साईपादानंद यांनी चालवून बंगलोर येथे साईनाथांचे सांस्कृतिक केंद्र उभारुन उपासना अधिक सतेज केली.


राधाकृष्णस्वामी

## राधाकृष्णस्वामी.

राधाकृष्ण स्वामी हे देखील दक्षिणेतील. बालवयातच त्यांच्यावर धार्मिक संस्कार झालेले! श्री. नरसिंहस्वामींपासून प्रेरणा मिळून ते साईभक्तित दाखल झाले. केडगावच्या नारायण महाराजांकडून त्यांना दत्तमंत्र प्राप्त झाला होता. त्याही पुढे रमण महर्षी, शेषाद्री स्वामी, नरसिंह स्वामी यासारख्या सिध्दवंत सत्पुरुषांचा सहवास व उत्तम मार्गदर्शन लाभून ते एक उच्च साधकावस्थेत पोहोचले होते.

नरसिंहस्वामींच्या प्रभावात येऊन साईमय झाले. साईनाथांच्या शिकवणीचा प्रसार करणे हेच राधाकृष्ण स्वामींचे जीवितकार्य बनले होते. बंगलोर येथे साई अध्यात्म केंद्राची स्थापना करुन त्यांनी कर्नाटकात साईंचा प्रचार केला. बाबांनी त्यांना अनेक चमत्कारिक अनुभव देऊन आपल्या सेवा कार्यात, प्रचार मोहिमेत सामावून घेतले. त्यांचा आशिर्वादाने अनेक भक्तांच्या समस्या सुटत असत. संकटांतून सुटका होत असे. परंतु राधाकृष्णांनी स्वतःचे सामर्थ्य व साधना नरसिंहस्वामींमध्ये विलिन करुन विनयशील जीवन जगले. शेवटी नरसिंह स्वामींच्या मद्रासच्या 'ऑल इंडिया साई समाजात' ते संलग्न झाले.

## स्वामी शरणानंद.

राधाकृष्ण स्वामी ज्याप्रमाणे नरसिंहस्वामींच्या सहवासाने साईभक्तित, साई सेवेत रममाण झाले त्याप्रमाणे आणखी एक गुजराथी भक्त नरसिंहस्वामींच्या श्रध्दा आणि सेवेला भारावून साईचरणी आला, ते म्हणजे शरणानंद होत! यांचा जन्म सन १८८९ मध्ये बोर्डोलीचा. त्यांचे मूळ नाव वामनभाई पटेल. विद्यार्थी दशेत असताना ते शिरडीत बाबांच्या छायेत राहून कृपा संपादन केलेली होती. पुढे तारुण्यात ते शाशंक, होते ते निराकार ब्रह्म श्रीरामकृष्णांचा अवतार धारण करुन दृष्टांचा संहार करते!

साल होते १९११! शरणानंदांनी नुकतीच वकिलीची परिक्षा दिली होती. त्यांच्या दत्तभक्त वडिलांनी त्यांना शिरडीस बाबांच्या दर्शनास पाठविले. तो काळ आहे उपासनी महाराज, खापर्डे यांसारक्या बुध्दीनिष्ठ आणि योगसिध्द परंपरेतील भक्तांचा! शरणानंद शिरडीत येऊन बाबांच्या दर्शनास गेले आणि त्यांना पाहताक्षणी बाबा उद्‌गारले, देव आहे हे सत्यच आहे. तू शंका का धरतोस? बाबांच्या शब्दांसरशी शरणानंदांच्या मनी श्रध्दा उचंबळून आली. त्यांनी बाबांना पुष्पहार अर्पण करताच बाबा म्हणाले, ''दक्ष अखंड सावधान रहा. साक्षी बन. तुला ईश्वराचे दर्शन घडेल.'' बाबांचे हे बोल, साधनात्मक मार्गदर्शन होते.

पुढे शरणानंदानी बाबांची पूर्ण कृपा संपादन केली. बाबांची लीला, शिकवण, मार्गदर्शन त्यांनी 'श्रीसाई दी सुपरमॅन' ह्या पुस्तकात गुंफवली.

## साईबाबांची विक्षिप्त करणी.

श्रीसाईंनी इतके चमत्कार केलेले आहेत की त्यातील काही सामान्य आहेत, (एखाद्या सामान्य सिध्दि प्राप्त झालेला करुन दाखवू शकतो) तर काही चमत्कार असे आहेत की माणसाच्या मेंदूला झिणझिण्या आल्याशिवाय राहत नाही. त्याचे उदाहरणच पाहू! साईसच्चरित्र अध्याय तेरावा! काका महाजनींना अजीर्ण झाले आणि सारखे जुलाब होऊ लागले, इतके की काका त्याने क्षीण व श्रस्त झाले. श्रीसाईंनी काकांचा हा रोग कसा बरा केला? काकांना त्यांनी भाजलेले भूईमुगाचे खूप दाणे खावयास दिले. भूईमुगाचे दाणे व हगवण यांचे संबंध

किती जवळचे आहेत हे सर्वश्रुत आहेच. म्हणजे ज्याच्या खाण्याने जुलाब लागतात तेच जुलाब बंद कसे करतील? उलट आणखी जास्त परिणाम नाही का होणार? केवढा हा विरोधी आणि घातक उपाय! परंतु काकांचे अजीर्ण बरे होऊन जुलाबहि थांबले.

याच अध्यायातील आणखी एक आश्चर्यकथा आहे ती, भीमाजी पाटील यांची! ह्यांना खोकल्याचा क्षयरोग झाला होता. अनंत उपाय करुन झाले तरी ताप काही पिच्छा सोडत नव्हता. अखेर भिमाजींनी श्रीसाईंचे चरण गाठले. त्यांची अवस्था पाहून बाबांचे मन द्रवले आणि त्यांनी केवळ कृपादृष्टीने भीमाजींचा क्षयरोग मुळासकट उपटून काढला.

येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, जन्म आहे म्हणजे भोग आहेत. भोगल्याशिवाय दुसऱ्या उपायाने त्यांची क्षालना होत नाही. तरीही दैव बलवत्तर असेल आणि संतांची भेट झाली तरच दु:खहारक औषध मिळते. अर्थात संतांच्या कृपादृष्टीनेच सर्व पीडा हरण होतात. थोडक्यात बाबांची विक्षिप्त पध्दत कोणाला कशी कळणार? ह्यावर आणखी एक बाबांचा चमत्कार सांगावासा वाटतो, ती कथा वाचल्यावर वरील 'विक्षिप्त' शब्द का वापरला गेला ते पटकन लक्षात येईल.

शिर्डीचे माधवराव देशपांडे उर्फ श्यामा हे बाबांचे अत्यंत लाडके होते. एकदा त्यांच्या डोळ्यात लाली पडली व डोळे सुजले. ते बाबांकडे येताच बाबांनी कोणता बरे उपाय केला असेल! काही बिब्बे घेऊन ते ठेचले आणि त्यांचा गोळा करुन श्याम्याच्या डोळ्यांत घालून वर पट्टी एक दिवस व एक रात्र बांधून ठेवली.

दुसऱ्या दिवशी डोळ्याची पट्टी सोडली आणि डोळे पाण्याने स्वच्छ धुवून काढले आणि लोक आवासून पाहत राहिले. डोळ्यांची सूज जाऊन लाली नाहीशी झाली होती व डोळे साफ बरे झालेले होते.

बाबांचा उपाय हा लोकदृष्टीने राक्षसी उपाय होता. डोळे फुटण्याचाच मार्ग होता. पण बाबांनी या राक्षसी उपायानेच श्यामाचे डोळे बरे केले. आहे की नाही बाबांची विक्षिप्त करणी!

यांच श्यामाला एकदा सर्पदंश झाला. अंग लाल झाले. सारखा तळमळू लागला. कारण विषाचा प्रभाव वाढू लागला होता. लोकांनी श्यामाला उचलून बाबांसमोर आणले. कारण तो बाबांचा निस्सीम भक्त होता आणि बाबाही त्याच्यावर मुलाप्रमाणे प्रेम करीत. परंतु घडले नेमके उलटे. श्यामाला बाबांकडे आणताच बाबांनी रुद्रावतार धारण करुन म्हणाले, वर चढशील तर भटुरड्या खबरदार, खाली उतर! या अचानक घडलेल्या प्रकाराने लोकही फार घाबरुन गेले. श्यामा घरी गेला आणि साफ बरा झाला. विषाचा मागमुसही शिल्लक राहिला नाही.

काय हा बाबांचा विक्षिप्तपणा! ''वर चढशील तर भटुरड्या खबरदार, खाली उतर.'' या वाक्याने श्यामाचे

विष उतरले गेले.

येथे एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, सर्पदंश झालेला सहसा बरा होत नाही. त्याला आपण आता मरणार असेच वाटत असते. कारण होणाऱ्या वेदना त्याचबरोबर मानसिक धक्का होय! यामुळे काय होते काही काळ रक्ताभिसरण स्थगित होऊन एक प्रकारची विकृती निर्माण होते. परंतु त्याचवेळेस एखाद्या चांगल्या वैद्याने, मांत्रिकाने एखाद्‌ तोडगा काढला की आपण या इलाजाने जगू शकतो अशी भावना प्रबळ होते व मृत्यूची भीती कमी होते. हे झाले मानसशास्त्र. मात्र बाबांनी श्यामावर ना औषधोपचार ना मानसशास्त्राचे उपाय केले. उलट रोग्याला घाबरविण्याचे ते शास्त्र होते. श्रीसाईंचे साईंनाच ठाऊक!

आजार कोणताही असो एक ठराविक उपाय बाबांनी अमलात आणला नाही. त्यांचे सारे काही अजब असे. दादासाहेब खापर्डे ही शिरडीतच वास्तव्यास होते. त्यांचा मुलगा एकदा ग्रंथीज्वराने आजारी पडला. लहान मुलगा आजारी झाला की आईचे हृदय ते कळवळणारच! तिची अस्वस्थता वाढू लागली. खापर्डे हे मुळचे अमरावतीचे. तेथे परतून जावे असा तिच्या मनात विचार आला. तेही साहजिकच म्हणा. ती माऊली बाबांची आज्ञा घेण्यास आली. सायंकाळची आपली फेरी (लेंडीबागेची) आटोपून बाबा वाड्यापाशी येताच खापर्डेंच्या पत्नीने बाबांचे पाय धरले व रडू लागली. घडलेली गोष्ट तिने बाबांच्या कानी घातली. आधीच बाईची जात घाबरी, त्यात मुलाचे थरथरणे थांबत नव्हते. शिवाय ग्रंथीज्वराची भीती! बाबा शांतपणे म्हणाले, भीती कशाला बाळगायची. आभाळ भरुन आले आहे, पाऊस पडून जाईल. ढग वितळून जातील, इतके म्हणून श्रीसाईंनी आपली कफनी कमरेपर्यंत वर उंचावून दाखविली. पाहतात तो श्रीसाईंच्या अंगावर कोंबड्याच्या अंड्याएवढ्या ताज्या टवटवीत चार ग्रंथी सर्वांनी पाहिल्या. बाबा म्हणाले, तुम्ही मला साकडे घालता, मग मला भोग भोगावे लागतात. येथे बाबांनी त्या मुलावर कोणते उपचार केले! फक्त मुलाच्या आईची मुलाबद्दलची कळकळ ऐकली, आणि म्हणाले ते काय? आभाळ भरुन आले आहे. याचा अर्थ संकट आले आहे, पाऊस पडून जाईल म्हणजे संकट निघून जाईल, आणि पुन्हा दुःख दूर होऊन सुख मिळेल. अर्थात संकट टळल्यावर मिळतो तो आनंद!

सद्‌गुरुंचे स्मरण केले म्हणजे नारायण संतुष्ट होतो. भगवंताला स्वतःपेक्षा सद्‌गुरुंची स्तुती केलेली जास्त आवडते. म्हणून सद्‌गुरुंची स्तुती करुन शिष्यांनी आपला उद्धार करुन घ्यावा. ज्यांना सद्‌गुरुपदी एकजीव व्हायचे असेल त्यांनी सद्‌गुरुंचे गुणगान करावे, सद्‌गुरुंचे कीर्तन करावे.

साईबाबा म्हणजे युगावतार! श्रीसाई म्हणजे पूर्ण संतत्वच! साधे-भोळे-गरीब फकीराच्या वेषातील! योग-कर्म-भक्ति-ज्ञान यांचा समन्वय त्यांनी केला. जरी त्यांनी प्रवचने केली नाहीत, काव्ये केली नाहीत, ग्रंथ लिहिले नाहीत, तरी त्यांच्या शब्दांतून, कृतीतून, आविर्भावातून विश्वातील ज्ञान ओसंडत असे. म्हणूनच श्रीसाईंचे संतमंडळीत धार्मिक, एकात्मता, आध्यात्मिक गोष्टीत वेगळे स्थान आहे. दुःखी-कष्टी, पिडीत,

# गुरु महिमा

आर्त मानवाच्या उद्धारासाठी, शांती, एकात्मता व मुक्ती इत्यादींचा विश्वसंदेश घेऊन महागुरु म्हणूनच ते अवतरले होते. चमत्कार हे होतच असतात. परंतु सिध्द व अवतारी विभूतींचे अस्तित्व हाच मोठा चमत्कार ठरतो. सूर्य उगवताच तेजाचा उगम होतो त्याचप्रमाणे चमत्काराची प्रभा वा वलय अवतारासोबत एक सहज अविष्कार म्हणून प्रकट होते. श्रीसाईंच्या चमत्कारांना म्हणूनच आगळे महत्व आहे.

श्रीसाईंचे अवतरण म्हणजे पृथ्वीतत्व व आकाशतत्व यांचे मिलन होते. दोन महाभूतांची भेट होती. एकाच जागी बसून त्यांचा विश्वाशी स्पर्श होत असे. त्यांना कोठे होता जात-पात व पंथ ? मानवता हीच श्रीसाईंची जात होती. म्हणूनच ''अल्ला मालिक'' ही त्यांची ओळख होती. ''अल्ला भला करेगा'' या आशिर्वादातून बाबांची कृपा दृष्टी प्रगट होई. एकनाथ महाराजांचे जसे पैठण, तुकोबांचे देहू, ज्ञानोबांची जशी आळंदी तशी श्रीसाईंची शिर्डी.

मुलतः या पृथ्वीतलावर संतांचे अवतरण कशासाठी होते ? असे कोणते कठीण कार्य असते ? आपण त्यासंबंधी पुराणांतून भगवंताच्या अवतार कार्यातून ऐकत आलो आहोत, वाचत आलो आहोत. तरीही यामधून एक गोष्ट स्पष्ट होते, जेव्हा मनुष्य आपले पूर्वायुष्य, निरोगी स्थिती, सुख-शांती हरवून बसतात, गमावतात, निव्वळ पोटाची खळगी भरणे, विषय सुखात लोळत राहून तोच एक आनंद मानून नीती भ्रष्ट होतात तेव्हा संतांचे अवतरण होते, आणि त्यांचे अवतरण वा अवतार फक्त आणि फक्त दुसऱ्यांसाठीच असतो.

श्रीसाईंना नामस्मरणाची अत्यंत आवड होती. सदासर्वदा ''अल्ला मालिक'' असे म्हणत असत आणि दुसऱ्यांनाही नामजप देऊन त्यांच्याकडून नामस्मरण करुन घेत असत. परोपकारार्थ सतत झटत! भक्तांना आधार देऊन त्यांची दुःखे स्वतः भोगीत. ते हिंदु कां मुसलमान, हा गहन प्रश्न होता. बाबांचे कान टोचलेले होते, त्यामुळे ते यवन कसे होतील ? हिंदू म्हणायचे तर सदा मशिदीत वास्तव्य करीत. रामनवमी, गोपाळकाला धुमधडाक्यात साजरा करीत तर संदल मिरविण्यासाठी यवनांनाही आनंदाने मोकळिक देत. ईद आली की स्वतः नमाज पडत तर मशिदीत दळणकांड, घंटा-शंख वादन, अग्नि-संतार्पण करीत. त्यांनी आपला देहाभिमान झिजवून टाकला होता. म्हणूनच ते सर्व जातिधर्मातीत असे, नित्य नारायणाला शरण गेलेले हरिभक्त होते.

अगदी सुरुवातीला शिर्डीत श्रीसाईंची ओळख 'वेडा फकीर' अशीच होती. परंतु काही दयाळू माणसे बाबांना महंत समजत. फक्त पाच घरी बाबा भिक्षा मागित आणि जे झोळीत पडेल ते खाऊन त्यातच आनंद मानित. एका हातात टमरेल व दुसऱ्या हाती झोळी. भाजी-आमटी, दुध इत्यादी टमरेलात घेत आणि शिजलेला भात, भाकरी झोळीत टाकत. पोरी, चतकुर भाकरी दे, असे म्हणून त्यांच्या दारी श्रीसाई उभे रहात होते, ते किती धन्य असतील. विश्वंभरच त्यांच्या दारी उभा असे. कधी कधी एखाद दिवशी श्रीसाई बारा वेळा भिक्षा मागीत.

आणलेली भिक्षा मशिदीत एका कुंडीत ठेवीत. कावळे, कुत्रे ते अन्न खात असत. पण बाबा त्या मुक्या जीवांना कधीही हाकलत नसत. शिवाय अंगण झाडणारी एक बाई बाबांनी आणलेल्या भिक्षेतून दहा-बारा भाकऱ्या घरी घेऊन जाई. तिला कोणी रोखीत नसे.

## संसार जळातील अमृत बाबांची उदी.

धूनीतून उत्पन्न होणाऱ्या राखेस (बाबाच्या भाषेत उदी) बाबांच्या जीवनात अत्यंत महत्व होते. त्यांच्या कृपाशिर्वादात उदी ही प्रभावी माध्यमच जणू! कारण त्यात होती ती अपार श्रध्दा. या श्रध्देला बाबांच्या कृपेची जोड मिळून उदीत अफाट सामर्थ्य निर्माण होत असे. म्हणून त्याकाळी (बाबा शिरडीत वावरत असताना) सर्व सामान्यांना नक्की वाटत असे, उदीनेच रोग-व्याधी नष्ट होणार, नोकरी लागणार, लग्न जमणार. आणी आजही (बाबांच्या पश्च्यात) भाविक-भक्त त्याच श्रद्धेने उदीचे महत्व जाणत आहेत.

अतिशय महत्वाचे म्हणजे द्वारका माईतूनच भक्तांना बाबांकडून उदीचा प्रसाद लाभत असे. ही उदी अज्ञानी जीवांना जीवनाची उभार देई. रोगी-व्याधीग्रस्तांसाठी ती औषधी ठरे. प्रपंचात पोळलेल्यांनी संजीवनी असे आणि ज्ञानी भक्तांना ती ''दिव्य जीवन'' भासे.

## शिरडीतील रामजन्मोत्सव.

श्रीगोपाळराव गुंड हे बाबांचे परमभक्त! भूमापन खात्यात सर्व्हेअर म्हणून नोकरी करणारे. त्यांना कित्येक वर्षे अपत्य नव्हते. बाबांच्या दारी आल्यावर त्यांची वंशवेल फुलली आणि तिला पुत्ररुप सुमन उगवले. गोपाळराव सदा बाबांसोबत असत. बाबांचे अनुभव चाखीत. एके दिवशी, शिरडीत यात्रा वा उरुस भरवावा असा विचार त्यांच्या मनात आला. त्यामागे त्यांचा निर्मळ हेतू होता, यात्रा, उत्सव अशा मोठ्या कार्यक्रमाने शिरडीचे वातावरण उल्हासित करुन सर्वांना आनंदाने एकत्रित करुन साईभक्तिची पताका आणि डंका सर्वत्र पसरावा. त्यांचा या विचाराशी गणपतराव कोते-पाटील, दादा कोते, शामा इत्यादी आणि इतर मंडळी सहमत झाली. त्यानुसार भजन, पूजन, किर्तन करावे, वाजंत्री, ताशे, चौघडे झडावे असा कार्यक्रम ठरला. पण त्यात अडचणी आल्या, तो कार्यक्रम फिसकटला.

मात्र गोपाळरावांनी पुढे लवकरच येणाऱ्या रामनवमीचा उत्सव साधून रामजन्म सोहळा व किर्तनाची कल्पना मांडली. बाबांनी प्रथम विरोध दर्शविला पण नंतर संमती दिली. त्यासाठी काका महाजनींनी बाबांना साकडे घातले आणि होकार आशिर्वाद मिळवला. दामू अण्णा कासार व नाना निमोणकरांनी मशिदीच्या कळसावर निशाणे लावली. काकांनी हार्मोनिअम (पेटी) घेतली. भीष्मांनी रसाळ असे रामजन्माचे किर्तन केले.

त्यावेळपासून आजपावेतो रामनवमीचा उत्सव अखंड चालू आहे. हल्लीच्या काळी फार मोठ्या प्रमाणात!

# गुरु महिमा

## आनंदरुप श्रीसाईनाथ - श्रध्दा आणि सबुरी.

बाबा आपल्या भक्तांना सांगत, मी सद्‌गुरुंचा एक दूत आहे. त्या सच्चिदानंदाचे स्वरुप ''आनंद'' हेच आहे. ते प्रेमभावाचे भोक्ते आहेत. आपला देह ही त्या सच्चिदानंद सद्‌गुरुंची द्वारका आहे. त्यात ते श्याम मुकुंद बनून लीला करीत असतात. त्यांना कशा-कशाचीही अपेक्षा नसते. तन-मन-धनाचे, प्रेमपूर्वक ह्रदयाचे समर्पणच त्यांना हवे असते. अशा या सद्‌गुरुंना प्रेम, शुध्द भक्ती आणि श्रध्दा हवी. अनन्यभाव हवा. भाव म्हणजे तरी काय ? दृढ विवेकाद्वारे स्थिर झालेली श्रध्दा आणि त्यातून निर्माण होणारे शुध्द प्रेम म्हणजे भाव होय. हा भाव श्रीगुरुंचे भान मनात स्थिर ठेवतो. हीच ती देवांची बैठक होय.

श्रद्धेचा विषय आला की बाबा म्हणत तर आपण सारे सदैव श्रध्देविषयी बोलतो, ती मानतो, पण ती एक उथळ भूमिका असते. तिला स्थिरत्व नसते. दृढ विश्वास आणि रोख प्रचिती यांवर आधारलेली स्थिर अशी परमेश्वराच्या अस्तित्वाची जाण म्हणजे श्रध्दा होय. यालाच आत्मभान म्हणतात. अशी श्रध्दा मी तुमच्याकडे मागत असतो. ती मी सद्‌गुरुंकडे पोहचवीन.

श्रध्देबरोबर तुम्ही सबुरी ठेवा. त्या तत्वाचीही कोणाला नीट जाण नाही. ती केवळ धैर्य वा पुरुषार्थही नाही. तर ती प्रपंचात अनासक्तवृत्तीने वागून, संचित प्रारब्धाला सामोरी जाऊन प्रारब्ध निष्प्रभ होऊन पुढे येणाऱ्या दिवसाचे संचितही थांबवता येते, टाळता येते. अशी सबुरी भक्ताला अखंड शक्ती, प्रेरणा आणि सहनशक्ती पुरवते. म्हणून ''सबुरी'' हा केवळ शब्द नसून ती एक जीवनक्रिया आहे. जीवनाची दृष्टी आहे.

म्हणूनच सद्‌गुरुंना आवडणारी दोन तत्वे श्रध्दा आणि सबुरी दक्षिणा (दोन पैसे) म्हणून बाबा भक्तांकडे मागत. कारण प्रेममय श्रध्दा आणि शरणागत अशी सबुरी या दोन गोष्टींनीच सद्‌गुरु प्रसन्न होऊन कृपा करतात. ते कोणत्याही पोथीत नाहीत. त्यांना प्रेम व साधना हवी. आपले मन हेच बंध व मोक्षास करणीभूत आहे, म्हणूनच त्याला सद्‌गुरु चरणी वहा. ते मनाला उलटे टांगून उन्मन करतात आणि सच्चिदानंदाचा अनुभव प्राप्त करुन देतात. त्यासाठीच सद्‌गुरुंकडे सच्चिदानंद स्वरुप मागा. मी या सच्चिदानंद सद्‌गुरुंचा दूत असल्याने तुम्ही माझ्याकडे पहा, मी सद्‌गुरुंच्या कृपाप्रसादाचे तुम्हांला दान करीन, हे माझे वचन आहे.

बाबांच्या या आश्वासनाचा शिरडीकरांनी तसा अनुभवही चाखला. एकदा शिरडीत अखंड झंझावत तुफान आले. वरुण राजाची अखंड वृष्टी होऊ लागली. शिरडी प्रलय काळात बुडत असता सर्व भक्तांनी बाबांना आर्ततेने हाक मारली असता बाबांनी मशिदीच्या कडेवर उभे राहून भयंकर गर्जना केली. सच्चिदानंद सद्‌गुरुंना तालस्वराने साद घातली. ती विश्वात्मकाला जाऊन भिडली. त्या विश्वात्मक शक्तीने वरुण व इंद्राला अगदी शांत केले. झंझावत ओसरुन विजा शांत झाल्या. वृष्टी थांबून अंबर निरभ्र झाले. बाबांच्या गुरुतत्वाचा सर्वांना प्रत्यय आला. बाबांची पंचमहाभूतांवरील विराट सत्ता शिरडीकरांना पटली. साईंचे दैवी सामर्थ्य (सद्‌गुरु रुप)

शतकोटी तेजाने तळपलेले शिरडीकरांनी पाहिले.

श्रीसाईंचे जीवन चरित्र हे एक ''श्रीगुरुचरित्रच'' होय. कारण त्याला आदी नाही वा अंत नाही. असा महात्मा वा अवतारी पूर्णपुरुष जन्मत नाही की निर्माण होत नाही. म्हणून श्रीसाईंची कथा ही एक अखंड अवतार कथाच म्हटली गेली आहे.

सन १९१८ मध्ये बाबांनी तात्या कोते याचे मरण स्वतःकडे स्वीकारुन आपले अवतार कार्य समाप्त केले. गुरु व्यंकुशांनी कर्म एका विटेत बंदिस्त करुन बाबांवर अवतार कार्य सोपविले होते ती वीट फुटली म्हणजे जीवन कार्य करुन संपले, अशी बाबांना आज्ञा झाली. म्हणूनच बाबांच्या तोंडी ते वाक्य आले अरेरे, माझे कर्मच फुटले. माझ्या जन्माची सोबतीण गेली. मला आज्ञा आली आहे. मी देहाच्या सीमा ओलांडणार; आणि बाबा विश्वात एकरुप झाले. साईस्वरुप विश्वविराट होऊन गुरुत्वानेच ब्रह्मांड व्यापून गेले.

## श्रीसाईंचा मशिदीतील फकीर.

साईंवर सुफी आणि भागवत या दोन्ही गुरुंचा पगडा होता. सन १८३५ ते १९१८ असा ८४ वर्षांचा त्यांचा काळ! त्यातील पहिली ३६ वर्षांत त्यांचे गुरुगृही संगोपन, निवास, उत्तर भारत यात्रा, निंबाखालीची बारा वर्षांची तपस्या, इतका काळा हा बाबांचा धूसर असा पूर्वकाळ होता. सन १८७० च्या अखेरीस शिरडीत दाखल झाले आणि पडक्या मशिदीच्या उध्वस्त जागेत कायमचे वास्तव्य केले.

मुस्लीम आणि हिंदू या दोन्ही गुरुंचा सहवास आणि त्यांची शिकवण बाबांच्या घडणीत इस्लाम धर्म व भागवत पंथाचे संस्कार रुजवू शकली. त्यामुळे बाबा मूळचे हिंदू की मुस्लमान हा घोळ त्यांच्या जीवन चरित्राभोवती कायम राहिला. परंतु बाबांनी लोकांच्या भेदाभेदामुळेच दोन्ही धर्मांची लक्षणे आपल्या राहण्यातून, बोलण्यातून प्रकट केली. परंतु आपण कोण ? हे मात्र प्रकट केले नाही. धर्म-जात-पंथ इत्यादी पार करुन जाणाऱ्या आचार-विचारांची शिकवण, बाबांना प्रत्यक्ष आचरणाने लोकांना द्यायची होती. तेच त्यांचे भगवद्‌कार्य होते.

बाबांच्या या जीवनात मशिदीतल्या फकीराला अनन्य स्थान होते. त्यांच्या आज्ञेप्रमाणेच बाबा आपल्या भक्तांशी बोलत व वागत. तो सांगेल तेवढेच बोलत. तो देई तेवढेच ते भक्तांना वाटीत. त्यांचा हा फकीर अल्ला होता, पीरान-पीर दस्तगीर प्रभू दत्त होता. त्यालाच प्रत्येकाचे प्रारब्ध व संचित माहित होते. म्हणून त्या फकीराला ते आपला बाप वा वडील मानीत. या फकीरानेच साईंना साक्षात्कार घडविला असल्याने त्याचे अक्षय मोक्षधन बाबांपाशी होते. ते धन बाबा सर्वांना वाटीत असत. याच फकीराने त्यांचे बारा वर्षे संगोपन करुन बाबांकडून श्रध्दा-सबुरीचे दोन पैसे दक्षिणा घेऊन बाबांना परमोच्च स्वरुपज्ञान घडविले. बाबांना विहिरीत उलटे टांगले म्हणजे बाबांचा सूक्ष्म देह उलटा करुन मन उन्मन केले. बाबांची महाकारण देहावस्था ओलांडून

उन्मनी अवस्थेत त्या फकीराने नेले. अंतरंगातील प्रकाश दाखविला. आत्मज्योतीचे दर्शन घडविले होते. म्हणूनच बाबा वारंवार आपल्या वडिलांचा, फकीराचा उल्लेख करीत असत.

सुफी पंथातील संत (सद्‌गुरु) हे विलक्षण पध्दतीने आपल्या शिष्यावर कृपा करीत असत. कोणी मस्तकावर हात ठेवून, कोणी स्वतः अर्धवट खाल्लेल फळ शिष्याला चाखायला देऊन तर कोणी मस्तकावर एखाद्या दगडाचा आघात करुन कृपा करतात. अशा करणीने तो शिष्य बेहोश होऊन कित्येक दिवस उन्मनी (समाधी) अवस्थेत राहतो. बाबांना त्या फकीराने विहिरीत उलटे टांगून उन्मनी अवस्था प्राप्त करुन दिली होती.

## श्रीगुरुंचरण शरणतेने ज्ञान प्राप्ती होते.

सन १८९२ हे साल शिरडीत क्रांतिकारक व ज्ञानाने तळपून गेले. कारण त्यावर्षी एक विख्यात ज्ञानीभक्त नानासाहेब चांदोरकर साईंच्या आध्यात्मिक वलयात येऊन दाखल झाले होते. एका सात्विक व संपन्न अशा हिंदू कुटुंबातील. बाबांनी त्यांना खास बोलावून आपल्याकडे रुजू करुन घेतले. बाबा म्हणत, नानाचा नी माझा चार जन्मांचा संबंध आहे.

असेच एके दिवशी द्वारकामाईत बाबांसमोर श्यामा, तात्या, अब्दुल, काशीराम आणि इतर मंडळी संभाषण करीत बसली होती आणि नाना तेथे आले. आल्याबरोबर बाबांच्या पायी मस्तक ठेवून थोडे दूर जाऊन बसले असता बाबा म्हणाले, नाना माझ्या अगदी जवळ येऊन बस. मी कोणालाही कारणाशिवाय बोलावून घेत नसतो. गेल्या चार जन्मांचे नाते मला पुन्हा जोडायचे आहे. तू आलास! छान झाले.

बाबांच्या या उद्‌गाराने नानानी शंका काढली, कशा तऱ्हेने ? मला तर काही स्मरत नाही. परंतु मला ते माहित आहे. मला सर्वांचा भूतकाळ आणि भविष्यकाळ स्पष्टपणे दिसून येतो. असे बाबा म्हणताच नाना गप्प होऊन बाबांचे पाय चुरीत राहतात. पण तोंडाने गीतेचा श्लोक चालू असतो (गुणगुणत असतात.).

**तद्विध्दी प्रणिपातेन, परिप्रश्नेन सेवया ।**
**उपदेक्षन्ति ते ज्ञानं, ज्ञानिनः तत्वदर्शिनः ।।**

नानांचे गुणगुणने ऐकून बाबांनी म्हटले, नाना त्या श्लोकाचा अर्थ सांग पाहू. नाना म्हणतात, अर्थ सोपा आहे, तो असा, तत्वववेत्ते वा साक्षात्कारी महात्म्ये आपली जो सेवा करतो, विनम्रतेने शंका, प्रश्न विचारतो, शरणागती स्वीकारतो त्या शिष्याला ज्ञानाचा उपदेशकरुन ज्ञानी बनवतात.

त्यावर बाबा म्हणाले, अर्थ अगदी बरोबर आहे. परंतु ज्ञान हा शब्द काढून अज्ञान हा शब्द वापर आणि त्याच्या अन्वयार्थ लाव. कारण तेथे ज्ञान हा शब्द योग्य वाटत नाही. तेव्हा विस्मयकारक होऊन नाना म्हणाले, सर्व भाष्यकारांनी 'ज्ञान' हाच शब्द स्वीकारला. आद्य शंकराचार्यनाही तो मान्य आहे. मग आपण त्याला विरोध का

करता ?

बाबा शांत व प्रेमपूर्वक म्हणाले, नाना मला सर्व भाष्ये ज्ञात आहेत. पण ज्ञान ही काय शिकण्याची गोष्ट नाही. ते शब्दांच्या पलिकडे असते. शब्द म्हणजे अज्ञानाचे, मायेचे जाळे ! ते काही ज्ञाननिर्मिती करीत नाहीत.

कारण ज्ञान हे स्वयंसिध्दच असते. सदैव आणि सर्वत्र प्रकाशमान असते. हा, अज्ञानाच्या पडद्याखाली काही काळ झाकले जाते. तो अज्ञानाचा पडदा श्रीगुरु दूर करतात, फाडून टाकतात आणि मग ज्ञान आपोआप प्रगट होते. ते आत्मस्वरुपाने दिसू लागते.

भगवंतानी गीतेतच हे सांगितले आहे. परंतु ती उथळपणे मांडू नये. मी तुला गीता शिकवेणच. आता एवढेच सांगेन, आपले मन चंचल असले तरी अभ्यासाने, साधनेने स्थिर करता येते. भगवंतच चराचरात भरुन उरला आहे. त्यालाच सर्वठायी पाहा. प्रभूची आज्ञा समजूनच सर्व कर्मे करावी. पण 'मी' केले हा अहंभाव धरु नये. कारण सर्व कर्मांचा परमेश्वर हाच एक कर्ता आहे. आपण फक्त निमित्त मात्र असतो. साक्षी असतो. अहंभाव लोपण्यासाठी गुरुशरणता स्वीकारावी. मन, बुध्दी, काया व अहंकार सर्व काही श्रीगुरुचरणी समर्पित करायची. हीच परमभक्ती होय. एकदा का श्रीगुरुंना सर्व समर्पण झाले की ते दयाळू प्रभू आपल्या भक्ताच्या ह्रदयात कायम निवास करुन त्याला मोक्षाच्या गावी नेतात.

बाबांचे शब्द म्हणजे अर्थपूर्ण ज्ञानाचे भांडार असे. बाबाच गीतेचा अचूक अर्थ सांगू शकत, कारण स्वतः ते कृष्ण होते. भगवंत होते.

## बाबांचा उत्कट गुरुभाव.

श्रीसाईनाथांचे जीवन म्हणजे गुरु-शिष्य यातील नात्याचे एक गौरव गीतच ठरले आहे. म्हणूनच बाबांनी आपल्या जीवनातील भक्तांकडून आणि पुढील काळातील भक्तांकडून परमेश्वराने सांगितलेला त्याला अपेक्षित असलेला समर्पण भाव अपेक्षिला होता आणि आहे.

नाडीशास्त्राचे प्रसिध्द अभ्यासक विंग कमांडर ओक यांनी आपल्या ''नाडी ग्रंथात'' नमूद करुन ठेवले आहे, श्रीसाईंचे गुरुअवतार कार्य आणि मार्गदर्शन हे त्यांच्या प्रत्येक अवतारात समान प्रेमाचे, वात्सलतेचे, कारुण्याचे, लोक हिताचे आणि उध्दाराचे आहे. त्यांचे असे शंभर अवतार झालेले आहेत.

संत कबीरांचा विचार करु जाता त्यांचा काळ होता १४३५ ते १५१८. म्हणजे साई अवतारापूर्वी ४०० वर्षे आधीचा. या दोन्ही अवतारांमधील दोघांचेही जीवन कार्य आणि तत्वज्ञानात समांतर आहे.

रामानंद व कबीर ही गुरु-शिष्यांची जोडी इतिहासात अमर झाली आणि चारशे वर्षांनी व्यंकुशा-साई अशी

# गुरु महिमा

गुरु-शिष्य जोडी पुन्हा अवतरली. कबीरांचे संगोपन एका मुसलमान विणकर दांपत्याने केले तर साईंचे संगोपन फकीर रोशन शहा व त्यांच्या पत्नीने केले. रोशन शहा हेच पुढे ताजुद्दीनबाबा म्हणून अवतरले.

शिरडीमध्ये मशिदीतच बाबांचे सर्वकाळ वास्तव्य असे. तेथे असंख्य भक्त जमत. त्यांना फार पूर्वी आपण काय काय केले होते, त्या कथा सांगत.

उत्तर भारतात आपण तेजोमय फकीर रुपात वावरत होतो. दिल्लीलाही वास्तव्य केले होते. नीतिवान, सदाचारी भक्तांना सदैव मदतीचा हात देत होतो. जहांगीर बादशहाची राणी गरोदर होती. पाठलाग करणाऱ्या शत्रू सेनेपासून बचावण्यासाठी जहांगीर बादशहाला वाळवंटातून प्रवास करावा लागे. एकदा ते एका वाळवंटात असताना राणी तहानेने कासावीस झाली तेव्हा आपण फकीर रुपाने प्रगट होऊन टमरेलातील पाणी पाजून तिची तहान भागवली व तिला आशिर्वाद देऊन म्हटले, तुझ्या पोटी येणारा पुत्र हा हिंदुस्थानचा बादशहा होणार आहे. पुढे आपल्याला माहितच आहे. अकबर हा हिंदूस्थानचा बादशहा होता. या अकबराचा पूर्व जन्मही बाबांनी आपल्या भक्तांना कथन केला होता.

अकबर हा पूर्व जन्मीचा ‘मुकुंद’ नावाचा तपस्वी होता. हिंदूस्थानचा सम्राट होण्याचे त्याचे स्वप्न होते, महत्वाकांक्षा होती. मुकुंदाने आपले तप पूर्ण केले. त्याची पूर्ती करण्याचे कार्य अल्लाने बाबांवर सोपविले होते ते कार्य बाबांनी मुकुंदाच्या मठीवर जाऊन केवळ नजरेने त्याला समजाविले त्याप्रमाणे मुकुंदाने त्या यज्ञात स्वतःची आहुती दिली. ईश्वरी संकल्पनेनुसार मुकुंदाने जहांगीर राजाच्या पोटी जन्म घेऊन सम्राट पदावर पोहोचला. मुकुंदाप्रमाणेच त्याच्या तपस्वी मित्रांनीही आपले प्राण अर्पण करुन अकबराचे सहकारी म्हणून पुन्हा जन्म घेतला.

अकबर बादशहा विषयी सर्वांना माहितच आहे. तो फार धार्मिक होता. सर्व धर्म, सर्व साधू-संतांना मानणारा होता. या सर्व कथा बाबा आपल्या भक्तांना सांगत असत.

काही उच्च आध्यात्मिक द्रष्टे पुरुष म्हणतात, बाबा हे शुकमुनी होते. श्रीपाद-श्रीवल्लभही बाबाच होते. म्हणूनच बाबा हरिहरात्मक श्रीदत्तात्रेयच होते. त्यामुळेच साईंचा आविष्कार कधी शिवतत्वाने, कधी रामरुपाने, तर कधी हनुमानरुपाने होत असे.

साईबाबांचे सारे शिक्षण रोशनशहा या फकिरांच्या घरी झाल्याने कबीरपंथी आणि सुफी पंथी असलेल्या साक्षात्कारी सद्‌गुरुंचा पगडा बाबांवर उमटला होता. त्यामुळे बाबांची राहणी, बोलणी, वागणे, जीवनशैली मुस्लीम फकिरांसारखीच होती. कुराणाचा अभ्यास आणि सद्‌गुरु कृपा याचा त्यांच्या तन-मन, जीवनावर फार मोठा प्रभाव होता अल्लाचे नाव व आपला फकीर सद्‌गुरुंचा उल्लेख सदैव त्यांच्या मुखात असे. म्हणूनच

''अल्ला भला करेगा'', ''सबका मालिक एक'' हे परावलीचे शब्द त्यांच्या मुखात (शिरडीत) सुमारे साठ वर्षे निनादत राहिले होते.

निंबामागील जंगलासारख्या असणाऱ्या भागात जेथे विषारी साप, विंचू, इतर विषारी प्राण्यांचा सर्रास वावर होता तेथील एका खड्ड्यात (सुमारे बारा वर्षे) बाबा रोज रात्री पोटाशी पाय दुमडून झोपत असत. त्यांची ही सवय त्यांच्या सुफी पंथी गुरु-शिष्य नात्याची आणि गुरुभक्तीची प्रतीक होती. अंती बाबांनी समाधीपूर्वी गुरुस्थानामागील त्या खड्ड्यातच्या जागी गोपाळकृष्ण मंदिराचे पीठ (अर्थात कट्टा ) उभारण्याची काही भक्तांना आज्ञा केली आणि आपल्या गुरुंजवळ गोपाळकृष्ण स्थळी चिरनिद्रा घेतली.

अशातऱ्हेने वैष्णव आणि सुफी पंथ या दोघांचा समन्वय बाबांनी साधला. एकीकडे गोपाळस्वामींचे (व्युंकशांचे) कृष्णप्रेम व दुसरीकडे सुफी गुरुंची निष्ठा, या दोहोंत बाबा एकरुप झाले.

अल्लामियाँच्या त्या मशिदीचे बाबांनी द्वारकामाई हे नामकरण करुन हिंदू संस्कृती व साधना आणि यवन पध्दतीचा सुफी साक्षात्कारवाद अशी गोड सांगड घातली. बाबांनी स्वतः मुस्लीम-सुफी त्याचबरोबर कबीर, नाथ, भागवत व दत्त साधना केलेली असल्याने या दोन्ही साधनेचा उत्कृष्ट समन्वय भक्तांना साधून दिला. मुस्लीम भक्तांना ते आपल्या रहनी-करणीमुळे आपलेसे वाटत. कारण ते जे चमत्कार करीत तेच मुळी सुफी गुरुंकडून मिळालेले वरदान असे. परंतु मुस्लीम भक्तांनी बाबांचे हे मर्म जाणले नाही. एक रोहिला भक्त बाबांच्या सतत सहवासात होता. परंतु तो अतिरेक्याप्रमाणे कुराण भक्ती करीत असायचा. आपली साधना तो स्वतंत्रपणे करायचा. बाबांनी त्याच्या जीवनाचे सोने केले. परंतु अशिक्षितपणाने व मर्यादेमुळे रोहिला केवळ एक निष्ठावंत शागीर्द ठरला. रोहिला नंतर जे कोणी मुस्लीम भक्त बाबांच्या सहवासात वा सेवेत आले ते फक्त स्वतःच्या फायद्यासाठीच!

शिरडीतील आपल्या पहिल्या वास्तव्यात बाबा चावडीवर कव्वाल, नृत्य व संगीताची मजा घेत असत. कबीराची पदे म्हणत. कधी कधी पायात चाळ बांधून नाचत असत. याचा बऱ्याच अंशी उल्लेख केलेला आढळतो. नंतर मशिदीतही कबीरांची पदे गात. उर्दू आणि पारशी भाषा, गाणी रात्रीसमयी बोलत असत. मशिदीत ज्या खांबाला बाबा टेकून बसत तो अल्लामियाँचा खांब आहे असे बाबा म्हणत. बाबांचा तो अल्लामियाँ म्हणजे मशिदीतला गुरु ''पीरान पीर दस्तगीर'' अर्थात प्रभू दत्तात्रेय होय. साईंनी अल्लामियाँ व दत्तप्रभू या दोन शक्तींना एकरुपच मानले होते. ह्याची पुष्टी स्वतः बाबांनीच दिली आहे. पुष्कळदा बाबा जमलेल्या भक्तांबरोबर गप्पा गोष्टी करीत असताना सांगत, मी माहूर गडावर वाढलो, आठव्या वर्षी गंगेच्या काठावर राहिलो. तेथुन गिरनारला गेलो. नंतर अबुच्या पहाडी राहिलो. अक्कलकोटला वस्ती केली. तेथून दौलताबादला आलो. जनार्दन स्वामींची सेवा केली. त्यानंतर पंढरपूरास काही दिवस राहून विठ्ठलाची सेवा केली आणि येथे शिरडीत

# गुरु महिमा

आलो. ही त्यांची श्रीपादश्रीवल्लभ आणि इतर दत्तावतारांशी एकता होती, हे कळून चुकते. पुढे हिंदू भक्तांचा बाबांभोवती गराडा पडल्यावर अल्लामियाँ व दत्तप्रभू कृष्ण बनले. बाबा श्रीपादश्रीवल्लभ दत्तगुरु झाले. हिंदू भक्तांच्या उपासनेने बाबा एकजीव झाले आणि साईतत्व हिंदू भक्तांना शिव-विष्णू, श्रीराम, हनुमान या स्वरुपात दर्शन देऊ लागले. परंतु हिंदू-मुस्लीम या दोहोंपैकी एकही शिष्य म्हणून बाबांना लाभला नाही. सारे त्यांचे भक्तच होते. शिष्य म्हणून कोणीही नव्हता.

चांदोरकर, दासगणू, कुशाभाऊ, भीष्म, म्हाळसापती, मेघा, उपासनी, गाळणकर हे सर्व चांगले व उत्तम भक्त होते. आपल्या उदार अंतःकरणाने बाबांनी त्यांना अल्लाच्या किंवा दत्तप्रभूंच्या भांडारातून थोडे थोडे दिले. परंतु सर्वस्व दान करण्या इतपत कोणीही बाबांना मिळाला नाही. अब्दुलाला त्यांनी देहातच चांद-सूरजांचे दर्शन घडविले. त्याला ते म्हणत, अब्दुल, तुझ्या मातीचे सोने करुन तुझी नौका दर्यापार नेईन. बाबांनी राधाकृष्णा आईला गती दिली. जिला ते स्वतःची मामी म्हणत अशा बायजाबाईचे ऋण चूकवून तिला मुक्ती दिली. म्हाळसापतींनाही ऐश्वर्य न देता मुक्तीधन दिले. दासगणू, चांदोरकरांच्या पारड्यात जीवनाचे मर्म व अध्यात्माचे रहस्य घातले. दासगणूंचा संतचरित्रातून आत्मविकास साधून दिला. भीष्मांना उच्च आध्यात्मिक अनुभव दिला. कुशाभाऊंना सिध्दत्वाकडे नेले. उपासनी महाराजांना सोन्याचे ताट दिले. शामा, जोग, खापर्डे इत्यादी भक्तांबरोबर बाबांचे पूर्वजन्म ऋणानुबंध होते. त्यांना सहाय्य करण्याची बाबांची फार मोठी तळमळ होती. पण त्यांच्याकडे पूर्ण समर्पण भाव नसल्याने बाबा त्यांचे आत्मकल्याण साधू शकले नाहीत. मात्र शामासाठी त्यांनी स्वतः देह सोडला. काकासाहेब दिक्षित, न्या. रेगे यांनी आपल्या प्रखर निष्ठेने व समर्पण भावाने बाबांकडून मोठे दान मिळवले. अण्णा (हेमाडपंत) हे ग्रहस्थाश्रमी व भौतिक मर्यादेत वावरणारे साधक! त्यांना ज्ञानभक्तीतून पुढे नेऊन बाबांनी त्यांचा विकास केला. पुरंदरे, निमोणकर इत्यादी व्यवहारात यश प्राप्त करण्यासाठी बाबांजवळ आलेले. तरीही निष्ठा बाळगणारे भक्त ठरले खापर्डे, धुमाळ, साठे हे आपल्या प्रपंचाचा तोल सांभाळत बाबांच्या भक्तीत रमलेले असत. परंतु ज्योतीने ज्योत पेटवावी असा समर्थ व सत्शिष्य बाबांना एकही सापडला नाही.

## साईंचा हिंदू अविष्कार.

बाबांच्या रहनी-करनी आणि जबान यामुळेच मुस्लीम भक्त त्यांच्या निकट आले. बाबांचा मशिदीतील नमाज, त्यांचा अल्ला मियाँचा खांब, निंबर, त्यांचा ''अल्ला भला करेंगा'' असा आशिर्वाद या गोष्टींमुळे ते आमचेच होते, अशी मुसलमानांची खात्री होती. परंतु बाबांना पूर्णतः वेढले होते ते हिंदू भक्तांनी! हिंदू पध्दतीनेच बाबांची पूजा-अर्चा, आरती, भिक्षा, दक्षिणा इत्यादी गोष्टी नित्य होत होत्या. बाबांची यावनी शैली ही अपवादात्मक आहे अशी हिंदू भक्तांना खात्री होती. कारण बाबांचे कान टोचलेले आहेत, सुंता झाली नव्हती,

# गुरु महिमा

अशी बाह्य प्रमाणे देत हिंदू भक्त संतुष्ट होत.

बाबा स्वतःच रामभक्त आणि दत्तयोगी होते. त्याप्रमाणेच हिंदू भक्तांना, शिव, विष्णू, कृष्ण रुपात दर्शन देऊन त्यांच्या अंतश्रध्देचा आदर राखीत. त्यांच्या जवळ विक्षिप्त वर्तन करीत नसत. म्हणूनच हिंदू भक्त मशिदीतच बाबांना राम-कृष्ण, विठ्ठल, दत्त समजून त्यांच्या त्रिकाल आरत्या करीत.

बाबांची मशीद सर्वधर्म समभावाचे प्रतीक होती. तिच्या जवळच बाबांचे गुरुस्थान, लेंडिबाग आणि तपोवन होते.

सन १९०९ पासून बाबांच्या हजेरीत गुरुपौर्णिमा गुरुभक्तांनी आरंभ केली. त्यानंतर दोन वर्षांनी सन १९११ पासून रामनवमी उत्सव सुरु झाला. एका जागेवर (मशिदीत) बसून बाबा सर्वधर्माची शिकवण देत. त्याही पलिकडे मशिदीतूनच दूरस्थ भक्तांनाही मार्गदर्शन करीत. त्यांची संकटे निवारीत. मशिदीत जसे हिंदू भक्त अर्थात म्हाळसापती, मेघा, दासगणू असत, त्यांच्यासोबत अब्दुल्ला, रोहिला, छोटेखान, बडेबाबा इत्यादी मुस्लीम भक्तही असत. हेच हिंदू-मुस्लीम एकतेचे बाबांचे गूढ व विलक्षण रहस्य होते. कारण सुफी पंथाप्रमाणेच, कबीरपंथ, नाथ, दत्त इत्यादी पंथांची साधना बाबांमध्ये एकजीव झालेली होती. म्हणूनच सर्व धर्मातील साधना आणि सिध्दत्व ह्यांना पुरुन उरणारे सच्चिदानंद सद्‌गुरु स्वरुप बाबा होते. सद्‌गुरुतत्वाचा बाबा अविष्कार होते.

सकल जगाला सर्वधर्म एकतेची व समन्वयाची जाणीड़ करुन देण्यासाठीच श्रीसाईंचा अवतार झाला. मानवतेची एकता व उध्दाराचे कार्य बाबांनी १९०९ पासून हाती घेतले. त्याचा प्रसार आज शंभर वर्षांनंतरही अखंड चालूच आहे.

साधना ही सुफी पंथांची असो वा भागवत धर्माची, दोन्ही साधना अंती गुरुंचे निरंजन पद प्राप्त करुन देतात, हेच बाबांनी सांगून ठेवले आहे.

बाबांना केवळ पुस्तकी ज्ञान, शब्द पांडित्य मान्य नव्हते. पण चिंतन, अभ्यास, ज्ञानप्राप्ती, ज्ञानार्जनाचा त्यांनी पुरस्कार केला. विनम्रता, शुध्द भाव, दृढ श्रध्दा आणि महापुरुषांकडून ज्ञान प्राप्ती ही भगवद् गीतेची शिकवण त्यांना माहित व मान्य होती. एकदा बाबांनी 'तद्विध्दी प्रणिपातेन परिप्रश्नेव सेवया' या गीता श्लोकाचा अन्वयार्थ विशद केला होता. यासाठी की पांडित्यपूर्ण वाद करणारे दाभोळकर (हेमाडपंत) यांना शिष्याची जिज्ञासा, गुरुंची सिध्दता, विनशिलता आणि सेवाभाव याची जाणीड़ करुन द्यावी लागली अर्थात हेमाडपंतांकडे फक्त शब्दपांडित्य होते, त्याला छाटून बाबांनी त्यांना परमार्थाकडे वळवून 'हेमाडपंत' ही पदवी बहाल केली.

# गुरु महिमा



याउलट मद्रासी साईचरित्रकार नरसिंहस्वामी होते. त्यांच्यावर अनेक गुरुंचा कृपाप्रसाद होता. गुरु-शिष्य नाते, साधना यांची सखोल आणि अनुभवात्मक जाणीव होते. परिपूर्ण ज्ञान होते. त्यांच्या वाङ्‌मयावरुन ते कळून येते. त्यांचा बुध्दीवाद, तत्वज्ञान, चिकित्सा ही श्रध्दा आणि भक्तीने अर्थपूर्ण व ज्ञानबोधक होती. म्हणूनच बाबांना यांत्रिक मूर्तिपूजा, शब्दपांडित्य, व्याख्यान-प्रवचन, कर्मकांड इत्यादी मान्य नव्हते. त्याकरीताच बाबांनी भक्तांकडे श्रध्दा-सबुरीची मागणी केली. भक्तांना गुरुंवर व गुरुतुल्य संतांवर पूर्ण श्रध्दा ठेवण्यास सांगितले. त्यासाठी आत्मसमर्पण साधण्यासही सांगितले. कारण समर्पणातून सबुरीतून (बाबा याला तितिक्षा म्हणतात.), प्रेमभावनेतूनच गुरुकृपा प्राप्त होते. इतक्या गोष्टी जमल्या की श्रीगुरु अनन्य भाव प्रगट करुन आत्म कल्याणाचा मार्गावर आणून सोडतात.

गुरुंकडून केवळ मंत्र घेतला की काम झाले असे होत नाही. म्हणूनच बाबांकडे हट्ट धरणाऱ्या वृध्द राधबाई देशमुख यांना बाबांनी सांगितले, माई माझ्या गुरुंनी मला कोणताही कानमंत्र दिला नाही. त्यांची ती पध्दत नव्हती. त्यांना हव्या असलेल्या, प्रेमनिष्ठा, समर्पण, अविचल उपासना या गोष्टी दिल्या. बाबांनी आपला स्वानुभव त्या वृध्द स्त्रीला कथन केला. त्याच राधाबाईंची बाबांवर असलेली अनन्य श्रध्दा बाबांनी दाभोळकरांना श्याम्याच्या तोंडून वदवून उपदेशिली. 'गुरु हवा की नको' हा दाभोळकरांचा कोरडा वाद बाबांनी स्वतःच्या उदाहरणातून स्पष्ट केला. त्याचबरोबर 'सबुरीचे' महत्व सांगताना उपदेश केला, सबुरी म्हणजेच धैर्य! ही पुरुषार्थाची दुसरी प्रतिमा आहे. सबुरीमुळेच संकटे दूर पळतात. गुरुकृपेचा प्रकाश जीवनात उतरुन मुक्तीचा मार्ग मोकळा होतो. मन-बुध्दी-अहंकार लोप पावून एका गुरुच्याच ठायी एकाग्रता साधली जाते. मग अन्य कोणतीही साधना करण्याची गरज भासत नाही. या सर्व गोष्टींचे मधुर विवेचन नरसिंहस्वामींनी आपल्या साईचरित्रात व साईवचनात संग्रहीत केले आहे. याहीपुढे त्यांनी बाबांचे अमोलिक विधान नमूद करुन ठेवले आहे. बाबा म्हणत, मी माझ्या गुरुंचे नित्य व अखंड मुखावलोकन केले आणि त्यांच्या ठायी तद्रूप झालो. गुरुंनी कासवीच्या दृष्टीने माझा सांभाळ केला. त्यांच्या अलोट प्रेमानेच मी शिरडीत आलो आणि निंबाखाली त्यांच्या चरणांजवळ (समाधीजवळ) स्थिरस्थावर झालो. त्यांच्या जवळच बारा वर्षे तपसाधना केली आणि नंतरच मशीदीती (द्वारकामाईत) येऊन राहिलो. (गुरु समाधी मागील खड्ड्यात बारा वर्षे झोपले होते. ते त्याच जागी गोपाळकृष्ण मंदिराचा गाभारा उभा करुन त्याच जागी देहाचे सीमोल्लंघन केले.)

आपले दुसरे गुरु व्यंकुशा (गोपाळस्वामी) यांच्याबद्दल गौरवोद्‌गार काढताना बाबा म्हणतात, आज माझे गुरु व्यंकुशा असते, तर त्यांच्याजवळ रुसलो असतो, हट्ट केला असता. असा हा आपला अंतरंग बाबांनी आपल्या भक्तांपुढे प्रगट केला होता.

बाबा स्वतःला भगवंताचा दूत मानीत. ते म्हणत, या दूताकडे भगवंताची अफाट ताकद असते. अल्लानेच

# गुरु महिमा

माझ्यामार्फत अनेकांना संकटमुक्त केले, अनेकांना मदत केली आहे. एखाद्या पुण्यात्माने देह विर्जीत केला की बाबा म्हणत, तो माझ्याकडे आला. मीच सर्व भक्तांबरोबर असतो. मध्येच म्हणत, आताच मी काशीस्नान करुन आलो. मी सर्वांना समानतेने पाहतो, वागवतो. माझ्या इच्छेशिवाय झाडाचे पानही हलत नाही. कधी कोणी भक्त मृत्यू पावला वा इतर भक्तांनी बाबांना साकडे घातले की बाबा म्हणत, अरे त्याने दुसरा देह धारण करुन आपले कर्म करीत आहे. यात मी हस्तक्षेप कसा करु ? मी केवळ देह नसून निराकार साक्षी आहे. त्या माझ्या रुपाचे श्रवण-मनन-चिंतन करा. तुम्ही ही तेल्याची भींत तोडून टाका आणि मला पहा. तुमच्या हृदयात मला प्रवेश करण्यासाठी रस्ता मोकळा करुन द्या.

संसाराला कंटाळलेल्या नाना चांदोरकरांना उपदेश केला तो असा, अरे नाना तुला संसार का नको ? हा देह आहे तोवर संसार आहेच. तो चुकविता कसा येईल ? मलाही संसार आहेच. संसार हा मायामय आहे. काम-क्रोध विकारांचा गुंतवला आहे. देहप्रारब्धाने माया येऊन चिकटते. म्हणून प्रारब्धातील कर्मे भोगल्याशिवाय देह सुटणार नाही. सुख-दुःख ही भ्रामक असून माणसाचे मन त्यांना जन्माला घालते. सुख-दुःख आपल्या मानण्यावर आहेत. गादीवर लोळणे व भूमीवर झोपणे, दोन्ही क्रिया सारख्याच. त्यात सुखही नाही व दुःखही नाही. षडविकारांवर विजय मिळविल्याशिवाय सुख-दुःखांची कल्पना उमगणार नाही. म्हणून देहप्रारब्ध मानून त्याला धैर्याने सामोरे जा ! ऐश्वर्यात असताना नम्र बना ! दानधर्म करा ! दीन, गरीब, दरिद्री लोकांचा अवमान करु नका ! मुक्ती हेच खरे सुख आहे, याचा प्रत्यय येईल.

म्हणूनच संसार करताना, हा संसार माझा नाही तर तो देवाचा आहे या वृत्तीने चालावे. नित्य जागृत व दक्ष राहून, मी कोण ? हे स्वतःलाच विचारावे. मी शिव अर्थात सोऽ हं, हा भाव जागृत ठेवावा. उतूही नये आणि मातूही नये. ईश्वरीव्रतापासून बाजूला होऊ नये. ते कर्तव्य समजून निष्ठेने त्याचे आचरण करावे.

बाबा अधून मधून सुंदर विधान करीत. ज्ञानमार्गाला ते रामफळाची उपमा देत. तर भक्तीमार्गाला सीताफळाची. रामफळाचा गर हा ते झाडावरच पिकल्यावर, त्याचा गाभा रसाळयुक्त झाल्यावरच मिळतो. बाबांना याचा अर्थ सांगावयाचा आहे, ज्ञानमार्गात साधनेची परिपक्वता आल्याशिवाय ज्ञान हाती लागत नाही. त्यासाठी स्मरण-चिंतन, तप, निष्ठा आणि सबुरी हवी. रामफळ पिकल्यावर खाली पडते व वाया जाते. याचा अर्थ ज्ञानी पुरुषाचेही स्खलन वा पतन होऊ शकते. तेथे दक्षता सावधगिरी आवश्यक आहे. भक्तिमार्ग मात्र अत्यंत सोपा आणि सीताफळासारखा मधुर व सहज साध्य होणारा आहे. भक्ती परिपक्व झाली की त्याचे रसाळ फळ सहज प्राप्त होते. कारण भक्ताची आर्तता व अनन्यता भक्तीला बळकट करते आणि भक्ताच्या समर्पणाने सफल होते. मात्र भक्ताला चुकीची माफी असते. भगवंतच त्याच्या सोबत असतो, त्याचा सांभाळ करीत असतो.

# गुरु महिमा

साई समाधी शताब्दी विशेषांक

## बाबांचे आत्मज्ञान विचार.

एकदा कोणी एका भक्तांने बाबांना विचारले, बाबा तुम्ही कोण आहात? त्याचे गूढ आणि ज्ञानपूर्ण उत्तर साईंनी दिले, मी निर्गुण, निराकारच आहे. मात्र कर्मामुळेच या देह चौकटीत आलो. मला घरदार नाही. विश्वच माझे घर आहे. ब्रह्म हे माझे पिता आनि माया ही माझी माता आहे. ह्या माता-पित्यामुळे मी या क्षणभंगुर देहात अवतरलो. तुम्हीही सारे अजरामर आहात. परंतु अज्ञानामुळेच जन्म-मरणाच्या फेऱ्यात अडकलात. भगवंताची ओळख पटली की तुम्ही मुक्त व्हाल. त्याकरीता मी देह नसून परमेश्वर आहे याचे भान ठेवावे लागते. भगवंतालाच सर्वत्र पहावे. त्याकरीता श्रध्दा ही फार महत्वाची गोष्ट आहे. संत, शास्त्र आणि भगवंत यांचे ठायी श्रध्दाभाव ठेवा! सर्व कर्मे एका भगवंतालाच अर्पण करा. त्यातून तुमच्यामध्ये शुध्द प्रेम, सात्विक भाव, निरपेक्ष भक्ती घडून सर्वत्र भगवंतच भरुन उरला आहे हे दिसून येईल. भगवंतच आपली सदैव वाट पाहत असतो. आपण फक्त सज्ञानी होऊन अज्ञानाचा पडदा दूर सारावा लागतो. त्यासाठी श्रध्दा-भक्तीची आपल्या जीवनात मशागत करुन मनाला स्थिर व एकाग्र करावे लागते. मनाला काबूत ठेवण्यासाठी मूर्ती पूजा करावी. कारण मूर्ती हेच एज माणसास सुलभ साधन आहे. भगवंत मूर्तीतच आहे असे मनाने धरले की ते आपोआप भगवंताकडे एकाग्र होऊ लागते. मनाला शिस्त लागते आणि ते भगवंताच्या ठायी स्थिर होते. मग भगवंत आपोआप आपली सर्व काळजी वाहतो. भक्तांसोबत कायम राहतो.

## भक्तांना आकर्षून घेऊन धर्मस्थापनेचे बाबांचे कार्य.

बाबांच्या विचित्र करणीमुळेच वा चमत्काराने खूप सारी हिंदू-मुस्लीम भक्त जवळ आली. काही अपवादात्मक भक्त असे होते ज्यांना प्रथम पासूनच संत, अवलिया म्हणून बाबांची ओळख पटली होती. म्हणून संतसेवेच्या व्रतानुसार ते बाबांजवळ आले होते. त्या सर्वांना बाबांनी आपल्या मायेने स्वतःशी व आपल्या धर्म स्थापनेशी जोडून घेतले. हळूहळू सर्वच मंडळींशी ''बाबा आपले'' हे नाते जुळून सर्व बाबांच्या मानव कल्याणाच्या, उध्दाराच्या संकल्पनेशी जोडले गेले. बाबांचा महिमा गावोगावी, प्रांताप्रांतात, दूर देशी पसरुन बाबांकडे नवनवीन, ऋणानुबंधी, पवित्र सत्वगुणी लोकजन बाबांकडे आकर्षित होऊन त्यांचे भक्त बनले. जे कोणी नास्तिक होते, साईंचा आकस करीत होते, छळ करु पाहत होते तेही आस्तिक होऊन कृतज्ञता पूर्वक साईकार्यात सक्रिय झाले. देशाच्या कानाकोपऱ्यातून साई महिमा गायला जाऊ लागला.

धर्मा-धर्मातील, पंथा-पंथातील माजलेले भेद गळून पडले आणि बाबांच्या सहवासात विरुन एक नविन सहिष्णू, एकात्मतेची दृष्टी उदय पावली. एकता आणि लोककल्याण हे साईंचे नव्या धर्म स्थापनेच वा अवतार कार्याचे मुख्य उद्दिष्ट होते. आणि त्याप्रमाणेच संपूर्ण देशात जो धर्मांचा-पंथाचा झगडा, संघर्ष चालला होता तो साईंच्या प्रेमाने, कृपेने लोप पावून लोकसमूह एकत्र होऊन राष्ट्रीय एकात्मतेचे वातावरण सर्वत्र तयार होऊ

लागले.

अनेक साधू, सिध्द यांची बाबांकडे वर्दळ असायची. आर्त, दुःखी, व्याधीग्रस्त लोकही साईचरणांजवळ येत. त्या सर्वांचे दुःख, रोग-आजार, पीडा बाब दूर करीत. बाबा स्वतः दम्याने हैराण असत. ही व्याधी सुध्दा कोणा एका भक्ताची स्वतःकडे घेतली होती. लोक कल्याणातून उमटलेली ती दैहिक प्रतिक्रियाच होती. कारण बाबांचा अवतार हा रंजल्यागांजलेल्यांचे ताप सहन करण्यासाठी होता. आपल्या फकीर गुरुंच्या आज्ञेनेच साईंनी त्यांच्या युगकार्यास वाहून घेतले होते. सच्चिदानंद सद्गुरु पदावर आरुढ झाले होते. प्रभू दत्तात्रेयांचे विश्वात्मक, विश्वकल्याणकारी आणि लोकउध्दारक सामर्थ्य बाबांच्या ठायी एकरुप होऊन ते शिरडीतून प्रगट होऊ लागले. बाबांची मशीद-द्वारका नवधर्माची संचालक अशी धर्म देवताच बनून गेली होती. त्या द्वारकामाईतू मुरलीधर साईकृष्ण जगाला नवीन गीतेचा, नव्या धर्माचा, नव्या तत्वज्ञानाचा धडा देण्यास, सर्वांचे कल्याण करण्यासाठी, सर्वांचा उध्दार करण्यासाठी उभा होता.




श्रीसाईंचे गुरुतत्व तेजोमय होऊन दशदिशात पसरु लागले. सगुणोपासना, जागर, नित्य पूजा-अर्चा, आरत्या, सामुदायिक उपासना, सणवार-उत्सव सुरु झाले. सर्व धर्मपंथीय एकत्र झाले. साईदत्त व सुफी गुरुतत्व क्रियाशील होऊन बाबांच्या देहातून प्रकट होऊ लागले आणि बाबांच्या कृपा-करुणेची, अवतारी वलयाची तेजोमय प्रभा महाराष्ट्रातून भारतातून, देश-विदेशातून पसरु लागली.

मानवतेची, एकात्मतेची, आत्मकल्याणाची एक नवी दिशा बाबांनी दाखविली आणि म्हणूनच आज शंभर वर्षांनीही देश-विदेशी भक्तांनी बाबांचे हे तत्वज्ञान उचलून धरलेले दृष्टीस पडते, अनुभवास येते.

साईनाथ आपल्या जवळ येणाऱ्या भक्तांना विश्वव्यापी परमेश्वराची जाण करुन देण्यासाठी फकीर, दत्त वा गुरु इत्यादी गूढ शब्द वापरीत. त्यांचे नित्य म्हणणे असे ''माझ्या गुरुंचे धन शेते भरुन पडले आहे ते द्यायला तर मी येथे अवतरलो आहे. पण कुणीच काही मागत नाही. माझे ज्ञान कोणालाही नको आहे. सर्वांनाच लोभ, मोह, वासना सोडत नाहीत. पण मी त्यांना प्रिय आहे ते देतो. एक दिवस असा येईल की द्यायला तयार होतो तेच तुम्हांला प्रिय वाटेल.''

# गुरु महिमा

श्रीसाईच राम होते, कृष्ण होते, अल्ला होते आणि दत्तात्रेय होते. भक्तांना, समाजाला उध्दारुन, कल्याणाच्या आत्मबोधाच्या मार्गाने नेणारे सद्‌गुरुतत्व होते. सच्चिदानंद सद्‌गुरु होते. म्हणूनच ते भक्तांना म्हणायचे, मला साई म्हणू नका, तर सद्‌गुरु म्हणा, सर्व सामर्थ्याने तुमच्यासाठी मी धावत येईन. बाबांची ती सूचनाच होती. ती त्या काळातील अपरिपक्व सामान्य भक्तांना उमगली नाही. पण पुढील काळात काही असे भक्त बाबांच्या सहवासात आले आणि त्यांनी बाबांचे खरे स्वरुप जाणून ते सामान्य जणांपुढे उघड केले. हे भक्त होते नानासाहेब चांदोरकर, दासगणू, काकासाहेब दिक्षित, न्या. रेगे, अण्णासाहेब दाभोळकर आणि उपासनी, मेहेरबाबा, नरसिंहस्वामी, शरणानंद, साईपादानंद यांसारख्या विभिन्न भक्तांनीच श्रीसाईंचे 'सद्‌गुरुतत्व' जगासमोर आणले, उघड केले.

**<u>श्रीसाईचरित सार.</u>**

श्रीसाईनाथ सर्वप्रथम शिरडीत आले ते १८५४ साली. निंबाखालील आपल्या फकीर गुरुंची समाधी शोधता तेथे त्यांनी दोन महिने वास्तव्य केले आणि भारत परिक्रमेला तेथून बाहेर पडले त्यानंतर सन १८५८ मध्ये आपली परिक्रमा संपवून पुन्हा शिरडीत आले. यावेळी बाबांनी पूर्ण बारा वर्षे तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येमुळे निंबाला आपले कडुपण अंशतः सोडावे लागले. बाबांची ती मधुर व कडकडीत गुरुभक्ती होती.

सन १८५४ ते १८५८ या कालावधीत बाबा अनेक प्रांत फिरत होते. त्याचवेळेस त्यांची अक्कलकोट स्वामी समर्थांशी गाठ पडली, या म्हणण्याला दुजोरा मिळतो. स्वामींचे मंगळवेढा येथे सन १८३०-१८५० या दरम्यान वास्तव्य होते. आणि बाबांचे गुरुगृहीचे वास्तव्य होते १८३५ ते १८५४ च्या दरम्यान. म्हणजे दोघांचा काळ समांतर आहे.

स्वामींचे सन १८५० ते १८५६ पर्यंत मोहोळ येथे वास्तव्य होते आणि बाबांच्या परिक्रमणाचा काळ १८५४ - १८५८ असा आहे. म्हणजे दोघांच्या भेटीची शक्यता जुळून येते. स्वामीचरित्रात एक यवन तरुण फकीर स्वामींची सेवा करीत होता. त्यावेळी निंबातळी स्वामींनी त्याच्या मस्तकी हात ठेवून साक्षात्कार दिला, अशी कथा आहे. ती कथा व पुढे बाबांनी आपल्या भक्तांना शिरडीत आपल्या गुरुस्थानी स्वामी पादुका स्थापण्यास परवानगी दिली हे फार बोलके व सूचक उदाहरण आहे. त्याही पुढे, या सामर्थ्यशाली दत्तावताराचा (बाबांचा शब्द 'सरकार') साईबाबांच्या जीवनाशी अत्यंत निकटचा संबंध होता, हे ही कळून येते.

बाबांचा जेथे जन्म झाला, त्या पाथरीचे लोक सांगत बाबा हिमालयात फिरत होते, तेथे चक्रतीर्थालाही भेट दिली होती. १८५८ दरम्यान ते धूपखेड्यास गेले असता चांद पाटलाच्या भाच्याच्या लग्नाच्या वऱ्हाडासमवेत शिरडीचा गावकुसावर आले. बाबांचे पाहिले ज्ञात दर्शन झालेला चांद पाटील हा पहिला भाग्यवान पुरुष होता.

# गुरु महिमा

स्वामी समर्थ जसे अक्कलकोटला सन १८५६ मध्ये खंडोबाजवळ प्रगट झाले. तसे बाबा सन १८५८ मध्ये शिरडीत गावकुसावर बैलगाडीतून येऊन खंडोबाच्या मंदिराकडे चालत गेले तेथे त्यांचा भावी भक्त म्हाळसापती त्यांना भेटला. खंडोबाच्या दारातच दोघांची भेट झाली आणि म्हाळसापतींनी त्यांना ''साई'' म्हणून हाक मारली. म्हाळसापतींची ती हाक ''आवो साई'' अमृतमय बनली. साईबाबा हे नांव भक्तांसाठी तारक ठरले. नामरुपहीन ईश्वराला साईबाबा हे नाव व फकीर रुप नव्याने लाभले.

सन १८५८ मध्ये बाबा पुन्हा शिरडीत प्रकटून निंबाखाली व रानावनात वावरत होते. मौन धारण केलेले, विक्षिप्त वागणूक यामुळे शिरडीतल्या लोकांना ते अर्धवट, वेडा फकीर समजू लागले होते. परंतु त्याचे वेगळेतेज पाहून काही सुजाण मंडळींना हा वेडसर नसून कोणी साधूपुरुष आहे याची जाणीव झाली होती. त्यांच्या तऱ्हेवाईक वागण्यातही एक वेगळी करणी आहे. हे त्यांना पटले होते.

बाबा मशिदीत येऊन स्थीर होईपर्यंत बारा वर्षे होऊन गेली होती. सन १८७० ते १८९० या वीस वर्षांच्या काळात, म्हाळसापती, काशिराम शिंपी, डेंगळे बंधू, श्यामा, गणपतराव कोते पाटील, गोपाळराव गुंड, बायजाबाई, नंदराम मारवाडी, अप्पा भिल्ल इत्यादी भक्तांनी बाबांच्या साधूत्वाची प्रभा सर्वत्र पसरवली. बाबा एक रागीट फकीर, विक्षिप्त, वेडसर नसून महान संत आहेत याचे महत्व सर्वांना पटू लागले.

सन १८७८ मध्ये बाबांनी पाण्याने पणत्या पेटवल्या आणि १८८५ मध्ये फणसाच्या जर्जर झालेल्या फळीवर झोपण्याच्या चमत्कारामुळे सर्वांना बाबा एक योगी व अवलीया असल्याचे कळून चुकले. सन १८९० नंतर नानासाहेब चांदोरकर व दासगणू यांनी बाबांचे महात्म्य आणि संतत्वाचा नगर जिल्हा, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी प्रचार केला नानासाहेब चांदोरकरांचा असलेला जनसंपर्क आणि दासगणूंचे कीर्तन, कवित्व यातून बाबांची तेजोमय प्रतिमा सर्वत्र उमटू लागली. बाबांच्या उदीचा सर्वत्र दरवळ पसरुन सुशिक्षित, शुध्द भाविकांचा ओढा शिरडीकडे सरकू लागला. या सुसंस्कृत मंडळींना, भक्तांना बाबांचे साधूत्व भक्तरक्षणाचे सामर्थ्य मान्य झाले.

सन १९०० नंतर पुण्या-मुंबईतून अनेक विज्ञान-पंडीत, अधिकारी, कायदेतज्ज्ञ, संतप्रेमी, भाविक शिरडीकडे आकर्षित झाले. त्यानंतर पाच वर्षांनी कुशाभाऊ, भीष्म, काकासाहेब दिक्षित, राधाकृष्णाई, जोग, नाचणे, कॅ. हाटे, धुमाळ, तर्खड, नूलकर, खापर्डे, उपासनी महाराज, पुरंदरे, नारके इत्यादी गुरुभक्त मंडळींनी बाबांच्या चरणांपाशी येऊन गुरुभक्तीचा झेंडा रोवला. आणि त्यानंतर बाबांची गुरु म्हणून ''गुरुपौर्णिमेस ''डोळसपणे पुजा होऊ लागली. आणि तेव्हा पासूनच बाबांनी ती स्वीकारली. या गोष्टींसाठी १९०९ साल उजाडावे लागले. अर्थात त्यापूर्वी बाबांना गुरु मानणारी मंडळी नव्हती असे नाही. परंतु बाबांनीच स्वतःची गुरु म्हणून पूजा करण्याची परवानगी दिली नव्हती. गुरुपौर्णिमेस ते मशिदीतील खांब्याची (आपल्या

फकीर गुरुची) प्रतिकात्मक पूजा करण्यास लावित. ते फकीर गुरुच बाबांचे सरकर होते. म्हणून भक्त मंडळींना, गुरु देहात नसून ते विश्वात व्यापून उरलेले 'सच्चिदानंद' तत्व असल्याचे पटवून सांगत. हे तत्वच सर्वव्यापी, सर्वसाक्षी, शक्तीमान आहे हा त्यांचा विश्वास व स्वानुभव होता. म्हणूनच बाबा म्हणत, गुरु तत्वाची पूजा हीच शुध्द ''गुरु पौर्णिमा'' होय.

तेव्हापासून म्हणजे १९०९ पासून बाबांची गुरु नात्याने पूजा सुरु शिरडीत भावभक्तिने गुरुपौर्णिमा साजरी होऊ लागली. बाबांचे 'सच्चिदानंद गुरुपद' भक्तांना प्राप्त झाले.

श्रीसाईंना गुरुध्यान, गुरुनिदिध्यास करुन त्यांच्या ठायी समर्पण व शरणागती स्वीकारुन आपल्या गुरुंकडून गुरुकृपा प्राप्त करुन घेतली. तीच शिकवण त्यांनी भक्तमंडळींना दिली. हे ते कृपाप्रसादाचे रहस्य होते.

बाबा जवळचा कोणी सच्चा भक्त असेल तर त्याला दृष्टान्त देऊन त्याची देवभक्ती व गुरुभक्ती उभारी देऊन बळकट करीत. त्यांनी कोणालाही मंत्र वा मंत्रदीक्षा दिली नाही. मात्र काही जणांना 'राजाराम' म्हण असे सांगत. तर गुरुभक्त, साधक भक्तांना गुरुध्यानाचा मार्ग दाखवित. सर्वांचाच सांभाळ करीत. त्यातही जो कोणी बाबांचे स्मरण करुन वा अर्पण करुन अन्न घेत असे, त्याला बाबा प्राणाहून प्रिय मानीत. आपल्या भक्तांवर कृपा करुन त्यांना परमात्व तत्वात विलिन केले पण त्याचे श्रेयही ते आपल्या गुरुंना अर्पण करीत. म्हणजे मानवाच्या जाणीवेला विश्वात्मक सद्‌गुरु तत्वात विलिन करणे यालाच आत्मोध्दार करणे असे म्हणातत. ही प्रणाली श्रीपादश्रीवल्लभांनी प्रवर्तित केली. त्या परम गुरुस्वरुपाचा अविष्कार बाबा होते. म्हणूनच बाबांची योग्यता प्रभू श्रीपादश्रीवल्लभांशी साम्य पावते.

## श्रीसाईंची प्रतिमात्मक शिकवण म्हणजेच कृष्ण साधना.

बाबांचा उपदेश अथवा मार्गदर्शन हा मिताक्षरी असायचा. ते बोलायचे म्हणजे बोलण्यातून सहज साधनेला स्पर्श होत असे. कशातऱ्हेने ?

मी या साडेतीन देहापर्यंत मर्यादीत नसून देहातीत आहे. दिशातीत, कालातीत परब्रह्म आहे. तुम्ही मात्र मी कोण आहे, त्याचा शोध घेऊ नका; ब्रह्म माझा पिता आणि माया माझी माता असून मी निर्गुण, निराकार परब्रह्म आहे. मी सदैव नामरुपात दंगून जातो. तेच माझे वस्तीस्थान! मीच पूर्णानंद, सच्चिदानंद आणि गुरुस्वरुप आहे म्हणूनच तुम्ही मला तुमचे मन-बुद्धी एकवटून हृदयात पाहा, मी तुमच्या हृदयात बसून तुमची कर्मे पाहात असतो. मीच तुमच्या जीवनातील घडणाऱ्या सर्व गोष्टींचा सूत्रधार आहे. तुमच्या संसार जीवनाचा सारथी आहे. परंतु तुम्ही केवळ इंद्रियातून पाहता. हा माझा, ते माझे, धन, संपत्ती, स्त्री-पुत्र यातच गुंतून राहता आणि मला विसरुन जाता. अज्ञानरुपाने बाह्य शोध घेता. मी राम, मीच कृष्ण आणि मीच साई आहे.

# गुरु महिमा

मीच तुमचा श्वास आहे. ह्रदयात वसणारा भगवंत आहे. सत्कर्माद्वारे माझे पूजन करा. नामाचा, समर्पित कर्मांचाच अभिषेक माझ्यावर करा. तुमच्या निष्काम कर्माची आहुती द्या. तेच माझे पूजन होय. तुमचे निरपेक्ष प्रेम हीच माझी भक्ती आहे. निःस्वार्थ सेवा म्हणजेच माझा कर्मयोग आणि स्वतःला जाणणे हाच माझा ज्ञानयोग आहे हे पक्के लक्षात ठेवा. यापैकी तुम्ही आपल्या जीवन प्रवासात काय करता ते ठरवा, जाणा. कारण माझे भक्त होण्यासाठी हीच योग्य साधना होय.

म्हणूनच बाबांनी गुरुगीतेतील ''ध्यानमुलं गुरोमूर्ति'', तुम्ही माझ्याकडे पहा, मी तुमच्याकडे पाहिन, हा महान संदेश भक्तप्रेमींना दिला. याचा अर्थच असा, आपणच नाद, बिंदू आणि कला या परा पाडून पलीकडील अलक्ष अशी निरंजन ज्योती बनतो. श्रीगुरुंच्या स्पर्शाने शिष्यच गुरु बनून जातो. बाबा म्हणत, माझ्या गुरुंनी माझ्यात असलेल्या श्रध्दा व सबुरी भावावर प्रसन्न होऊन बराच काळ मला एका विहिरीत उलटे टांगून आत्मसाक्षात्काराने भरुन टाकले. माझी सारी मूढता सच्चिदानंद स्वरुपात विलिन झाली. मनाचा व प्राणाचा लय होऊन ह्रदयी अनाहत नाद उमटला. दिव्य तेज प्रगटले.

विहिरीत उलटे टांगून ठेवले, याचा अर्थच असा मन उलटे करुन उन्मन केले (उन्मनी अवस्था). हा अनुभव केवळ गुरुकृपेनेच प्राप्त होतो. तो गुरुशरणागतीने घडून येतो. बाबांच्या गुरुंनी जी विक्षिप्त करणी केली, त्याने बाबांचे जीवन सार्थ, सफल आणि कृतार्थ होऊन गेले. बाबा सच्चिदानंद अशा गुरुतत्वाच्या प्रकाशाने न्हाऊन निघाले. आपला हा गुरुकृपेचा अनुभव बाबा स्वमुखे सर्वांना सांगत. थोडक्यात ह्याचा अर्थ असा, कोणीही कितीही उग्र तप, साधना केली तरी ती गुरुकृपेविना व्यर्थ असते. म्हणून बाबा सर्वांना सांगत, योग, जप-तप, साधना आचरण्यापूर्वी माझाच हात हातात धरुन चाला, मीच तुम्हांला भवपार घेऊन जाईन. चारी मुक्ती सहज तुमच्या हाती येतील.

म्हणून श्रीसाईंनी भक्तांना ''श्रध्दा आणि सबुरी'' (दुसऱ्या भाषेत समर्पण व शरणागती असेही होते) हे भक्तीमार्गातील मर्म शिकविले. कारण आपल्या कर्तृत्वाचा अहंभाव श्रीगुरुचरणी समर्पित केल्यानंतरच श्रीगुरु कृपा करतात. त्यासाठीच नामस्मरण आणि श्रीगुरुंचे ध्यान या दोन गोष्टींमधील दडलेले गुपित भक्तांच्या हाती दिले. पूर्ण शरणागती असल्याशिवाय नामस्मरण व भक्ती सफल होत नाही. या दोन साधनांने स्वतःचे कर्म भगवंताला अर्पण करणे हीच खरी उपासना व भक्ती होय. म्हणून बाबा म्हणत, तुम्ही माझ्याकडे पहा, मी तुमचा सर्व भार वाहून भवाच्या पैलतीरी नेईन, याची खात्री बाळगा. भक्ती ही भावावस्था गाठून देते. ज्ञान सहजावस्था प्राप्त करुन देते आणि निष्काम कर्म करते. योग कारण देह गाठून देतो. यापुढील प्रवास श्रीगुरुंच्या हाती असतो. त्यांच्या महाकृपेनेच पुढील प्रवास घडतो.

साईबाबा नेहमी श्रध्दा आणि सबुरी हे दोन शब्द भक्तांना सांगत. परंतु केवळ विश्वास व संयम (सोशिकता)

# गुरु महिमा

असा अर्थ त्यांना अभिप्रेत नव्हता. तर ज्याच्या ठायी विवेक आहे. त्या विवेकावर आधारलेला दृढ विश्वास आणि त्यातूनच अनुभवलेला स्थिर आदरभाव यातून निर्माण होते ती श्रध्दा बाबांना हवी होती. कारण या श्रध्देतून विनम्रता, समर्पण आणि शरणागता अंगी बाणते. श्रध्दा ही एक जाणीव आहे. कोणीतरी, काहीतरी सांगितलेल्या गोष्टींवरुन ती निर्माण होत नाही आणि एकदा का ती निर्माण झाली की काळाच्या ओघातही बदलत नाही.

बाबांची स्वतःच्या गुरुंवरील श्रध्दा सदैव स्थिर आणि बावनकशी होती. त्यामुळेच ते निरंतर गुरुंच्या समीप होते. त्यांची श्रध्दा अत्यंत दिव्य अशीच होती. म्हणूनच तशाच प्रकारचे गुरु बाबांना लाभले होते आणि बाबांसारखा शिष्य गुरुंना भेटला होता. अशा अलौकिक गुरु-शिष्यांमध्ये दिव्य श्रध्देचा दैवी मार्ग निर्माण झाला होता. त्यातूनच गुरुंची महाकृपा बाबांवर अखंड पाझरत होती. का ? तर प्रेम, श्रध्दा, तप, विवेक आणि अनुभव यांनी एकजीव झालेली श्रध्दा बाबांच्या ठायी नांदत होती. म्हणूनच बाबा आपल्या भक्तांना सांगत, मला दोन पैसे द्या. ते दोन पैसे म्हणजे श्रध्दा आणि सबुरी. ते बाबांचे साम्राज्य होते आणि त्यांचे ते सार्वभौम सम्राट होते. याचा एक सुंदर अर्थ असा, भक्ताने जर श्रध्देचे सिंहासन तयार केले, तर मी तुमच्या हृदयकमलात कायम विराजमान होईन. कारण या श्रध्देत उदंड प्रेम व अनन्य भक्तिरस भरलेला असतो. त्यानेच श्रध्दा फलदायी होऊन साक्षात्कारी ठरते.

साईबाबा भक्तांकडून श्रध्देची अपेक्षा करतात त्याचबरोबर गुरुदक्षिणा म्हणून सबुरी (दुसरा पैसा) मागतात. कारण सबुरी ही एक स्थितप्रज्ञ अवस्था आहे. ज्ञाननिष्ठ आहे. मायेच्या प्रभावातील एक अलिप्त भूमिका आहे. मायेत गुरफटून संसार सागरात गटांगळ्या खात नाही. कारण गुरुकृपा! ही त्या शिष्याला परिस्थितीचे प्रहार सौम्य करीत त्याला त्याच्या ध्येयाकडे सहज घेऊन जाते. या प्रवासात तो शिष्य स्वतःचा आणि इतरांचाही उध्दार साधत असतो. त्यासाठीच बाबा सबुरी मागतात. कारण ती अद्भूतच आहे. जीवाचा उध्दार करते, माणसालाच देव बनविते. अशी सबुरी श्रीसाईंनी आपल्या गुरुंना गुरुदक्षिणा म्हणून दिली होती. तीच दक्षिणा बाबांना आपल्या भक्तांकडून अभिप्रेत होती. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे बाबांची सबुरी म्हणजे गुरुशरणागती व गुरुसमर्पण होय. या दोन गोष्टींनी बाबांनी जीवन जगले. अत्यंत श्रध्देने त्यांनी आपल्या गुरुंचे मुख ध्यान केले. ''ध्यानंमूलं गुर्रोमूर्ती!'' गुरुभक्ति, प्रेम, शरणागती, समर्पण या गोष्टींनी सबुरीची घडण होऊन शरीर, मन, बुध्दी आणि चित्त शुध्द होते. असे हे बाबांच्या अनन्यसाधारण सबुरीचे महत्व आहे. म्हणूनच बाबांचे दोन पैसे श्रध्दा आणि सबुरी म्हणजे जीवन जगण्याची एक दिव्य कला आहे.

श्रध्देत प्रेम व भक्ति आहे तर सबुरीत शरणागता व समर्पण आहे. हाच तो महान अर्थ बाबांच्या या दोन पैशात भरलेला आहे. ते केवळ शब्द नाहीत.

म्हणूनच बाबांनी सर्वांनाच करुणेने सांगितले आहे, जे श्रीकृष्ण भगवंतानी भगवद्गीतेद्वारे म्हटले आहे,


# गुरु महिमा

तुम्ही श्रध्देने, ठाम विश्वासाने माझ्याकडे पहा, माझे चिंतन करा, मी तुमचा प्रपंच चालवीन. त्याचा रोकडा अनुभव आज भक्तगण घेत आहेत. बाबा म्हणत, माझ्याच ठायी सारी वेदपुराणे आहेत आणि मोक्षही आहे. तुमच्या सर्व उपासना, जपजाप्य, साधना माझ्या प्रेमात व ज्ञानात भरुन आहेत. जो प्रभू राम होता, श्रीकृष्ण होता तोच आज या फकिराच्या दयाळू स्वरुपात तुमच्यासमोर उभा आहे. तुम्ही केवळ माझा हात धरा, मीच तुमचा भवसागर पार करुन देईन. तुमचे सदाचरण, अनन्यभक्ती आणि माझी कृपा तुम्हांला मुक्ती देईल.


बाबांनी आपल्या गुरुमुखाचे अखंड ध्यान केले त्यामुळे ते गुरुमूर्ति, गुरुस्वरुप झाले होते. श्रीरामकृष्ण तत्वाचेच कार्य साई रुपाने ते चालवित होते. भणंग फकिरी जीवन ते जगले आणि त्यामुळेच शिवत्व त्यांच्या ठायी नांदत होते. म्हणूनच बाबांनी भक्तांना सोप्या भाषेत शिकवण दिली, माझ्यावरच संसाराचा भार ठेवून माझेच स्मरण करा, मलाच भजा आणि माझा हात धरुनच प्रपंच व परमार्थ करा.

आजही म्हणजे शंभर वर्षांनंतरही साईचरित्र अखंड चालूच आहे.

## सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज की जय!





# गुरु महिमा

## भाऊ महाराजांची साईभक्ति




विसाव्या शतकातील श्रीसाईनाथांच्या भक्तित रममाण झालेली एक थोर विभूती म्हणजे आपले सद्‌गुरु भाऊ महाराज! भाऊ महाराज हे मूळचे गोळवणचे! लहानपणीच आजी पार्वतीबाई यांनी भाऊंना मोगर्णे ग्रामी संस्कृताचे उच्च शिक्षित विनायक दामोदर मराठे गुरुजींच्या हाती सोपवले.

मराठेगुरुजींनी भाऊंना बालवयापासूनच ॐ काराचे धडे देऊन विविध मंत्र शिकवले. नानविध गोष्टींत पारंगत केले. त्याचा प्रत्यय भाऊंच्या अभ्यासातून दिसू लागला. मराठे गुरुजींनी भाऊंची पाया बांधणी छान केली त्यामुळे भाऊ अनेक विषयांत पारंगत होऊन उच्च विद्या संपादित करुन रेल्वे खात्यात नोकरीस लागले.

आपली नोकरी सांभाळून भाऊ साईभक्तीत रममाण होत असत. ध्यानी-मनी साईबाबा. हातात काम आणि मुखात **साई** नाम हा भाऊ माऊलींचा नित्यनेम! महिन्यातून एकदा श्रीसाईसच्चरित्र पारायण ठरलेलेच. मग ते घरी असो वा शिरडीत! बाबांचे गुणगान चालूच असायचे.

त्यावेळी आतासारख्या रेल्वे, बसेस, तेथील राहणे इत्यादी सुविधा नव्हत्या. मनमाडपर्यंत रेल्वे जात असे, तेथून एस. टी. पकडून शिरडीला जाता येत असे.

साईसत्चरित्राची शेकडोंनी पारायणे भाऊंनी केली. शिरडीला जाणे, मंदिरात झाडू मारणे, पुजेची व्यवस्था करणे, सर्व आरत्यांना जाणीवपूर्वक उपस्थित राहणे इ. कार्यक्रम भाऊंचे असत. शिरडीला त्याकाळी नानासाहेब रासणे संस्थानाचे अध्यक्ष होते.

नानांचा जन्मच मुळी साईबाबांचे प्रसादाने झाला होता. नानासाहेब भाऊंचे जीवलग मित्र. भाऊंचं उच्च शिक्षण नानासाहेबांना माहित होतं. नानासाहेबांनी भाऊंना शिरडी संस्थानाचे Court Receiver म्हणून नेमलं होतं. भाऊंनी तिथं पुरुषसुक्त, बाबांची आरती बरोबर स्तोत्र पठण इत्यादी सुरु केले. पुढे पुढे पुरुषसुक्तामुळे अनेक जणांची चांगली कामे होऊ लागली.

# गुरु महिमा

एकदा भाऊ आजारी पडले. आजाराच स्वरुप होतं पोटात दुखणे. ते पुढे पुढे इतकं वाढत गेलं की मोठं ऑपरेशन करण्याइतपत. डॉक्टरांनी ऑपरेशनचाच सल्ला दिला. शिवाय प्रकृती विषयी खात्री नाही !

भाऊ घरी लालबागच्या रुममध्ये विश्रांती घेत होते. दुपारची वेळ, एक फकिर दारात येऊन उभा ! भाऊंनी त्याला सन्मानाने आत घेतलं. साईसत्‌चरित्र पारायणाची त्याच दिवशी समाप्ती होती. फकिराला जेवू घातलं, दक्षिणा दिली. फकिर निघताना म्हणाला, "बेटा तूम ऑपरेशन के बिना अच्छे हो जाओगे !'' फकिर निघून गेला.

दुसरे दिवशी हॉस्पीटलमध्ये गेले असता मोठे (स्पेशालिस्ट) डॉक्टर तेथे उपस्थित होते. त्यांनी भाऊंना व्यवस्थित तपासल्यानंतर निष्कर्ष काढला की ऑपरेशनची गरज नाही. इतर ज्या डॉक्टरांनी जे काही X-ray काढले होते ते दाखविले, ऑपरेशनची तयारी करुन ठेवलेली आहे असं सांगितलं, तेव्हा ते स्पेशालिस्ट म्हणाले, "आपण पुन्हा यांची क्ष-किरण तपासणी करु !'' जेव्हा क्ष-किरण तपासणी करण्यात आली, तेव्हा कोणतंही कारण डॉक्टरांना आढळून आलं नाही, आणि ऑपरेशन शिवाय भाऊ बरे झाले.

प्रत्यक्ष साईबाबा फकिराच्या वेषात येऊन, भाऊंना प्रसाद देऊन गेले. त्या रात्री स्वप्नात बाबांनी सांगितलं, "बेटा शिरडी चले आव, आज तक तू शिरडी आता है। कभी मुझे चादर नही चढाई, दिया में तेल नही डाला।'' भाऊ खडबडून स्वप्नातून जागे झाले.

दुसरे दिवशी शिरडीला रवाना झाले. सोबत चांगली चादर घेतली. शिरडीला गेल्याबरोबर साईबाबांच्या समाधीवर चादर चढवली. लेंडीबागेत जाऊन नंदादिपामध्ये तेल घातलं. १ महिनाभर शिरडीमध्ये भाऊ होते. एके दिवशी शिरडीत असतानाच स्वप्न पडलं, "बेटा ये दिया मैने गाणगापूरसे लाया है। तुम्हारी सेवा मुझे पहूँच गयी। अब तूम गाणगापूर जाना शुरु करो ! दत्तभक्ती शुरु करो !'' या स्वप्नाप्रमाणे भाऊ दत्तभक्तीकडे वळले.

## भाऊंची आरती

**जयदेव जयदेव जय सद्‌गुरु नाथा । आरती ओवाळीतो भाऊ जोडूनी कर नाथा ।।धृ।।**
**संकट येता भक्ता धाऊनी तु येशी । सद्‌गुरु होऊन आमची माऊली तु होशी ।।१।। जयदेव...**
**मंत्र पारायण करवूनी तु घेशी । स्वप्नामध्ये जाऊनी निजरुप दावीशी ।।२।। जयदेव...**
**मंत्र मुग्ध होऊनी भक्ता तारीशी । आशिर्वादे प्रेमे आलिंगण तु देशी ।।३।। जयदेव...**
**अगाध महिमा तुमचा वर्णू मी किती । चरणी ठेवीतो माथा दत्तरुप दाविशी ।।४।। जयदेव...**

श्री. अनिल खांडेकर मुंबई.

# गुरु महिमा

## नारदाचे गर्वहरण

एकदा फिरत फिरत नारद सावकाराकडे आला. सावकार नावाप्रमाणे खूप धनवान होता. त्याचे अनेक उद्योगधंदे होते. बाजारपेठेत अनेक सोन्या-चांदीच्या पेढ्या होत्या. राहायला टोलेजंग वाडे होते. गाव सीमेवर भरपूर शेती होती. अमाप गुरेढोरे होती दुध-दुभते भरपूर होते. कशाचीच कमतरता नव्हती. पण त्याला संतान नव्हते. तो आणि त्याची पत्नी फार दुःखी कष्टी होती. नुसत्या अलोट संपत्तीने माणूस सुखी होतो असे नाही.

त्याने नारदाचा मनापासून आदर सत्कार केला. नारद प्रसन्न झाले ते म्हणाले, तुझी काय इच्छा आहे, ते सांग, मी ती पूर्ण करेन. त्याने पुत्र मागितला. नारद प्रसन्न होऊन म्हणाले, तथास्तू! तुझी मनोकामना पूर्ण होईल. मी साऱ्या त्रिभूवनात विष्णूचा सर्वश्रेष्ठ भक्त आहे. ते माझे जरुर ऐकतील व तुला पुत्र लाभ होईल.

नारद तेथून सरळ ब्रह्मदेवाकडे गेले व म्हणाले, तुम्ही एवढी सृष्टी निर्माण करता तर त्या सावकाराला एक पुत्र द्यावा. त्यावर ब्रह्मदेव म्हणाले, त्याला सात जन्मी पुत्र होणार नाही. ते ऐकून नारद निराश झाला व सरळ विष्णूकडे गेला.

त्यांनीही ब्रह्मदेवाप्रमाणेच नारदाला सांगितले सावकाराला मुल होणं शक्य नाही. ते ऐकून नारदाला फार फार राग आला. ते विष्णू म्हणाले, देवा मी रात्रंदिवस तुमचे नामस्मरण करतो. उठता बसता तुमच नाव घेतो. पण तुम्ही माझ्या शब्दांची किंमत करीत नाही. माझा शब्द खरा करीत नाही. माझी इच्छा पुरी करीत नाही.

पुढे काही दिवसांनी सावकारांकडे कबीरदास नावाचा एक साधा भोळा ईश्वरभक्त जातो. त्या सावकाराने नेहमीप्रमाणे त्याचा मोठ्याप्रमाणे आदर सत्कार केला. पुन्हा त्याने आपले व आपल्या पत्नीचे दुःख सांगितले. त्याच्याकडे पुत्राची मागणी केली.

ते सारे ऐकून कबीरदास म्हणाले ठिक आहे. मग त्यांनी हातात चिमूटभर राख भस्म घेतले व खाली सोडले. राख सरळ खाली जमिनीवर पडली. दुसरी चिमुटभर राख खाली सोडली ती सरळ खाली पडली. तिसरी मात्र तिरपी पडली. ते सारे पाहून कबीरदास त्या उभयतांना म्हणाला, तुम्हांला दोन पुत्र व एक कन्या होईल. आणि तसेच घडले. त्या सावकाराला पुढे काही वर्षांनी दोन मुलगे एक सुरेख कन्या झाली.

पुन्हा काही दिवसांनी नारद सावकाराकडे आले तेव्हा तीन्ही मुले खेळताना पाहून त्यांनी विचारले की कुणाच्या प्रसादाने, आशिर्वादाने ही मुले झाली? त्यांनी झालेली घटना नारदाला सांगितली. नारदाने रागाने विष्णूकडे धाव घेतली. भगवान विष्णूंना नारद म्हणाले, माझे न ऐकता एका साधारण कबीराचे तुम्ही ऐकले. त्याचा शब्द खरा केला ते का? तो काय माझ्यापेक्षा श्रेष्ठ भक्त आहे? त्यावर भगवान हसून म्हणाले, होय! पण त्यांना ते पटले नाही. म्हणून देव व नारद कबीरा घरी गेले. देवसाध्या वेषात होते. नारदही साध्या वेषात होता.

# गुरु महिमा

देव बाहेर उभे राहिले.

जाताना वाटेत खूप पाऊस पडल्याने दोघेही भिजून ओले चिंब झालेले होते. देव नारदास म्हणाले, आता तू असाच आत जा, कबीराला म्हणाव की देव भिजले आहेत, त्यांना शेकण्यास विस्तव हवा आहे. नारद आत गेले. त्यांनी कबीराजवळ विस्तव मागितला.

जवळपास एक सुकं लाकूड नव्हतं. आता काय करावं ? कबीरानं जवळ होता तो भरलेला तूपाचा डबा आपल्या अंगावर ओतून घेतला व स्वतःला पेटवून घेतले. दोघे आत येताच तो हा प्रकार. ते पाहून नारद हात जोडून भगवान विष्णूंना म्हणाला, देवा मला क्षमा करा. तो कबीर माझ्यापेक्षा कितीतरी पटीने सर्वश्रेष्ठ आहे. त्याच वेळी देवाने आगीत लपटलेल्या कबीराला तसाच जवळ घेतला. त्याच्या अंगावर हात फिरवला. क्षणात आग होत्याची नव्हती झाली. विझून गेली. कबीर पूर्वीप्रमाणे तेजस्वी झाला. विष्णूचा पूर्व जन्मी अंढ्या नावाचा थोर भक्त होता दैवाने या जन्मात त्याला मदत करुन त्याचे थोर ऋण फेडले. अशा रीतीने नारदाचे गर्वहरण झाले.

## गझल

होते त्यांचे वर वर सारे सोंग । नव्हता त्यांचा तो चांगला शेजार
दान देत होते असे मोठे फार । पण मला नको होता उपकार
भेटले भले आणि तसेच बुरे । नाही मानवले त्यांचे उपचार
लोक दोस्त म्हणत वैर ठेवत । जन्मभर टाळतो मी त्यांचे वार
आव आणत होते थोर कर्णाचा । पण नव्हता खरच दिलदार
काय गुन्हा होता माझा मला सांगा त्यांनी केले मला असा तडीपार
होते दाखवत सारे ते साऱ्यांना । नाही पण विकले कधी भंगार

श्री. सदानंद बामणे
८/१, शिवाजीनगर, खेरवाडी रोड, वांद्रे (पूर्व)

# गुरु महिमा

## दुःखातून सद्गुरु भेट

जुलै २००३ मध्ये माझ्या सहचारिणीचा अल्पशा आजाराने मृत्यू झाला आणि मी एकाकी झालो. त्याकाळात प्रचंड दुःखाचा डोंगर कोसळल्यासारखं वाटू लागलं. अगदी आयुष्य रित रित झाल्यासारख वाटत होतं. आणि खरेच कुठच्यातरी मागील जन्माचे पुण्यकर्म पाठीशी असल्यासारखे अचानक ऑगस्ट २००३ या महिन्याच्या शेवटच्याच आठवड्यात भाऊ माऊलींचा गुरुगौरव अंक आमच्या बँकेच्या कार्यालयात मला वाचायला मिळाला. मी या अंकाबद्दल विचारपूस करता मला कळले की हा अंक आमच्याच शाखेतील वरिष्ठ अधिकारी सौ. स्मिता शिंदे यांनी आणला होता. मी लगेचच त्यांना या अंकातील सर्व गोष्टींच्या आधारावर भाऊ महाराजांबद्दल विचारणा केली असता त्यांनी मला त्यांचे मिस्टर श्री. विजय शिंदे यांच्याशी या अंकाच्या संदर्भात बोलायला सांगितले. हा अंक वाचल्यानंतर मला खरेच राहवेना. मी ताबडतोब श्री. विजय शिंदे यांची भेट घेतली.

श्री. विजय शिंदे हे त्या काळात भाऊ महाराजांच्या ठाणे सेंटरचं कामकाज पाहात असत. त्यांची भेट घेताच त्यांनी मला भाऊ महाराजांबद्दल बरीचशी माहिती सांगितली आणि प्रथम श्री. विष्णू चव्हाण यांच्याशी भेट घडवून दिली. विष्णू काकांनीच मला एका रविवारी भाऊ माऊलींचे प्रथम दर्शन घडवून दिले. आणि तोच अनमोल क्षण, तो शुभदिन माझ्या जीवनातला सुवर्ण दिवस ठरला. भाऊ माऊलींच्या दर्शनानेच माझ्या रिता झालेल्या जीवनाचा मार्ग पुन्हा पुर्ववत होण्याची आशा जागली... मी जुलै २००३ पासून भाऊंकडे नियमीत येऊ लागलो. अगदी थोड्याच कालावधीत भाऊमाऊलींच्या चरणाची ओढ एवढं वेड लावून गेली की कल्पणाच करु शकत नव्हतो. दर गुरुवारी अभ्युदयनगरच्या महाआरतीची आणि भाऊंच्या दर्शनाची वाट पाहणे, हेच सगळं आयुष्य वाटत होते.

खरेच माऊलीच्या डोळ्यातील प्रेम आणि त्यांनी मला त्याप्रमाणे जवळ घेऊन केलेला माझ्या या वेड्या मनावरचा पगडाच मला त्यांच्या कार्याचे वेड लावून गेला. मी दररोज, नियमीतपणे त्यांनी आपल्या प्रवचनातून शिकविलेल्या भक्तिपर सर्व गोष्टी म्हणजेच त्यांनी दिलेले मंत्र, स्तोत्र, स्तुती-सुमने त्यांच्याच छबीसमोर उभे राहून नियमीतपणे सादर करणे तसेच त्यांच्या संस्थेच्या बऱ्याचशा कामात सहभाग घेऊन ते प्रामाणिकपणे, तळमळीने पूर्ण करणे, हा माझ्या जीवनाचा नित्यक्रमच झाला. मी भाऊंचाच झालो आणि माझ्या गतआयुष्याचा जो काही वाईट काळ होता तो अगदी विसरुनच गेलो. मला खरेच येथे आल्या नंतर एक सुंदर आणि प्रेमळ कुटुंब भेटल्यासारखे सुख वाटायला लागलं. मी भाऊंच्या प्रत्येक संस्थेच्या कार्यात बऱ्यापैकी भाग घेऊ लागलो. संस्थेच्या कामात रमता रमता भाऊमाऊलींच्या भजनाच्या समुहातही रममाण झालो. मला येथे आत्मिक समाधान तर मिळालेच पण अनेक अनुभवही माऊलींच्या सहवासात अनुभवायला मिळाले.

सद्गुरुंच्या प्रामाणिकपणे सेवेतून, नित्योपासनेतून त्यांच्या कृपाशिर्वादाने माझ्या जीवनात अनेक बदल

# गुरु महिमा

घडत गेले. मला माझ्या बँकेतील सहकारी सुध्दा सहकार्य करु लागले. कर्दळीवन चार परिक्रमा तसेच माझ्या बँकिग कार्यालयीन शाखेतून १) सन १९९० ते २००६ एस्.बी.आय विदेश व्यापार शाखा ईएफडी सेक्शन, कफ परेड वर्ल्डट्रेड सेंटर शाखा २) सन २००६ ते २००९ एस.बि.आय. मुख्य शाखा, अकाऊंट सेक्शन, फोर्ट, ३) सन २००९ ते २०१३ एस.बि.आय. कमर्शियल शाखा ॲडमिन सेक्शन, फोर्ट ४) सन २०१४ ते २०१८ एस.बि.आय. सी.सी.पीसी. डिस्पॅच सेक्शन, फोर्ट या चारही शाखेतून प्रथम गुणवंत कामगार पुरस्कार म्हणून माझा गौरव केला गेला. हे सर्व केवळ आणि केवळ माऊलींचीच कृपा.

भाऊ महाराजांच्या काही शिष्यमंडळींसोबत आम्हांला डोंबिवलीमध्ये प्रथमच भाऊंच्या उपासणा केंद्राची स्थापना करण्याची संधी मिळाली. श्री. विष्णू चव्हाण, श्री. विजय पेडणेकर (पेमा), कु. आशा गोसावी, कु. धर्मेश गोसावी यांच्या सहकार्याने २५ ऑगस्ट २००७ मध्ये डोंबिवलीत सद्‌गुरु भाऊ महाराज उपासना केंद्र सुरु झाले. त्यानंतर सर्वश्री. अनिल परब, प्रदिप फडके, प्रभाकर सावंत, अविनाश राणे, रविंद्र गुरव, जयवंत जाधव, अस्मिता घोगळे यांसारख्या गुरुबंधूभगिणींची सोबत मिळाली. यातून अनेक आध्यात्मिक कार्याची जोड मिळत गेली.

प्रथमच २०१० साली आम्ही डोंबिवली उपासना केंद्रातर्फे गुरु महिमा या विषयांतर्गत आध्यात्मिक प्रबोधनाचा कार्यक्रम डोंबिवलीत राबविला. त्यानंतर साईपारायण, श्री रुद्राभिषेक, स्वामी समर्थांची पारायणे अशी नानाविध कार्यक्रम या सेंटरमार्फत सुरु झाली. या कार्यक्रमातून शशिकांत शिवगण, कृपेश सांगळे, डॉ. आनंद खवणेकर, हरेश शिळकर, सौ. धावडे, मनिषा उपाध्ये, श्री. सुरेश पांचाळ यांसारखे नविन भक्तगण या परिवारात सामील झाले.

माझा दुसरा अनुभव असा की, श्री क्षेत्र दहागांव, वाशिंद येथील श्रीदत्त मंदिराचे दुरुस्तीचे काम करणे होते. विजय भांदिर्गे सरांनी सुचिवल्याप्रमाणे सन २१५ रोजी प.प. वासुदेवानंद सरस्वती (टेंब्येस्वामी) महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त डोंबिवली सेंटरमार्फत १५ ऑगस्ट २०१५ रोजी ''श्रीसत्यदत्त पूजा''चे आयोजन केले गेले. या सोहळ्यास १०८ तरी यजमान बसले गेले पाहिजे असा आम्हा सर्वांचा संकल्प होता.

यामध्ये प्रत्येकाने अथक प्रयत्न करुन यजमान आपापल्या परिने आणले होते. तसेच इतर छोटे मोठे देणगीद्वारे निधी गोळा करुन जास्तीत जास्त निधी या मंदिराला कसा देता येईल याचे टेंशन मला खूपच होते. आतापर्यंत ६० यजमान झाले होते. अजून बरेच यजमान हवे होते. मी भाऊ महाराजांना विनंती केली हे काम पूर्ण करुन घ्या. आश्चर्य असं १४ ऑगस्टला मला पहाटे पाच वाजता एक स्वप्न पडले. मी एका बागेत उभा आहे. माझ्या दोन्ही हाताच्या ओंजळीत फुले आहेत आणि काकाश्री वरुन माझ्या ओंजळीमध्ये आणखी फुले टाकत होते मी त्यांना म्हणालो, काकाश्री बस बस. ती फुले माझ्या हाताची ओंजळ भरुन खाली सांडत आहेत.

मला जाग आली. मला या स्वप्नाचा अर्थ कळेना, आणि १५ ऑगस्ट २०१५ दिवस उजाडला. मोठ्या

उत्साहात आणि सर्वांच्या परिश्रमाने या सोहळ्याचे चित्रच पालटले. बघता बघता यजमानांची संख्या १०८ बसवण्याचा संकल्प होता ती संख्या १३१ झाली.

तसेच जेवणाचा संपूर्ण खर्च कै. मधुकर चव्हाण (दादा चव्हाण) यांनी उचलला. त्यांचे आम्ही अतिशय आभारी आहोत. यातून सर्व खर्च वजा करुन यथाशक्ति मदत डोंबिवली सेंटरमार्फत श्री क्षेत्र दहागांव, वाशिंद येथील श्रीभाऊ महाराज उपासना ट्रस्टमधील श्रीदत्त मंदिरास केली.

यातच मला जीवनाचा खराखुरा आनंद कळायला आणि मिळायला लागला. मला त्या स्वप्नाचा अर्थ समजला. खरेच मी भाऊ माऊलींचा जन्मोजन्मीचा ऋणी आहे. त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे अनुकरण आणि आता काकाश्रींच्या आशिर्वादाने, मार्गदर्शनाने चाललेला हा माझ्या जीवनाचा प्रवास हा असाच भाऊंच्या कार्यात अखंड राहो. हिच सदैव दत्तचरणी प्रार्थना...

श्री. विजय कापडे,
डोंबिवली (पश्चिम).

---

## साईंचे समाधी मंदिर

नाशिकच्या गोदावरी नदीकाठी पवित्र भूमी परभणी जिल्ह्यात पाथरी ही श्रीसाईबाबांची जन्मभूमी. प्राचीन काळी पार्थग्राम तथा पार्थपूर नावाची ही भूमी पवित्र अशी आहे. गुलबर्गा येथील डॉ. भीमा शंकर देशपांडे यांच्या संशोधनानुसार पाथरी गावात भुसारी उपनावाच्या ब्राह्मण कुटुंबात श्रीसाई माऊलींचा जन्म झाला. मूळ नाव हरि. जन्म दिनांक २७ सप्टेंबर १८२८ वेळ दुपारी १२ वाजून ०५ मिनिटे २६ सेकंद. आईचे नाव देवगिरी अम्मा, वडिलांचे आडनाव भुसारी नाव बाबुमिया. साईबाबांचे मोठे बंधु अंबादास त्यांना बहिण होती. बसवंत ताई बहिणाचा निर्माण काळ दि. होता १५ ऑक्टोबर १९१८ बुधवार. बाबा नेहमी पाथरी येथील चौधरी घराण्याची चौकशी करत असता असा उल्लेख आढळतो. त्यानुसार ही सर्व माहिती अगदी खात्रीशीर वाटते. पाथरीचा परिसर अत्यंत पुण्यप्रद आहे. जवळपास पुरातन देवळे आहेत. परभणी रेल्वे मार्गावर मानवन रोड स्टेशन जवळ आहे. बस स्थानकापासून एक किलो मीटरवर साई नगर ही बाबांची जन्मभूमी आहे. बालपणीच ते एका फकीरा बरोबर १२ वर्षे योग साधना तपश्चर्या करीत होते. त्यानंतर श्रीसाईबाबा हे हुमणाबाद येथील श्रीमाणिक प्रभू यांच्याकडे व अक्कलकोट येथील श्रीस्वामी समर्थांच्या सहवासात काही काळ राहिले.

गुरु आज्ञेनंतर शिर्डीमध्ये साईबाबांचे १८५२ साली खंडोबा मंदिराजवळ प्रथम प्रकट झाले. आवो ! साई म्हाळसापती व काशीराम शिंपी हे बाबांचे प्रथम भक्त. यांनी साई माऊलीची राहण्याची सोय मशिदीत केली असे म्हटले जाते. द्वारकामाई नागपूरच्या गोपाळराव बुट्टी यांचा वाडा हे बाबांचे समाधी मंदिर झाले.

श्री. सदानंद बामणे
८/१, शिवाजीनगर, खेरवाडी रोड, वांद्रे (पूर्व)

# गुरु महिमा

साई समाधी शताब्दी विशेषांक

## दत्त राजा तू क्षमा करी

दत्त राजा तू क्षमा करी चुकता हा जीव या संसारी ।
लोटू नको दत्ता कधी दूरी राहीन पायाशी ।।१।।
दु:ख न जीवनात ऐसा न कोणी ।
कोणी दु:खातही सुख मानी।।
मानी सुख त्यात तोच ज्ञानी ज्ञान भक्तीत।।२।।
युग कलीचे आज असे निंदेवीण गाव नसे ।
गाढवास गुळ कळेल कसे तो अती शहाना ।।३।।
मुळ नदीचे शोधू नका । कुळ साधूचे पाहू नका ।।
छंद असा बाळगू नका । पटेल तर घ्यावे ।।४।।
इच्छेनुसार भावास त्या ठेवावे । कर्मपण करीत रहावे।।
त्याचप्रमाणे फळ मिळेल ते घ्यावे हेच करणे योग्य असे ।।५।।
कुठेही कसे ही नाम ते स्मरावे आपूले परी ते आपणासाठी ठावे
करावे कसेही परी मनोभावे यश असे त्यात ।।६।।
पैशासाठी आप्तेष्ट विसरती । पैसाच अखेरी जोडी तोडितो नाती ।
खऱ्याचे खोटे त्या पैशावरती पैसा नाश करी ।।७।।
नाही शिरी होत नामाचे वजन नामाची असे हा हरिचे भजन ।
नाम श्रध्देने ते करावे जतन । त्यातही कल्याण ।।८।।
भक्ती करुनिया प्रेम शिका । चूकुन केव्हा करी न टिका ।
भोगात वाढ ती करु नका । ते कर्म नडते ।।९।।
नाही धन लागे नामस्मरणात । नाही तन झीजे ।
नाम उच्चारा नाही ऋण होणे । केव्हाच नामात ऐसे नाम असे ।।१०।।

संग्राहक -
**सौ. ज्योति प्रकाश घरत**
ठाणे

# गुरु महिमा



## सद्गुरुंचा प्रसाद दूर करी व्याधी.

मी सौ. आशा हणमंत लोहार, भाऊ महाराजांच्या व काकांच्या सान्निध्यात मला वेळोवेळी खूप अनुभव आले आहेत. त्यामधील दोन छोटे अनुभव.

मी दर गुरुवारी अभ्युदयनगर काळाचौकी हॉलमध्ये आपल्या सद्गुरुंच्या महाआरतीला जाते. तेथे भाऊ महाराजांना नित्य चहा ठेवला जातो. महाआरती झाली की कपातील चहा सर्वांना प्रसाद म्हणून पळी-पळीने दिला जातो. मी त्यातील थोडा चहा प्राशन करुन हाताला लागलेला चहा माझ्या डाव्या मनगटावर एक गाठ होती त्यावर चोळायची. असे दर गुरुवारी चालू असायचे. एका गुरुवारी मी तो चहा प्राशन करुन त्या गाठीवर चोळायला गेली, बघतेच तर गाठच नाहीशी झालेली होती.

भाऊंच्या मंत्रातच नव्हे तर भाऊंच्या प्रसादातही किती ताकद आहे हे मला त्यादिवशी समजले.

दुसरा अनुभव

मी माझ्या मुलांसह या मे महिन्याच्या सुट्टीत माझ्या माहेरी गोंदवले गावी गेली होती. बरेच दिवस तिथे राहिली व परत मुंबईला यायच्या आदल्या दिवशी रात्री माझे वडील यांचे दहा हजार रुपये पाकिटासह हरवले होते. ते जेव्हा घरी आले तेव्हा मला बोलले माझे पैसे हरविले आहेत मला बॅटरी दे मी पैसे शोधायला चाललो आहे. ते खूप घाबरलेले होते.

ते वयस्कर असल्याने मला फारच भीती वाटू लागली म्हणून मी भाऊंचा धावा केला की भाऊ माऊली माझ्या वडिलांच्या पैशाबाबत चांगली खबर मिळू द्या.

तो मनोमनी केलेला धावा फक्त धावा नसून साक्षात चमत्कार होता.

दहा मिनिटांच्या आत माझा भाऊ मला सांगायला आला की पैसे मिळाले.

धन्य धन्य ती भाऊ माऊली ।

नाव घेताच राहती माझ्या पाठीशी उभी ।

असे माझे थोर सद्गुरु ।।

सौ. आशा ह. लोहार,
१/१०, सुंदरजी लिलाधर चाळ,
शिवडी.

# गुरु महिमा

## सद्गुरु तारणहार...

प. पू. भाऊ महाराज यांच्या कृपाशिर्वादाने जे काही मला अनुभव आले त्याचे मी थोडक्यात वर्णन करते.

तो दिवस होता ८ मे २०१४. नेहमीप्रमाणे माझे यजमान ऑफिसला निघाले आणि काही वेळातच घाबऱ्याघुबऱ्या अवस्थेत घरी आले. त्यांना धड उभे राहता येत नव्हते वा काही सांगता येत नव्हते. मी ताबडतोब त्यांना के. ई. एम. रुग्णालयात घेऊन गेले. टॅक्सीतून उतरताना अचानक दोन मुले धावत आली आणि त्यांनी माझ्या यजमानांना आधार देऊन डॉक्टरांकडे घेऊन गेली. डॉक्टरांनी त्यांना दाखल करुन घेऊन उपचारांना सुरुवात केली. त्यांची रक्ताची काही चाचणी झाली. डॉक्टरांनी सांगितले. रिपोर्ट मध्ये काही समस्या असल्या तर ह्यांना पुन्हा अॅडमीट करावे लागेल.

रिपोर्ट मिळण्याच्या आधी दोन दिवस म्हणजे २७ मे २०१४ च्या दिवसी रात्री ३ वाजून ४५ मिनीटे झाली होती. भाऊ महाराज माझ्याबरोबर बोलत होते. शिंदे बाई रिपोर्ट मिळाला तरी तू घाबरु नकोस. अॅडमीट करशील त्यांना तेव्हा फक्त तीन जांभळे खायला दे. एवढे भाऊ बोलले आणि कुठे गेले समजलेच नाही.

मी विचार करु लागले पंधरा दिवस ते तर हॉस्पीटला होते आणि परत भाऊ अॅडमिट करायला का सांगतात ? २९ तारखेला आम्ही हॉस्पीटला गेलो. रिपोर्ट मिळाला. रिपोर्ट ऐकून मी सुन्न झाले. डॉक्टर म्हणाले की, त्यांना सहा ब्लॉकस् आहे. पंधरा दिवसात बायपास सर्जरी झाली पाहिजे नाही तर परत अटॅक येणार. ४थ्या मजल्यावरुन मी खाली १ल्या मजल्यावर आले ह्यांना भेटून रडत रडत सर्व सांगत होते.

तेवढ्यात एक अनोळखी व्यक्ती माझ्याजवळ आली आणि त्यांनी रिपोर्ट घेतला, सर्व रिपोर्ट वाचला व बोलले तुम्ही रडू नका मी तुम्हांला चांगले डॉक्टर देतो. १० वा. डॉक्टर आले. त्या व्यक्तीने आम्हांला डॉक्टराची भेट करुन दिली. डॉक्टर म्हणाले की मी ऑपरेशन करेन पण सुराना सेटया हॉस्पीटल चेंबुर येथे. आणि त्याप्रमाणे सात जूनला बायपास सर्जरी झाली.

एवढे मोठे हॉस्पीटल असून पण पैसे वगैरे डॉक्टरांनी काही घेतले नाही. सर्व फुकट उपचार झाले.

मग ते अनोळखी गृहस्थ कोण होते ? भाऊ महाराजच होते ते ! सर्व भाऊंनीच घडवून आणले.

आता पाच वर्षे झाली ते सुखरुप आहेत. सर्व भाऊंचा आशिर्वाद...

सौ. सुहासिनी चंद्रकांत शिंदे
अभ्युदयनगर, काळाचौकी,
मुंबई.

# गुरु महिमा

## सद्गुरुंची भेट...

सद्गुरु श्री भाऊ महाराज माझ्या आयुष्यात येण्यास माझी मावशी. माधुरी मधुसूदन कांदळगांवकर हीचे निमित्त झाले. माझी मावशी भाऊंच्या सेवेत १९९८ पासून होती. पण आमचा काही योग जुळत नव्हता. मग २००९ साली मावशीच्या नुतनीकरण झालेल्या घरी वास्तुशांती पूजा होती. त्यावेळी प. पु. सद्गुरु काकाश्री तिच्या घरी आले होते. त्यांना पाहताच मी सरळ त्यांच्या पायाशी नतमस्तक झालो. त्यांनी माझ्या पाठीवर हात ठेवला त्याक्षणी मला जाणवू लागले की काहीतरी होते आहे, पण मला ते सुखद वाटले. मावशीने मला मालाड पश्चिम येथील राममंदिरात गुरुगीतेला बसण्यास सांगितले. मी कुणाल (मावशीचा मुलगा) बरोबर राममंदिरात जाऊन गुरुगीता श्रवण केली पण हे सगळे तेथपर्यंत घडले. पुन्हा जेव्हा मी माझ्या स्वगृही आलो तेव्हा पुन्हा माझ्या कामात गढून गेलो त्या सगळ्यांचा मला विसर पडला. मग अशीच तीन वर्षे निघून गेली. मावशी मला भाऊंच्या या ना त्या कार्यक्रमाचे निमंत्रण देत होती. पण माझ्यातले षडरिपू ते निमंत्रण टाळत होते.

पण म्हणतात ना, आपण जरी गुरुंना विसरलो, तरी सद्गुरु आपल्याला विसरत नाही आणि झाले २०१२ साली मालाड सेंटर तर्फे दत्तभक्तांना संक्षिप्त गुरुचरित्र (स्वामी दत्तावधूत रचित) या ग्रंथाचे वाटप करण्यात येत होते. मावशीनेही ते ग्रंथ वाटण्यासाठी घरी आणले होते.

त्यावेळे मी काही कारणाने तिच्या घरी गेलो होतो. माझी नजर त्या ग्रंथावर पडली व लागलीच मी मावशीला प्रश्न केला, ''हे काय आहे ?'' मावशीने मला तो ग्रंथ दिला व तो रोज वाचण्यास सांगितले.

माझे आजोबा दत्तभक्त होते. (बापू गो. जोशी). त्यामुळे मनात दत्तभक्तीची आस्था होती. त्यामुळे लगेच मी त्या ग्रंथाचे रोज वाचन सुरु केले. मला दत्ताभक्तीची आवड निर्माण झाली. दत्तांबद्दल जाणून घेण्यास मन आतुर होऊ लागले. मी हे सगळे मावशीला सांगितले. मावशीने मला धीर धरायला सांगितले. काही काळानंतर म्हणजे डिसेंबर २०१२ ला मला मावशीचा फोन आला की तुला कुणालबरोबर फेब्रुवारी २०१३ ला माघीला गाणगापूरला जावे लागणार. तिथे अन्नदान सोहळा असतो. तू तिथे जाऊन सेवा कर, तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे तुला तिथे मिळतील. मी लगेच होकार दिला. तोपर्यंत गाणगापूर माझ्या गावीही नव्हते.

२०१३ चा फेब्रुवारी महिना आला आम्ही गाणगापूरात पोचलो. शेवटचे तीन दिवस असल्याने सगळीकडे धावपळ सुरु होती. आम्ही ही त्या धावपळीचा भाग झालो. हातून सेवा घडत होती. आणि त्याबरोबर मनात नवनवीन प्रश्न निर्माण होत होते. सद्गुरु श्रीभाऊ महाराजां विषयी जाणून घेण्यास मन अधीर झाले होते. त्यामध्ये भाऊंच्या दरबारातील काही शिष्यांशी बोलणे झाले पण मनाचे समाधान होत नव्हते. मनात भाऊंबद्दल त्यांच्या कार्याबद्दल जाणून घेण्याची इच्छा परमसीमा वर होती. आणि मी नकळतपणे भाऊंना विनंती केली आणि आश्चर्य तात्काळ माझ्या हातात सद्गुरु भाऊंच्या जीवनावरील आदरणीय भाईमामांनी लिहिलेले 'गोळवणचा राणा' हे पुस्तक आले. मी ते पुस्तक वाचायला घेतले. त्यातून मला भाऊंच्या जीवनाविषयी, त्यांच्या कार्याविषयी

व त्याकार्यात मोलाचा वाटा उचलणाऱ्या शिष्यांबद्दल माहिती मिळाली. ते पुस्तक वाचल्यानंतर सगळे चित्र माझ्या डोळ्यासमोर स्पष्ट झाले. त्या पुस्तकात दत्तगुरुंच्या पायी पालखीचा उल्लेख होता. मनात उत्सुकता चाळवली. पायी पालखीबद्दल संबंधीतांकडून माहिती घेतली तेव्हा मला कळले की ती आता २०१६ मध्ये निघणार आहे. मनोमनी ठरवले आपण या सद्कार्याचा भाग व्हायचे. सद्गुरु भाऊंना प्रार्थना केली. तोपर्यंत या ना त्या सेवा घडत होत्या.

सन २०१६ उजाडले. माघी अन्नदानाचा कार्यक्रम सुरु होणार होता. आणि त्यानंतर श्रीदत्त पादुका पायी पालखी परिक्रमा सुरु होणार होती. मी तसा कायमस्वरुपी नोकरीस नव्हतो. एक कलाकार म्हणून चित्रपट क्षेत्रात आपले नशीब आजमावत होतो. त्यामुळे सुट्टी मिळवण्याचा खटाटोप मला करावा लागणार नव्हता. घरी सांगितले की मी आता महिनाभर घरी नसणार आहे.

माघी अन्नदानाचा सात दिवशीय कार्यक्रम आटोपून आम्ही सगळे पालखी परिक्रमेच्या तयारीस लागलो. सगळ्यांचा उत्साह ओसांडून वाहत होता. त्या आधी तीन पायी पालख्या झाल्या होत्या. त्यात सहभागी झालेल्याकडून आम्हांला त्यांचे अनुभव कळत होते. क्षणोक्षणी आपण किती भाग्यवान आहोत याची प्रचिती येत होती.

श्रीदत्त पादुका पायी पालखी परीक्रमा २०१६ सुरु झाली. पालखी परिक्रमेत असताना मला पदोपदी श्रीदत्तगुरुंचे अस्तित्व जाणवत होते. महाराजांचा सहज वावर मी अनुभवत होतो. माझे मन स्थीरावत होते. भाऊ माऊली पालखीत सेवा घडवून घेत होते. आणि मजल दरमजल करत आम्ही महाराजां सोबत चाललो होतो. आमची सर्वांची भ्रमण अवस्था होती. कारण दत्तमहाराज हे भ्रमणकारी आहेत. पालखी ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालूक्यातील श्रीक्षेत्र दहागांव वाशिंद ग्रामाच्या जवळ आली. मन उदास होऊ लागले की आता इतके दिवस लाभलेला महाराजांचा सहवास संपणार होता. असो महाराजांची इच्छा!

श्रीक्षेत्र दहागांव, वाशिंद येथे श्रीदत्त पादुका पालखीचे जोरदार स्वागत झाले. भाऊ महाराज उपासना मठात श्रीदत्त महाराज आसनस्थ झाले.

या पायी पालखीत भाऊंनी करवून घेतलेल्या सेवेतून मला भाऊंच्या शिष्य परीवारात ओळख मिळवून दिली. सर्व गुरुबंधूंचे प्रेम लाभले. यात सद्गुरु भाऊ महाराजांच्या अन्य सेवाकार्याचे जे प्रमुख शिलेदार होते, त्यांच्या नजरा माझ्याकडे वळल्या. ते करीत असलेल्या सेवा कार्यात ते माझा विचार करु लागले.

त्यात सद्गुरु भाऊ महाराज आरोग्य आणि शैक्षणिक संस्थेचा कार्यकारी प्रमुख श्री. समीर चव्हाण होते. त्यांनी मला आरोग्य शिबीरास सेवेसाठी येशील का ? अशी विचारणा केली. मी तात्काळ होकार दिला.

पालखीतून आल्यानंतर मला भाऊ महाराजांच्या आशिर्वादाने सुप्रसिध्द गायिका अनुराधाजी पौडवाल

यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली. आणि सुवर्णयोग म्हणजे अनुराधाजी स्वतः दत्तउपासक आहेत. त्यामुळे वैचारिक पातळीवर स्थिरता लाभत होती.

नोकरी करुन मी आरोग्य शिबीरांनाही उपस्थित राहत होतो. त्यात समीरदादाने मला पंढरपूरला आरोग्य शिबीराला येशिला का अशी विचारणा केली. मी होकार दिला. मला सुट्टीही मिळाली. पंढरपूरच्या जवळ असणाऱ्या माळशिरस येथे दोन दिवशीय आरोग्य शिबीरात काम करण्याची संधी लाभली. आषाढी एकादशीच्या काही दिवस अगोदर.

तशीच संधी मला २०१७ मध्ये पुन्हा मिळाली. मी नोकरीत परवानगी घेऊन त्या आरोग्य शिबीरास उपस्थित राहिलो. तेथे सेवा करत असताना मला कधीही विठ्ठल मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेण्याची इच्छा होत नव्हती. आणि (त्यापूर्वीही कधीही माझे दर्शन झाले नव्हते.) सद्‌गुरु भाऊ माऊली ज्या वारकऱ्यांची सेवा करवून घेत होती त्यांतच विठ्ठलाचे दर्शन घडवून आणत होती. आम्हा सर्वांचे त्या सेवेतूनच समाधान होत होते.

आम्ही आरोग्य शिबीर आटोपून घरी आलो. मी कामावर रजू झालो. त्यावर्षी अनुराधा पौडवाल यांना केंद्र सरकारतर्फे त्यांच्या चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला होता.

त्याला अनुसरुन महाराष्ट्र राज्य सरकारने श्रीविठ्ठल-रुक्मिनी मंदिरात आषाढी एकादशी २०१७ या दिवशी मा. मुख्यमंत्र्यांच्या सोबत पूजेचा मान अनुराधाजी पौडवाल यांना दिला होता.

मी नेहमीप्रमाणे कामावर आलो तर त्या पंढरपूरास जाण्याची तयारी करत होत्या. मला पाहताच त्यांनी मला आपल्यासोबत पंढरपूरास येण्यास सांगितले. माझ्या मनात आनंदाच्या लहरी उसळल्या. कारण चारच दिवसांपूर्वी मी आरोग्य शिबीराच्या निमित्ताने माळशिरस (पंढरपूर) येथे होतो आणि आता पंढरपूरात पुन्हा जायला मिळणार या गोष्टीचा खूप आनंद झाला. मनोमन भाऊ माऊलीचे स्मरण केले व पंढरपूरास निघालो.

पंढरपूरात पोचल्यावर अनुराधाजींचा व त्यांची कन्या सौ. कविता तुळपुळे (या पण गायिका आहेत.) यांचा सुमधुर भक्ती संगिताचा कार्यक्रम विठ्ठल मंदिरात सादर झाला. त्यानंतर श्रीविठ्ठल मंदिर समिती अध्यक्षांनी आम्हाला गाभाऱ्यात येण्याची विनंती केली. अनुराधाजी व आम्ही सर्व गाभाऱ्यात दाखल झालो. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे आगमन झाले. पण माझे मन विठ्ठल रुक्मीणीच्या त्या तेजोमय दर्शनात गुंग झाले होते. मनात एकाच प्रश्नाने उचल खाल्ली होती ती म्हणजे मला का असे दर्शन मिळत आहे. मैलोनं मैल चालत तुझ्या नामात दंग होऊन पाऊस-पाण्यात भिजत तासनतास रांगेत उभ्या राहिलेल्या त्या वारकऱ्यांना असे तुझ्याजवळ उभे राहून स्थिरतेने तुला डोळे भरुन पाहता येत नाही. माझी तर तशी इच्छाही नव्हती आणि मुखात एवढे नामही नव्हते.

माझे डोळे आपोआप मिटले गेले. अंतःमनात ध्वनी लहरी उमटल्या त्या ध्वनीलहरीतून आवाज आला की

# गुरु महिमा

तुझा गुरु श्रेष्ठ आहे. ज्या गुरुसान्निध्यातून तुझ्या हस्ते वारकऱ्यांची प्रामाणिकपणे सेवा घडली. त्या सेवेचेच हे फल आहे. त्यावेळी सद्‌गुरु भाऊ माऊलींच्या सामर्थ्य साधनेचा अनुभव आला. भाऊ माऊली ही कोणी व्यक्ती नसून साक्षात परमेश्वर आहेत या गोष्टींवर विश्वास द्विगुणीत झाला. आपण स्वत: किती भाग्यवान आहोत याची प्रचिती आली.

पूजा झाल्यानंतर आम्हा सर्वांना श्रीविठ्ठल चरणी माथा टेकण्याची संधी मिळाली. मी तर भगवंताच्या चरणांना मिठीत घेतले. डोळ्यांतून आनंदाश्रू तरळले. सद्‌गुरु भाऊंच्या स्मरणात मी पंढरपूरातून निघालो.

माझे दैनंदिन जीवन सुरु झाले. आता जगण्यास एक विलक्षण आत्मविश्वास आला होता. मागे सांगितल्याप्रमाणे मी कलाकार म्हणून चित्रपट संस्थांना ऑडीशन देत होतो. त्याप्रमाणे पायी पालखीपूर्वी मी रुचिता प्रोडक्शन या संस्थेला ऑडिशन दिले होते. पंढरपूर वरुन आल्यावर एक आठवड्यात मला त्यांचा फोन आला की माझी एका भूमिकेसाठी निवड करण्यात आली आहे. दोन दिवसांचे काम आहे. मला अत्यानंद झाला. भाऊ माऊंलीच्या आशिर्वादाने माझा हा योग जुळून आला होता. मी लगेच होकार दिला. काहीही विचारपूस केली नाही. अनुराधांजींना सांगितले त्यांनाही खुप आनंद झाला. त्यांनी मला आनंदाने परवानगी दिली.

मी सेटवर पोचलो. तिथे मला कळले की ही मालिका श्री विठ्ठलाच्या जीवनावर आधारीत आहे. साक्षात चमत्कार म्हणजे मालिकेतील दृष्यात मला साक्षात विठ्ठल (भरत जाधव) वाचवायला येणार. इथेही मला विठ्ठलाचे दर्शन होणार. पंढरपूरात झालेल्या विठ्ठल दर्शनाने मनात भावनेचा पुर दाटून आला होता त्या भावनेच्या पुराला मी या कामातून वाट करुन दिली. भाऊ माऊलींचा गोड चेहरा डोळ्यांसमोर तरळू लागला. भाऊ माऊली हसत विचारत होती मिळाले ना ? मी म्हणालो, हो भाऊ खूप मिळाले. माऊली खूप मिळाले. डोळ्यातून अश्रूधारा वाहू लागल्या. अंतर्मनात भक्तीसागराचा डोह उचंबळू लागला. भाऊ महाराजांचे शतश: आभार मानत मी त्यांना विनंती केली, हे भाऊ, सदैव आपल्या भक्तीच्या कक्षेत राखून या पामराकडून अशीच निरंतर सेवा करुन घ्या. कधीही आपल्यापासून दुरावू नका.

या मालिकेचे नाव ''तु माझा सांगाती'' असे आहे आणि माझ्यावर चित्रीत झालेला भाग वाचकांस (वूट(Voot)) या ॲप्लिकेशनवर पाहायला मिळेल. तारीख २४ ऑक्टोबर २०१७ व भागाचे नाव Vithal Rescued by flut असे आहे. तरी सर्व वाचकांनी हा भाग पहावा ही माझी नम्र विनंती.

अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ! सद्‌गुरु श्री भाऊ महाराज की जय ! भालचंद्र महाराज की जय !

केतन साईप्रसाद जोशी,
डोंबिवली (पूर्व)

# प. पु. सद्गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

## सद्गुरु श्री भालचंद्र महाराज सेवा संघ (रजि.), मुंबई

रजि. नं. एफ 25978 (मुंबई)

कार्यालय : १०/७२३, म. हौ. बोर्ड, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुं. ३३. संपर्क : ९८१९२२०२०४

---

## सद्गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) रजि.

सद्गुरु भालचंद्र महाराज उपासना मठ,

देवल गाणगापूर, ता. अफजलपूर, जि. गुलबर्गा, कर्नाटक. संपर्क : 08470२74374

---

## श्री भानुदास प्रतिष्ठान, नृसिंहवाडी - कोल्हापूर

(रजि. नं. एफ २२९६४)

नरसोबावाडी एस. टी. स्टॅन्ड जवळ, नरसोबावाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर. संपर्क : ०२३२२२७०२००

---

## भाऊ महाराज उपासना ट्रस्ट (रजि.)- वाशिंद.

(नोंदणी क्र.: ई ३८३२)

श्री दत्त मंदिर, देसलेपाडा, वाशिंद, दहागांव, ता. शहापूर, जि. ठाणे. दुरध्वनी : ९८६७७१७०७९

---

## श्री भानुदास सहकारी पतसंस्था मर्यादित, मुंबई

नोंदणी क्र.: एम.यु.एम./डब्ल्यु.ई./आर.एस.आर(सी.आर.)/१८२१ सन १९९९-२०००)

शॉप नं. ६, श्रीकृपा बिल्डिंग, रंगारी बदक चाळ, काळाचौकी, मुंबई - ४०००३३.

चिंचपोकळी (पुर्व), मुंबई - ४०० ०१२. दुरध्वनी : ८१०८८८६२६१

# प. पु. सद्गुरु श्री भाऊ महाराज

(आय. ए. एस., आय. आर. एस. इतिहास संशोधन)

## संस्थापित समाजोपयोगी संस्था

### सद्गुरु श्री भाऊ महाराज सेवाश्रम धर्मदाय संस्था

(रजि. नं.: २५७७९)

पत्ताः मु. पो. नेरुर(भाक्राड), वाघोसे वाडी रोड, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.

संपर्क : ९२७०४५८५१७

---

### श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संकुल - वाशिंद.

दहागांव, वाशिंद, ता. शहापूर, जि. ठाणे.

प्रदुषणमुक्त वातावरणात उत्कृष्ट घरकुलांसाठी अवश्य संपर्क साधावा.

दुरध्वनी : ८९७६२९२९६०

---

### श्रीभाऊ मेडिकल ॲन्ड ऐज्युकेशन ट्रस्ट

अमरदिप - सी विंग, डी. एल. मार्ग, काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

संपर्क - ९८२०९८१६६५.

---

### श्रीदत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट

१७/बी, उदयश्री सोसायटी, माऊली निवास, भांडूप (पुर्व).

सद्‌गुरु श्री भाऊ महाराज शिष्य परिवारातर्फे तसेच

आमचे हितचिंतक, जाहिरातदार, देणगीदार, सेवेकरी

यापैकी दिवंगत झालेल्यांना

सद्‌गुरु श्री भालचंद्र महाराज सेवा संघ, मुंबई

श्री भानुदास प्रतिष्ठान - नृसिंहवाडी, कोल्हापूर

सद्‌गुरु भाऊ महाराज धर्मदाय संस्था (सार्व.) - देवल गाणगापूर, कर्नाटक

भाऊ महाराज उपासना ट्रस्ट, दहागांव - वाशिंद

श्री भानुदास सहकारी पतपेढी मर्यादित - मुंबई

श्री भाऊ महाराज सहकारी गृहनिर्माण संस्था, दहागांव - वाशिंद

सद्‌गुरु भाऊ महाराज सेवाश्रम धर्मादाय संस्था - कुडाळ

श्री भाऊ मेडीकल ॲन्ड एज्युकेशन ट्रस्ट - मुंबई

श्री दत्त पादुका पालखी परिक्रमा चॅरीटेबल ट्रस्ट - मुंबई

आणि गुरु महिमा परिवारातर्फे



# भावपुर्ण श्रध्दांजली





सद्गुरु श्री भाऊ महाराज

गुरु महिमा दिवाळी अंकास

प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष ज्या ज्या सर्वांचे

आम्हांस अनमोल सहकार्य लाभले,

त्या सर्वांचे गुरु महिमा परिवार आणि

सद्गुरु श्री भाऊ महाराज संस्थापित सर्व संस्थांतर्फे

# हार्दिक आभार



हि दिवाळी आपण सर्वांना सुख-शांती

आणि समृध्दीची जावो, हिच सद्गुरुचरणी प्रार्थना